
# माणूस

चित्र वार्ता पुस्तक

१५ फेब्रुवारी १९७४ | १ रूपया





# माणूस चित्र, वार्ता पुस्तक

१५ फेब्रुवारी १९७४ । **एक रुपया । अंक चौदावा**

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहसंपादक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

## गुजराथ असा भडकला ....

—— छाया दातार

गुजराथचा विद्यार्थी पहिल्यापासूनच राजकारणात भाग घेणारा, थेट महात्मा गांधींच्यापासून. स्वातंत्र्ययुद्धात अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षण सोडले. चळवळीमध्ये भाग घेतला. तीच परंपरा आजही चालू आहे. शिक्षणसंस्था आणि समाजजीवन, राजकारण यांचे अजूनही नाते आहे. किंबहुना गुजराथच्या राजकारणाचा एक प्रवाह गुजराथ विद्यापीठातूनच वाहातो. चिमणभाई पटेल त्याच प्रवाहाच्या धारेतून आज सत्तेवर आलेले. तेव्हा या विद्यापीठातील प्राध्यापक व विद्यार्थी सामाजिक दृष्टचा जागरूक असले तर नवल नाही. किंबहुना चिमणभाई पटेलांविषयीच्या आजच्या असंतोषाची चाहूल जुलै १९७२ मध्ये चिमणभाई जेव्हा अधिकारावर आले तेव्हाही लागली होती म्हणाना ! घनःश्यामभाई ओझा मंत्रीमंडळाला खाली खेचून कांतीलाल घियाबरोबर लढत देऊन चिमणभाई अधिकारावर आले. त्यावेळी बरीच धावाधाव झाली होती. चिमणभाई आपल्याला पाठिंबा देणाऱ्या काँग्रेस आमदारांना स्वखर्चाने दिल्लीला घेऊन गेले. इंदिराबाईसमोर आपल्या संख्या शक्तीचे प्रदर्शन करण्यासाठी. मग कांतिलाल घियाही मागे राहायाला तयार नव्हते. त्यांनीही आपल्या कळपाची दिल्ली वारी घडवून आणली. सत्तेसाठी रस्सीखेच चालू होती. शेवटी स्वर्णसिंगांनी खास दूत म्हणून अहमदाबादला जाऊन समझोता घडवून आणावा असे ठरले. दिल्लीला गेलेल्या ७२ काँग्रेस आमदारांना घेऊन स्वर्णसिंग अहमदाबाद विमानतळावर उतरले. त्यावेळीही विद्यार्थी व प्राध्यापकांनी मिळून 'युवक नागरिक समिती' तयार केली होती. या समितीने विमानतळावर मोर्चा नेऊन काळी निशाणे दाखविली आणि काँग्रेसमधील या सत्तालालसेचा, स्वार्थासाठी एकाने दुसऱ्याचे पाय ओढण्याच्या वृत्तीचा निषेध केला. त्यांच्या घोषणा होत्या : लोकशाही जिंदाबाद, सत्ताखोरी, भ्रष्टाचार बंद करो ! बंद करो !

तोच विद्यार्थी आज जनतेचे नेतृत्व घेऊन रस्त्यावर आलाय. पुन्हा एकदा. नव्या वर्षाच्या सुरवातीला. निमित्त झाले मोरवी इंजिनिअरिंग कॉलेजच्या हॉस्टेलमध्ये अन्नखर्च वाढविण्यात आला त्याचे. विद्यार्थ्यांनी आपला निषेध व्यक्त केला जाळपोळ करून. तेच लोण अहमदाबादला पोहोचले. तीन जानेवारीला एल. डी. इंजिनिअरींग कॉलेजचे नोव्हेंबरचे बिल होते माणशी ७० रु. आणि डिसेंबरचे बिल आले ११० रु. विद्यार्थ्यांनी रेक्टरकडे तक्रार केली. रेक्टरने कॉन्ट्रॅक्टरला जाब विचारला. कॉन्ट्रॅक्टरने बाजारच्या किमतीकडे बोट दाखविले आणि पुढच्या महिन्याचे





कॉन्ट्रॅक्ट घेण्याचे नाकारले. विद्यार्थ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला. रेक्टरला मारहाण, घरातल्या वस्तूंची मोडतोड, हॉस्टेलचे सामान जाळले. रेक्टरने पोलिसला बोलावले. स्पेशल एस्. आर. पी आले. दंगलीसाठी खास शिक्षण दिलेले पोलीस. रोजचा पोलीस जनतेत मिसळतो. थोडाफार जनतेचा मित्र असतो. स्टेट रिझर्व्ह पोलीस जनतेपासून मुद्दाम दूर ठेवलेला. भावनांची काटछाट. किंचित् क्रूर. त्यांनी विद्यार्थ्यांचा समाचार घ्यायला सुरुवात केली. खोलीखोलीतून जाऊन विद्यार्थ्यांना मारले. या पोलीसी दमनाची प्रतिक्रिया उमटली. सारे विद्यार्थी एक झाले. नव निर्माण युवक समितीची स्थापना झाली. पोलिसी अत्याचाराविरुद्ध मोर्चे निघाले. १० जानेवारीला अहमदाबाद बंद ठेवण्यात आले. उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ११ जानेवारीला विद्यार्थ्यांचा प्रचंड मोर्चा अहमदाबादच्या रस्त्यावरून निघाला. नारे होते.

इन्किलाब झिंदाबाद !
लाठी गोलीसे सरकार
नहीं चलेगी नहीं चलेगी !

नव निर्माण समितीची एक्झिक्यूटिव्ह बॉडी निवडली गेली. सेनेटमधील विद्यार्थी-विद्यार्थीनींनी नेतृत्व स्वीकारले. मनीषी नानी, राजकुमार गुप्ता, भरत गढवी, शैलेश शहा, मुकेश पटेल, प्रशांत पटेल, पंकज पटेल, अशोक ढबूवाला, उमाकांत मांकड, अनेक तरूण मुले पुढे आली. गुजराथ विद्यापीठाच्या सेनेटहॉलमध्ये सभा भरू लागल्या, भाषणे सुरू झाली. मनीषी जानी विद्यार्थ्यांचा लाडका नेता बनला. त्याला आणि दुसऱ्या एका विद्यार्थी नेत्याला अंतर्गत सुरक्षा कायद्याखाली पकडण्यात आले. विद्यार्थ्यांचे आंदोलन तीव्र स्वरूप घेत होते. आणि मुख्यमंत्री चिमणभाई पटेल यांना विद्यार्थ्यांबरोबर बोलणी करण्याची निकड वाटू लागली. सगळ्या कॉलेजच्या जनरल सेक्रेटरींना मुख्यमंत्र्यांनी पाचारण केले. नेते गेले. टॅक्टीक म्हणून. आपली गाऱ्हाणी मांडली. मुख्यमंत्र्यांनी हॉस्टेलसाठी स्वस्त धान्याचा कोटा देऊ केला. फक्त आंदोलन मागे घ्या. मुलांनी होकार दिला एका अटीवर. दोघा नेत्यांची सुटका करा. मुख्यमंत्री पाघळले. मनीषी नानी आणि दोस्त याची सुटका झाली. आणि आंदोलन पुन्हा सुरू झाले. एच्. के. आर्टस् कॉलेजच्या १००० विद्यार्थी-विद्यार्थीनींनी मूक मोर्चा काढला. प्राचार्य यशवंत शुक्ल त्यामध्ये सामील झाले. मुख्यमंत्र्यांनी विद्यापीठाच्या कारभारात हस्तक्षेप करू नये, राजकारण खेळू








नये, अनेक मागण्या होत्या. त्या मोर्चावर लाठीहल्ला करण्यात आला. शांततेने आपला क्षोभ व्यक्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना सरकारने हिंसेने उत्तर दिले. विद्यार्थी अधिकच नाराज झाले. प्राचार्यांसह सर्व विद्यार्थी २४ तासाच्या उपोषणाला बसले. कोणत्याही शिक्षण संस्थेच्या इतिहासात अद्भूत असा हा प्रसंग.

आंदोलनाला गती मिळाली. विद्यार्थ्यांनी 'जनता कर्फ्यू' जाहीर केला. बाबूगेनूच्या अभिनिवेशाने रस्त्यातील वहानांपुढे आडवे पडून विद्यार्थ्यांनी जनतेला आपल्या बरोबर येण्याचे आवाहन केले. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या मुख्य विद्यार्थ्यांनी उपोषणाचे सत्र आरंभले.




जानेवारीचा तिसरा आठवडा. विद्यार्थी रोज नवनवीन कल्पना लढवीत होते. महाविद्यालये, शाळा सर्व बंद. वातावरण तंग होते. हॉस्टेलचा अन्नखर्च वाढला कारण महागाई. महागाई वाढली कारण भ्रष्टाचार. या भ्रष्टाचारी सरकारला हटवा. साठेबाजांना मदत करणाऱ्या सरकारला हटवा. विद्यार्थ्यांनी जनतेला दिशा दिली. आणि जनतेने आपल्यापरीने प्रतिसाद दिला. दुकाने फोडून, धान्य लुटून आणि शेवटी रिकाम्या दुकानांना आगी लावून.

एक दिवस सरगस निघाली. मिरवणूक. जनतेला धैर्य देण्यासाठी, एकजूट दाखविण्यासाठी आणि कोणाच्या तरी डोक्यात शक्कल आली. मिरवणूकीत बसेस हव्यात. जनतेची वाहने. झाले भराभर विद्यार्थी बसमध्ये बसले. ३६ बसेस हायजॅक करण्यात आल्या. पूर्वी हत्तींची शानदार मिरवणूक असे. आता नवा जमाना आला. जनतेने आपल्या वाहनावर









ताबा मिळविला. टपावर विद्यार्थी बसले. मिरवणूक गावातून फिरून विद्यापीठातील सेनेट हॉलवर पोहचली. आणि पोलीसांचे मारपिटाईचे सत्र सुरू झाले. टपावरून काढून विद्यार्थ्यांवर लाठ्या बसू लागल्या.

आंदोलनाने उग्र स्वरूप धारण केले होते. जमावाला पांगविण्यासाठी पोलीसही बेछूटपणे गोळीबार करीत होते अनेक निरपराध, निर्दोष, सामान्य माणसे मारली जात होती.




जेथे माणसे मेली तेथे लोक आपणहून दगडविटांचे स्मारक उभारीत होते. काही ठिकाणी पणत्या तेवत होत्या. काळे झेंडे फडकत होते. विद्यार्थी नेते शहिदांना अभिवादन करीत होते.



आणि सरकारला जाग आली. गेला महिनाभर स्वस्त धान्य दुकानावर खडखडाट होता. आता पोलीस बंदोबस्तात धान्याचे ट्रक्स शहरात पोचू लागले. भुकेने पेटलेल्या जनतेवर सरकारचा विश्वास नव्हता.

वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेले धान्याच्या ट्रक्सचे फोटो भूल करणारे होते. पुरेसे धान्य असूनही जनतेला मिळत नव्हते. पोलिसी दमन वाढत होते. जनता चिरडीला आली होती. जनतेकडून एम्. आर. पींना पत्थर मिळत होते. एम्. आर. पी. गोळ्या बहाल करीत होती. शेवटी लष्कराला पाचारण करावे लागले. कर्फ्यू जारी होती. १४४ कलम जारी होते. तरीही आग विझत नव्हती. २७ जानेवारीला लष्कराच्या गाड्या शहरात घुमू लागल्या. चिमणभाई पटेलांनी आकाशवाणी वरून लोकांना धमकावणी दिली : गडबड कराल, दंगल कराल तर याद राखा. लष्कर माझ्या साथ आहे.





पण अहमदाबादची जनता मानसिक तयारी करूनच लढ्यात उतरली होती. त्यांनी माघार घ्यावयाची ठरविले, परत उसळी मारण्यासाठी. लष्कराचे स्वागत केले. ठिकठिकाणी लेफ्टनंट जनरल आनंद कौल यांच्या गळ्यात हार घातले. अरे तू तर आमचा जवान ! आमचे रक्षण करण्यासाठी तू दूर सरहद्दीवर वैराण वाळवंटात रहातोस. तू तर आमचा मित्र. तुझे आमचे भांडण नाही. भांडण चिमणभाईशी आणि त्यांच्या चमच्या एस्. आर. पी. शी. लष्कराला जनतेने भावनेने जिंकले. लेफ्टनंट जनरल कौलही सद्‌गदीत झाला. त्याने शांतीचे आश्वासन दिले.

३० जानेवारी महात्मा गांधींचा निर्वाण दिन. शहीद दिन म्हणून तो दर वर्षी पाळला जातो. हजारो हारांनी जनता आपली स्मृती व्यक्त करते. यंदा १२ वाजेपर्यंत कर्फ्यू जाहीर झाली होती. सकाळी ८ वाजता रस्ता सुनसान होता. आणि अहिंसेच्या पुजाऱ्याच्या या चबुतऱ्याखाली चिमणभाईचे सैनिक बंदुका सरसावून उभे होते. हिंसेच्या विजयाचे प्रतिक चिन्ह दर्शवीत.

## गुजराथमधील भ्रष्टाचाराचे काही किस्से

१. घनश्यामभाई ओझांना खाली खेचून चिमणभाईंनी स्वतः मंत्रीमंडळ बनविले त्यावेळी काँग्रेस आमदारांचा पाठिंबा मिळविण्यासाठी साबरमतीच्या काठावर पंचवटी येथे दोन दिवस सर्व आमदारांचा तंबूमध्ये मुक्काम होता. कांतिलाल घिया प्रत्येकी १५००० रुपये देताहेत असं कळलं की चिमणभाई लगेच २०,००० रु. प्रत्येकी घेऊन यायचे. ही पैशाची देवाणघेवाण आणि पटवापटवी येथे झाली. म्हणून या भागाला लोक आता 'प्रपंचवटी' म्हणू लागले.

२. सात, आठ आर्टस व कॉमर्स कॉलेजं काढून पैसे उकळण्याची सोय केली.

३. चिमणभाईंना 'तेलियाराजा' म्हणतात. यंदा भुईमुगाच्या तेलावर २० टक्के लेव्ही बसवणार अशी चिमणभाईंनी जाहिरात केली. सौराष्ट्रच्या तेलगिरणीवाल्यांचे आणि व्यापाऱ्यांचे धाबे दणाणले. चिमणभाईंना तेच हवं होतं. त्यांनी सौदा करायचं ठरविलं. तेलवाल्यांनी ४५ लक्ष रुपये उत्तरप्रदेश निवडणुकासाठी द्यायचं कबूल केलं. चिमणभाईंनी लेव्ही माफ केली. आज देशातील ४० टक्के भुईमुगाचे तेल बनविणाऱ्या गुजराथमध्ये ७-४० रु. किलो तेलाचा भाव आहे.

४. चिमणभाईंनी १०५ काँग्रेस आमदारांचा पाठिंबा कसा काय टिकवून धरला आहे ? गुजराथ फर्टिलायझरच्या खतांचा एक सबंध ट्रक प्रत्येक आमदाराला नियंत्रित दराने मिळतो. खताची टंचाई असल्याने बाहेर तो ट्रक चढ्या भावाने विकला जातो. प्रत्येकी महिना १००० रु. चा नेट फायदा मिळतो अशी वदंता आहे.

५. धान्य राज्याबाहेर जाऊ नये यासाठी राज्यबंदी केलेली आहेच. चिमणभाईंनी शिवाय जिल्हाबंदी जाहीर केली. आणि या १०५ आमदारांना प्रत्येकी परमिट दिलं. सरप्लस–वाढीव धान्य असलेल्या जिल्ह्यातून धान्य विकत घेऊन दुसऱ्या जिल्ह्यात नेऊन विकायचे. या खास सवलतीमुळे टंचाईच्या दिवसात किती नफा उकळता येत असेल याची कल्पनाच केलेली बरी.

६. घनश्यामभाई ओझा गरीब माणूस होता. १९७२ मध्ये अहमदाबादला AICC सेशन भरणार होते. इतक्या लोकांची सोय करायची, राहण्याची, खाण्याची. पैसा कुठून आणायचा ? घनश्यामभाईंनी पैसे जमविण्याचे तंत्र माहीत नव्हते. त्यांनी चिमणभाईकडे धाव घेतली. चिमणभाईंनी आव्हान पत्करलं. फोनवरून भराभरा एक लाख रुपये गोळा केले. कारखानदार, गिरणीमालक यांची गेस्ट हाउसेस मिळविली. पाहुण्यांची राहण्याची सोय झाली. आणि चिमणभाईंचे चातुर्य दिल्लीच्या पाहुण्यांच्या नजरेत भरलं. ¤

# गणित एक


एक लिटर दुधाला तीन रूपये तर दोन लिटरला किती ?
दहा रूपये ! पैसे मोजून देईपर्यंत भाव तेवढा वाढलेलाच असेल !
१०


गिरण्या सुरू झाल्यावर तरी मुंबईचे वातावरण सुधारेल का ?
छे छे ! वातावरण फारच बिघडेल !!


महाराष्ट्रातील एका गावात पांच वर्षात एखादा खून होतो तर दहा वर्षात किती होतील.?
त्या गांवाचे नाव मानवत नसेल तरच उत्तर देता येईल
चिरंतन शांततेसाठी अहिंसेची बीजे मूळात कुठे रोवली गेली बरे ?
अर्थात गुजरात-अहमदाबादेत!
उयामजोशी-

# परसूच्या पशुकथा

वसंत सबनीस

## कथा दुसरी : रंगा

रंगा हे एका कोवळ्या सशाचे नाव होते. अनेक मार्गांनी मी त्याच्याबद्दलची खरी माहिती व प्रसंग गोळा केले. ज्यांना वन्य प्राण्यांच्या जीवनाची माहिती नाही त्यांना ही गोष्ट वाचताना असे वाटण्याचा संभव आहे की, मी गोष्ट सांगण्याच्या भरात सशाला मानवी गुण चिकटविले आहेत; पण ज्यांना त्यांचे जीवन कसे असते हे माहीत असेल त्यांना तसे वाटणार नाही.

सशांना वाचा नसते, परंतु इतर अनेक मार्गांनी म्हणजे पायाच्या आवाजाने, खुणांनी, वासाने व विशिष्ट हालचालींनी आपल्या कल्पना ते व्यक्त करतात.

वाकलेल्या गवताच्या झालरीमागे रंगाचे बीळ होते. ते सहज दिसत नव्हते आणि म्हणूनच त्याच्या आईने रंगाला तेथे लपवून ठेवले होते. कोवळ्या गवताच्या मऊ अंथरुणावर त्याला झोपवून ती बाहेर गेली होती. रंगा जागा झाला होता आणि बिळातून दिसणाऱ्या हिरव्या जगाकडे टक लावून पाहत होता. बाहेर खारी, नाकतोडे, पाखरे स्वच्छंदाने बागडत होती, विविध प्रकारचे आवाज करीत होती, पण रंगा जागचा हालला नाही. कारण आईची आज्ञा त्याला मोडता येत नव्हती. 'काहीही झाले तरी स्वस्थ पडून राहा. हालचाल करू नकोस' अशी तिची नेहमीची सूचना असे. आईचे नाव होते माली.

पण थोड्याच वेळात पाने चुरगळल्याचा विचित्र आवाज त्याच्या कानावर आला. तो आवाज चमत्कारिक होता. सारखा येत होता. क्षणभर दूर गेल्यासारखा वाटे व पुन्हा जवळ आल्यासारखा भासे. त्याबरोबर पायाचा आवाज ऐकू येत नव्हता. आपल्या आयुष्याचे तीन आठवडे रंगाने या रानात काढले होते, परंतु त्याने असला आवाज ऐकला नव्हता. तेव्हा साहाजिकच त्याची उत्सुकता फार वाढली. प्रसंगी निमूटपणे पडून राहणे ठीक आहे, पण पायाचा आवाज ऐकू येत नसताना बाहेर डोकावले तर त्यात धोका नाही, असे काहीसे रंगाला वाटले.

तेवढ्यात पुन्हा पानाची सळसळ अगदी जवळ जवळ ऐकू आली, पुन्हा लांब गेली आणि दूर दूर चालल्यासारखी वाटली. हा काय प्रकार आहे हे पाहिलेच पाहिजे असा विचार करून रंगाने हळूच डोके वर केले. तो उठून उभा राहिला आणि बिळातून बाहेर डोकावून पाहू लागला. त्याने हालचाल केल्याबरोबर तो विचित्र आवाज बंद झाला. त्याला काहीही दिसले नाही. म्हणून तो बिळाच्या बाहेर आला व दोनचार पावले टाकून पुढे गेला. समोर पाहतो तो त्याच्या पुढ्यातच एक प्रचंड काळा साप त्याच्याकडे नजर लावून पसरला होता.

त्याला पाहताच रंगाच्या उरात धडकी भरली! भीतीने बोबडी वळली, तो मागे वळून पळण्याचा विचार करतो न करतो तोच दोनच झेपात सापाने त्याला पकडले. रंगाच्या कानाला धरून त्याने त्याच्या शरीराभोवती विळखा घातला. हळूहळू सापाने आपला विळखा आवळण्यास सुरुवात केली. रंगा गर्भगळित झाला. धापा टाकू लागला. आईच्या मदतीसाठी किंचाळू लागला. असेच आणखी काही क्षण गेले असते तर रंगाचा आवाज कायमचा बंद झाला असता, पण तेवढ्यात एखाद्या सुटलेल्या तीरासारखी त्याची आई रानातून धावत आली. तिने रंगाची अवस्था पाहिली मात्र, तिच्या अंगात वीरांगनेचे रक्त उसळले. आईच्या मायेने तिला धैर्य दिले. ती तशीच त्या दुष्ट सापावर तुटून पडली. आपल्या पायाने तिने त्याला असा जबरदस्त तडाखा दिला की तो क्रूर शत्रू वेदनेने विव्हळला आणि फुस्कारू लागला. रंगाचा केविलवाणा आवाज तिच्या रागाचा पारा चढवीत होता. तिने एकसारखा सापावर मारा चालविला. मागच्या पायाने तिने त्याला लागोपाठ तडाखे देण्यास सुरुवात केली. दरवेळी अधिक जोराने तडाखे बसू लागले, तेव्हा सापाने रंगाला रोडून रंगाच्या आईवर मोर्चा वळविला. दरवेळी तो तिचा लचका तोडायला जाई, पण तिच्या अंगावरील थोडे केस निघण्यापलीकडे काहीही होत नसे. पण तिच्या माराने मात्र सापाला दोन ठिकाणी चांगल्याच जखमा झाल्या होत्या व त्यातून रक्त ठिबकत होते

लागोपाठ मिळालेल्या मारामुळे सापाचे शरीर खिळखिळे झाले होते. त्याने रंगाला सोडले. त्याबरोबर घाबरलेला, भेदरलेला रंगा तडक बिळाकडे पळाला. त्याच्या आईचा हेतु सफल झाला. यापुढे तिलाही झुंजण्याची इच्छा नव्हती. तिने सापाला सोडले. तो रखडत दूर निघून गेला.

त्या रानाच्या एका बाजूचा भाग जंगलाचा होता. बाकी सर्व शेते होती. इतर कुठल्याही श्वापदांचा त्रास तेथे नव्हता. फक्त अधूनमधून एक कोल्हा त्या भागात येत असे. त्यामुळे ते रान जवळजवळ माली व रंगा या दोघांच्याच मालकीचे होते असे म्हणायला हरकत नाही. त्या दोघांच्या नात्यातले असे कोणीच नव्हते. याच रानात मालीने आपल्या मुलाला सर्व प्रकारचे शिक्षण दिले. काहीही झाले तरी गुपचुप बसण्याचा रंगाचा पहिला धडा सापाच्या प्रसंगापासून पक्का झाला. लौकरच त्याच्या आईने दुसरा धडा शिकविला. तो म्हणजे निश्चलतेचा. शत्रूची चाहूल लागल्याबरोबर एकदम एखाद्या पुतळ्याप्रमाणे निश्चल व्हायचे. तिळभरही हालचाल करावयाची नाही.

दिनांक १।२।७४ च्या चित्र, वार्ता, पुस्तक पुरवणीत प्रसिद्ध झालेली परसूची पहिली पशुकथा ( राजा ) अत्यंत आवडली. त्या मालेतील उरलेल्या इतरही सर्व कथा वाचण्यास आम्ही अतिशय उत्सुक आहोत...
—यशवंत लाडे, सौ. सुधा लाडे व प्रवीण लाडे, दहिसर–मुंबई ६८

जंगलांतील प्राण्यांच्या शरिराचा रंग तेथील वनस्पती, दगड-धोंडे यांच्याशी जुळता-मिळता असल्यामुळे त्यांनी हालचाल केल्याशिवाय ते सहजासहजी ओळता येत नाहीत. ही निश्चल होण्याची युक्तीही रंगाने हळूहळू आत्मसात केली.

त्याचबरोबर आजूबाजूच्या झाडाझुडूपांची आणि वनस्पतीचीही त्याला ओळख झाली. तेथे एक विशिष्ट प्रकारचे काटेरी झुडूप होते. 'ते झुडूप म्हणजे तुझा उत्कृष्ट मित्र आहे' हे आईचे शब्द त्याने मनात कोरून ठेवले. मनुष्याने लावलेले काटेरी तारांचे कुंपण माली व रंगाच्या शत्रूंना फार खुपत होते. पण ह्या दोघांना याची भीती न वाटता उलट ते एक वरदानच वाटत होते. अनेक कोल्ह्या-कुत्र्यांची कातडी ह्या काटेरी तारांनी फाडली होती. परंतु मालीला त्या तारांचा अर्थ कळला होता आणि त्या तारा म्हणजे शत्रूच्या तावडीतून निसटण्याचा हमखास मार्ग हेही तिने रंगाला शिकवून ठेवले होते.

शत्रूने पाठलाग केल्यास कोणत्या युक्त्या योजावयाच्या, त्याला कसे चुकवायचे; कोणते गवत खावे आणि कोणते गवत खाऊ नये या गोष्टी रंगा शिकला. रंगाला भावंडे नसल्यामुळे मालीचे सर्व लक्ष त्याच्यावरच केंद्रीत झाले होते. जंगल–जीवनाचे जेवढे म्हणून तिला ज्ञान होते तेवढे तिने रंगाला शिकविले.

रंगा थोडा मोठा होऊन एकटा–दुकटा फिरू लागला तेव्हा मालीने त्याला सशांच्या संकेताची भाषा शिकविली. ससे नेहमी मागच्या पायाने जमिनीवर थप थप असा आवाज काढून एकमेकांना संदेश देत असतात. जमिनीवर केलेला आवाज फार दूरवर ऐकू जातो. जमिनीपासून पाच-सहा फूट उंचीवर केलेला आवाज ६० फुटांपेक्षा अधिक लांब जात नाही. पण जमिनीवर केलेला आवाज ६०० फूट तरी लांब ऐकू जातो. यामुळे ससे पायाने आवाज काढून संदेश पोचवू शकतात. एकदा 'थप् थप्' म्हणजे 'हुशार रहा' किंवा निश्चल हो, मंदपणे 'थप् थप्' म्हणजे 'इकडे ये' जलद 'थप् थप्' म्हणजे धोका आणि अत्यंत जलद 'थप् थप्' म्हणजे 'जीव वाचवण्यासाठी पळ,' असे त्यांच्या संदेशाचे अर्थ असतात, हे सूक्ष्म निरीक्षणानंतर ध्यानात येते.

रंगाला या संदेशाचे अर्थ कळू लागले. हळुहळू पुढच्या पायाने आपले शरीर स्वच्छ करण्याची कलालाही त्याला येऊ लागली. निरनिराळ्या प्राण्यांच्या वासाचेही त्याला ज्ञान झाले. अशा रीतीने थोड्याच दिवसांत सशाच्या जीवनास उपयोगी पडणाऱ्या अशा बहुतेक महत्त्वाच्या युक्त्या त्याच्या अंगवळणी पडल्या.

वन्य प्राण्यांचे स्वतःचे असे काही अडाखे असतात. काही काही बाबतीत ते इतर प्राण्यांवर भिस्त ठेऊन असतात, निरनिराळ्या शत्रूंना कसे गोंधळून सोडायचे याचेही ज्ञान त्यांना असते. उदाहरणार्थ निळाजय हा पक्षी खोडसाळ व चोरटा असला आणि तो मालीला व रंगाला मधून मधून उपद्रव देत असला तरी शत्रूच्या आगमनाची ग्वाही देण्याच्या बाबतीत त्याच्याइतका विश्वासार्ह दूत दुसरा सापडायाचा नाही; म्हणूनच मालीने रंगाला 'या पक्षाचा इशारा दुर्लक्षू नकोस.' अशी सक्त ताकीद दिली होती. कारण दोघांचेही शत्रू समान होते.

काटेरी तारांचा आश्रय घेण्याची युक्ती तर माली आणि रंगा यांची खास युक्ती होती. कुत्रा आणि कोल्हा पाठलाग करू लागल्यावर त्याला हुलकावण्या देत देत बरेच दमवायचे आणि मग एखादा उतार पाहून तिकडे धावायचे. उतारावर आल्याबरोबर कुत्रा किंवा कोल्हा आणखी जोराने पाठलाग करू लागतो आणि त्याचा फायदा घेऊन झटकन् तारांच्या कुंपणात अलगत शिरायचे. पाठलाग करणारा शत्रु हमखास त्या काटेरी कुंपणावर जाऊन आदळतो. प्रसंगी मरतोही. अर्थात् ही धोक्याची युक्ती फार थोड्या सशांना जमते, पण मालीने ती रंगाला चांगल्या प्रकारे शिकविली होती.

कोणताही वन्य प्राणी वयोवृद्ध होऊन मेला आहे, असें कधीही घडत नाही. आपल्या शत्रूला झुकविण्यात तो जितके दिवस यशस्वी होतो तितके दिवस त्याचे आयुष्य असते. मालीला व रंगाला क्षणाक्षणाला शत्रूचे भय होते, दररोज त्यांना अनेक जीव घेणाऱ्या संकटातून पार पडावे लागे. कुत्री, कोल्ही, रानमांजरे, सर्प, ससाणे आणि माणसे इतक्या शत्रूंच्या तावडीतून निसटून जीवन जगावायचे म्हणजे महा कठीण. दररोज एकदा तरी असा प्रसंग यावयाचा की, त्यांना आपली शक्ती आणि बुद्धी पणाला लावून स्वतःचा बचाव करावा लागे.

रंगाचा अनेकदा कुत्र्याने पाठलाग केला. कित्येकदा पाठलाग करणाऱ्या कुत्र्याला कोल्ह्याच्या दिशेने नेऊन कोल्हा दिसताच कुत्रा त्याच्याकडे वळला की, आपण निसटून जायचे असा धोक्याचा मार्गही रंगाला पत्करावा लागला. रानमांजरांनी त्याला अनेकदा पाण्यात पिटाळले. ससाण्यानी व घुबडांनीही त्याचा बऱ्याच वेळा पाठलाग केला. प्रत्येक संकटातून निसटण्याचा वेगवेगळा मार्ग होता. मालीने दिलेले धडे त्याला उपयोगी पडत होते. त्यात तो स्वतःच्या बुद्धीची भर घालून आणखी नव्या युक्त्या योजीत होता.

एक इसम आपल्या शिकारी कुत्र्याला पाठलागाचे शिक्षण देण्यासाठी त्याला रानात आणीत असे आणि बहुतेक वेळा माली किंवा रंगा यांच्यापैकी कोणीतरी त्याला दिसत असे. रंगाला त्या मूर्ख कुत्र्याची फजिती करण्यात एकप्रकारची गंमत वाटत असे. काही वेळा तो या खेळात अतिशय दमून जात असे. त्यावेळी तो मालीला

पाय आपटून संदेश देई आणि माली कुत्र्याचे लक्ष स्वत:कडे वेधून घेऊन त्याला पळवीत दूर नेई. नागमोडी धावून आणि वेडीवाकडी वळणे घेऊन कुत्र्याला गोंधळात टाकणे हा तर रंगाचा नित्याचा खेळ झाला होता. एकदा तर एका लाकडी ओंडक्याच्या आड रंगा लपून बसला असताना त्या कुत्र्याने त्याचा माग काढण्यास सुरुवात केली. पण रंगाने लपण्याच्या आधी अशा रीतीने उड्या मारल्या होत्या की, कुत्र्याला वासावरून काहीच बोध होईना. बरीच धडपड करून शेवटी तो गोंधळून परत गेला.

रंगाने आपल्या आईखेरीज दुसरा ससा पाहिला नव्हता. तो आई-पासून आता अधिकाधिक दूर राहत असे. कारण सशांना जोडीने राहण्याची हौस नसते. पण एके दिवशी रंगा दाट गवतात जमिनीवर पसरलेल्या वनस्पती तोडून आपला मार्ग मोकळा करीत असताना पलीकडच्या खडकावर एक नवा ससा त्याला दिसला. रंगाची आणि त्याची नजरानजर झाल्याबरोबर तो रंगाच्या रोखाने उड्या मारीत आला. त्याला पाहताच रंगाच्या डोक्यात संताप व द्वेषाची भावना भडकून उठली.

तो अनोळखी पाहुणा रंगाच्या जवळ आला. नंतर तेथे जवळच असलेल्या झाडावर त्याने आपली हनुवटी घासला. ते झाड मालीचे व रंगाचे होते. अशा झाडावर ससे आपली हनुवटी व मान घासतात, त्याला अनेक कारणे असतात. त्यामुळे त्या झाडाला सशाचा वास लागतो. असा वास लागला म्हणजे इतर परस्थ ससे ओळखतात की, येथे सशाचे एक कुटुंब राहात आहे. नव्या कुटुंबाला जागा नाही.

रंगाने नव्या पाहुण्याकडे पाहिले, तेव्हा तो आपल्यापेक्षा उंच, मोठा व सशक्त आहे हे त्याला आढळून आले. हा अनुभव रंगाला अगदी नवीन होता. खुनाची भावना त्याच्या मनात जागी झाली. थोडे पुढे सरकून त्याने आगंतुक पाहुण्यास पाय वाजवून संदेश दिला की, या रानाबाहेर चालता हो, नाही तर युद्धास तयार हो. पण त्या आगंतुकाने एकदा आपले कान ताठ करून रंगाकडे पाहिले आणि आपल्या पायाने आवाज करून रंगाचे आव्हान स्वीकारले.

शत्रुत्व पक्के झाले.

दोघेही एकमेकांचा अंदाज घेत हळूहळू पुढे येऊ लागले. शत्रू भक्कम व जाडजूड असला, तरी अक्कलहुशारीने वागणारा नाही; आपल्या शारिरीक बळावरच त्याचा भर आहे, ही गोष्ट रंगाने चटकन् ओळखली. अखेरीस तोच रंगावर चालून आला. रंगाही संतापून पुढे आला, उंच उड्या मारून आपल्या मागच्या पायांनी एकमेकांना ठोसे देण्यास सुरुवात केली, पण थोड्याच वेळात रंगाला त्याने लोळविले, आपल्या दातांनी रंगाचे लचके तोडले. रंगा उठेपर्यंत त्याच्या केसाचे कितीतरी पुंजके त्याच्या शत्रूने उपटून काढले होते. त्यातूनही रंगा चपळतेने दूर झाला. पण शत्रूने त्याला सोडले नाही. पुन्हा रंगावर त्याने हल्ला केला. पुन्हा रंगाला त्याने लोळविले. त्याचे लचके तोडले. शत्रूपुढे निभाव लागणे शक्य नाही याची रंगाला खात्री पटली आणि तो आपला जीव घेऊन पळाला.

तो पळाला तरी त्याच्या शत्रूने त्याचा नाद सोडला नाही. रंगाचा त्याने पुन्हा पाठलाग सुरू केला, पण रंगा पळण्यात तरबेज असल्या-मुळे आणि शत्रूला अवजड देहामुळे तितक्या जलद पळता येत नसल्यामुळे रंगा निसटला. तो जखमांमुळे हैराण झाला होता आणि दमलाही होता. पण त्या दिवसापासून रंगाने शत्रूची दहशत घेतली. आतापर्यंत त्याला मिळालेले शिक्षण इतर प्राण्यांपासून संरक्षण करण्यास उपयोगी पडले, पण स्वजातियाशी गाठ पडल्यावर काय करावयाचे हे त्याला कळेना. तो बावरला, गोंधळला. शत्रूच्या दृष्टीला पडावयाचे नाही आणि त्याने पाहिलेच तर सुसाट पळावयाचे एवढेच त्याच्या हाती राहिले.

मालीही या नव्या सशाच्या आगमनाने घाबरून–भेदरून गेली होती. ती रंगाला काही मदत करू शकत नव्हती. ती स्वत:च कुठे-तरी लपून बसत असे, पण तिलाही त्याने शोधून काढले. तिला मारण्याचा त्याचा हेतू नव्हता. उलट तो तिच्याशी लाडीगोडीने वागण्याचा प्रयत्न करीत असे; पण तिच्या मनात मात्र त्वेष आणि द्वेषच भरून राहिला होता. तथापी त्याच्यापुढे तिचे काहीही चालत नसे. त्याचे अत्याचार सहन करण्याखेरीज तिला दुसरा मार्गच उरला नव्हता, पण रंगाच्या बाबतीत मात्र त्या नव्या सशाने अत्यंत उग्र धोरण स्वीकारले होते. रंगाला ठार तरी करावयाचे किंवा त्या रानातून हाकलून तरी द्यावयाचे असा त्याने जणू निर्धारच केला होता. रंगालाही त्याच्या तावडीतून सुटण्याची आशा राहिली नव्हती. दुसऱ्या एखाद्या रानात जावे म्हटले तर जवळपास तसे रानही नव्हते. कुठे शांतपणे डुलकी घेण्याचीसुद्धा सोय नव्हती. तो रान-दांडगा शत्रू आवाज न करता केव्हा येईल आणि आपल्यावर तुटून पडेल याचा नेम नव्हता. दिवसातून १०–१२ वेळा तरी रंगाला त्याच्या तावडीतून निसटण्यासाठी जीव घेऊन पळावे लागे. त्यामुळे रंगाची स्थिती फार हलाखीची झाली. त्याच्या खेळण्याची – वागड-ण्याची जागा, चरण्याची जागा इत्यादी सर्व ठिकाणी नव्या सशाने आपली हुकमत बसविली. रंगाला कशाचाही उपभोग घेता येईना. चोरून, लपून कसेतरी जगावयाचे आणि त्या दुष्टाच्या दृष्टीस न पडता फिरावयाचे याचा रंगाला उबग आला. त्याची फार कुचंबणा होऊ लागली, पण यातून बाहेर पडण्यास मार्ग नव्हता.

हे संपणार तरी कधी ? रंगा थकून–भागून गेला होता. त्याच्या आईचीही हीच स्थिती झाली होती. तिचाही धीर सुटत चालला होता. कारण रंगाला मारण्यासाठी तो दुष्ट ससा काय वाटेल ते करण्यास तयार होता. ससे एकमेकांचा कितीही द्वेष करीत असले, तरी परका शत्रू आल्याबरोबर आपसातील शत्रुत्व विसरतात. पण ती वृत्ती या आगंतुक पाव्हण्यात नव्हती. एकदा एक बहिरी ससाणा त्या रानावर घिरट्या घालू लागला, तेव्हा या दुष्टाने स्वत: लपून राहून रंगाला मोकळ्यावर पळण्यास भाग पाडले. एकदोनदा बहिरी ससाण्याने रंगाला जवळ जवळ पकडले होते, पण त्याचे नशीब थोर म्हणून तो बचावला; पण जेव्हा ससाण्याने आपला रोख त्या दुष्ट सशावरच वळविला, तेंव्हा त्याने रंगाला ससाण्यापुढे ढकलण्याचा घातकी खेळ सोडून दिला.

ते रान सोडून दुसरीकडे जावे असा विचार मायलेकांच्या मनात आला. आईला आपला विचार कसा कळवावा याचा विचार करीत असतानाच एका शिकारी कुत्र्याचा आवाज रंगाच्या कानावर आला. तो आवाज ऐकल्याबरोबर रंगाने अखेरचा पण अत्यंत धोक्याचा व घातकी डाव टाकण्याचे ठरविले.

जाणूनबुजून तो शिकारी कुत्र्याच्या समोरून धावत गेला. त्या-

बरोबर त्या कुत्र्याने झेप घेऊन रंगाचा पाठलाग सुरू केला. पाठलाग जोराने व त्वेषाने होत होता. रंगाने रानाभोवती दोन–तीन फेऱ्या मारल्या. आपली आई लपलेली आहे याची खात्री करून घेतली आपला दुष्ट शत्रू स्वतःच्या नेहमीच्या लपण्याच्या जागी आहे हेही पाहून घेतले आणि रंगा थेट त्या दुष्टाच्या अंगावर पाय देऊन पुढे पळाला. रंगाने लाथ मारल्यामुळे संतापून त्याला लोळविण्याच्या इच्छेने नव्या सशाने रंगाकडे झेप घेतली मात्र, तोच काय प्रकार आहे हे त्याला कळून चुकले. रंगा व कुत्रा यांच्यामध्ये तो नेमका सापडला. कुत्रा मागून त्वेषाने येतच होता. त्या नव्या सशाला काय करावे हे सुचेना. अवजड शरीरामुळे जोराने पळताही येईना. कुत्र्याने रंगाचा नाद सोडला आणि नव्या सशावर आपला मोर्चा वळविला. त्याने निसटण्याचे सर्व उपाय केले, काटेरी झुडपाचा आश्रय घेतला, पण कुत्र्याने झाडीची तमा बाळगली नाही. रंगा व माली जवळच लपून बसले होते. झुडुप मोडल्याचा, झटापटीचा आवाज त्यांना ऐकू आला. त्याचा अर्थ रंगाला समजला. त्याचे सारे अंग शहारले. पण थोड्याच वेळात तो ते विसरला आणि ते रान पुन्हा आपल्या मालकीचे झाले या कल्पनेने आनंदित झाला.

एका संकटातून सुटका झाली तरी बाकीची संपली नव्हती. दरम्यान त्या रानाच्या मालकाने रान साफ करण्याची मोहीम हाती घेतली. बरीच झाडेझुडपे व गवत कापून रान साफ केले. त्यातच रंगाच्या व मालीच्या लपावयाच्या अनेक जागा उघड्या पडल्या आणि त्या दोघांच्या राज्याच्या सीमाही आखडल्या.

दिवस जात होते. रंगा एक दिवस आपल्या बिळाच्या दारात बसला होता. वाऱ्याबरोबर येणारा वास त्याला अस्वस्थ करीत होता. त्याला माहीत होते, पलीकडच्या शेतात कोबीचे गड्डे फुलले आहेत. आदल्याच रात्री त्याने कोबीवर यथेच्छ ताव मारला होता, पण लागोपाठ दोन दिवस एकाच ठिकाणी जायचे नाही, हा सशांचा बाणा तो विसरू शकत नव्हता. तो मुकाट्याने तेथून उठला आणि जेथे कोबीचा वास येणार नाही अशा जागी जाऊन बसला.

संध्याकाळ झाली, पण ती नेहमीची संध्याकाळ नव्हती. वारा जोराने वाहू लागला. आकाशात ढग जमू लागले. सर्व दिशा अंधारून आल्या. थंडीचा जोर वाढू लागला. मध्यरात्रीच्या सुमारास वाळलेल्या गवतावर आवाज करीत बर्फ पडू लागले. माली व रंगा एका आडोशाच्या जागी गप्प पडून होते. वन्य श्वापदासही शिकार करण्याचा त्या वातावरणात उत्साह वाटला नसता. पण एक कोल्हा मात्र शिकार धुंडीत फिरत होता. तो वास घेत ज्या झुडुपाखाली माली व रंगा पेंगुळले होते तेथे आला. सशांचे अस्तित्व त्याला जाणवले. तेवढ्यात मालीलाही त्याच्या पावलांचा आवाज ऐकू आला. तिने हळूच डिवचले. दोघेही जागी झाली. तेवढ्यात कोल्ह्याने झेप घातली. मालीने चपळतेने उडी मारली व ती त्या वादळी हवेत सुसाट पळत सुटली. ती पळाल्याबरोबर कोल्ह्याने तिचा पाठलाग सुरू केला व तेवढ्यात रंगा बाजूला सटकला.

मालीची पाठ कोल्ह्याने सोडली नाही. ती धावत धावत अखेरीस पाण्याच्या डबक्याजवळ आली. मागे वळणे शक्यच नव्हते. पुढेच जायला हवे होते. तिने आपले अंग पाण्यात झोकून दिले व ती झपाट्याने पाणी कापीत पुढे चालली. कोल्ह्यानेही पाण्यात उडी घेतली, पण वादळी रात्रीच्या थंडगार पाण्यातून पुढे जाता येईल असे त्याला वाटेना. तो परत फिरला. माली सरळ दुसऱ्या काठाच्या दिशेने निघाली, पण वारा तोंडावरचा होता. लाटा बर्फासारख्या गार झाल्या होत्या आणि हळूहळू पाण्यावर बर्फही साचू लागले होते. त्यामुळे तिचा मार्ग रोखला जात होता. समोरचा काठ फार दूर आहे असे तिला वाटले. न जाणो कदाचित तेथे कोल्हाही तिची वाट पाहत टपून बसलेला असेल.

पण तरीही जीवनाची आस फार प्रबळ होती. वारा आणि लाटा यांना न जुमानता आपली सर्व शक्ती एकवटून ती पोहत होती. जिवापाड कष्ट करून ती काठाच्या जवळ आली, पण तेवढ्यात बर्फाचा मोठा खडा तिच्या मार्गात आडवा आला. वाऱ्याचाही विचित्र–कोल्ह्याच्या आवाजासारखा आवाज येत होता. तो ऐकल्याबरोबर मात्र तिचे हातपाय गळाले आणि ह्या बर्फाच्या खड्यातून सुटेपर्यंत ती कितीतरी मागे गेली होती.

त्यातूनही ती पुन्हा पोहू लागली. काठ पुन्हा जवळ येऊ लागला. ती थकली होती. सर्व शरीर पेंगुळले होते. शक्ती गेली होती आणि झगडण्याची उमेदही मावळली होती. तरीही ती पुढे जाण्याचा प्रयत्न करीत होती. पलीकडे कोल्हा उभा आहे किंवा नाही याची तिला खंत नव्हती. आता काठ अगदी जवळ आला. पण त्याबरोबर दुर्दैवही जवळ आले. तिच्या भोवतीच बर्फ साठू लागले आणि तिला हालचाल करणे अशक्य झाले. पाय व शरीर गारठून गेले. रंगाच्या आठवणीने ती व्याकुळ झाली. पण इलाज नव्हता; पाय व शरीर थांबले. कान खाली पडले आणि मिटल्या डोळ्यांनी रंगाकरता तळमळत माली मृत्यूच्या आधीन झाली. बर्फाने तिला गिळून टाकले. वारा-वादळ चालूच होते.

पलीकडच्या काठावर कोल्हा नव्हता. रंगा पहिल्याने सटकला, तेव्हा गोंधळून गेला होता. नंतर त्याचा धीर परत आला, तेव्हा कोल्ह्याला आपल्या अंगावर घेऊन आईला मदत करण्यासाठी तो निघाला. माली पाण्यात गेली, तेव्हा कोल्हा त्या डबक्याभोवती फिरत होता. रंगाने त्याच्या जवळून हुलकांडी मारली. त्याबरोबर तो मालीचा नाद सोडून रंगामागे धावला. रंगाने त्याला झुलवीत, झुकवीत दूर नेले आणि शेवटी एका काटेरी तारांच्या कुंपणावर त्याला धडक घ्यायला लावून रंगा निसटला. थोड्या वेळाने तो आईच्या शोधास निघाला. डबक्यापाशी आला. आपल्या पायाने त्याने आवाज काढले. संदेश दिले. एकदा या बाजूला, एकदा त्या बाजूला. पण उत्तर आले नाही किंवा आई दिसली नाही ! कधीही दिसली नाही ! ती कुठे गेली हे त्याला समजले नाही. भांबावून तो वेड्यासारखा खूप हिंडला, पण आई भेटली नाही. त्या पाण्याने आपल्या बर्फाच्या हातांनी तिला आपल्या पोटात घेतली होती हे रंगाला कधीच कळले नाही.

मालीला वीरांगनेचे मरण आले. झगडता झगडता ती मृत्युमुखी पडली. ती गेली तरी रंगाच्या रूपाने जगत होती.

आता रंगा खूपच मोठा झाला. त्याने कोठून कुणास ठाऊक, एक तपकिरी रंगाची बायकोही मिळविली आहे. त्याचे कुटुंबही मोठे आहे. आपल्या मुलाबाळांना घेऊन रंगा आता आरामात त्या रानात आहे आणि मालीने दिलेले सर्व सर्व धडे तो आपल्या मुलांना शिकवीत आहे.



इक चादर मैलीसी ' चे कर्ते राजेंद्रसिंग बेदी हे एरव्ही मुंबईच्या पब्लिकला सिनेमावाले म्हणूनच परिचित आहेत. पंजाबचा माणूस थोडेफार बरे आणि जसदानी ढंगाचे लिहू लागला की तो मुंबईच्या फिल्म इंडस्ट्रीकडे ओढला जातो. रामानंद सागर, बलराज सहानी याप्रमाणे बेदी साबही मुंबईत सिनेमाधंद्यात आले, रुळले आणि पक्के मुंबईकर बनले. पण, बेदींची पाळेमुळे मात्र पंजाबच्या भूमीतून बाहेर पडली नाहीत. आपण एक पंजाबचे सरदारजी आहोत; ...याचा त्यांना तसा विसर कधीच पडत नाही. ' माणसाची बुद्धिमता जर त्याच्या अँटेना वर अवलंबून असेल, तर आम्हा सरदारजींची अँटेना किती भरगच्च असते, ' असे सरदारजींवरचे विनोद करता करताच, आपला मुलगा (आता आघाडीचा दिग्दर्शक) नरेंद्रसिंग बेदी याला पंजाबच्या भूमीचे काही आहे का अशी कथाही त्यांच्या मनात उपजलेली असते.

तर ' इक चादर मैलीसी ' ही अस्सल पंजाबच्या भूमीची कादंबरी आणि इथे तिथे काही लघुकथा वगैरे लिहून आपण काही फारसे भरीव वाङ्मयीन कार्य केले नाही, हे देखील बेदीसाबना वाटतच असते. ' इक चादर मैलीसी 'चा अकादमी पारितोषिकाने गौरवही झालाय पण, त्याला सपोर्टिंग इतकेच भरीव पुस्तक बेदीजी लिहितील, त्यावेळी ते त्यांच्या रसिक वाचकांचेही समाधान करून जातील आणि स्वतःचेही. तूर्त बेदीजी संवाद लेखनाकडून सिनेमा धंद्यात निर्मिती दिग्दर्शनाकडे वळले आहेत. दस्तक हा त्यांचा यशस्वी बोलपट. बेदीजी किती अस्सल आणि ओघवते संवाद लिहितात हे ' दस्तक ' चा नायक आणि नायिका यांच्यामध्ये एका पिंजऱ्यातल्या पक्षावरून संभाषण होते, ते ऐकल्यावर लक्षात येते. त्यांना संवाद लेखनासाठी फिल्म फेअर वगैरे पारितोषिकेही मिळाली आहेत. ते सोडा. त्यानंतर तर त्यांनी ' फागून ' हा पडेल चित्रपट काढून आपले हात भाजून घेतले. आता त्यांच्या डोक्यामध्ये ' इक चादर मैलीसी ' पडद्यावर आणण्याचे चालू आहे, असे ऐकतो. म्हणजे नवीन चित्र. एकूण नवीन वाङ्मयकृतीकडे वळण्याचे त्यांचे चिन्ह दिसत नाही. कदाचित त्यांच्या वयाला आज ५४ वर्षे झाली आहेत, म्हणजे त्यांचे वय आपली ' स्मृतिचित्रे ' लिहिण्या इतकेही झाले नसेल. पण पंजाबच्या भूमीतील लक्ष्मीबाईंच्या भाषेच्या गोडव्याने कोणी स्मृतिचित्रे लिहू शकेल तर बेदीसाबच. अर्थातच मुंबईची फिल्मइंडस्ट्री म्हणजे एरव्ही पंजाबी सुभाच असल्यामुळे बेदीजींना इथेही धर्मेंद्र सारखे आप्त भेटतातच. बेदीसारख्या फिल्मइंडस्ट्रीमधल्या सिध्या साध्या आदमीला हा फार मोठा दिलासा असतो. ते असतील तिथे त्यांची गप्पांची मेहफिल सुरू होते. सिनेमावाल्यांच्या पार्टीमध्ये, घरी किंवा सेटवर. एकदा मी त्यांना अशोक शहाणेबरोबर ' वासूनाक्या 'ची भेट मोठ्या रिलिजसली द्यायला घरी गेलो होतो. अशोकने मी ' पोर्नोग्राफिक पुस्तक लिहिल्याची ' वासूनाक्यासंबंधी माहिती दिली. ते दिवस दिवाळीचे असल्यामुळे बेदीजींनी मिठाईची पेश खिदमत केली. म्हणाले, ' मिठाई बाशी आहे. ही खाऊनही पोर्नोग्राफिक लिहिण्यास प्रेरणा मिळते '. फागून मधल्या पार्टीच्या सेटवर मी त्यांना असाच भेटलो. त्यांनी चहा मागवला. सेटवर मद्याचे चषक भरून पडले होते. माझी त्यांच्याकडे वेधलेली नजर बेदीजींनी अचूक हेरली नी म्हणाले, ' तुम्हाला मिळालाय तो खरा चहा आहे, त्या चषकात आहे, त्याला व्हिस्की असे म्हटले जाते. ' असे नर्म विनोदाने खुलवणारे हसवणारे, मेहफिल रंगवणारे बेदीजी सिनेमा धंद्याच्या मेहफिलीतून जरा दूर व्हावेत आणि कागद-पेन घेऊन वाचकांच्या मेहफिलीत यावेत, असे वाटत रहाते आणि मग बेदीजींना याद द्यावीशी वाटते, ' बेदीजी तुम्ही म्हणाला होता एकदा ना की 'चादर'ला पुरक असे आपण काही भरीव लिहिले नाही, ते कधी लिहिणार ?

**—भाऊ पाध्ये**

# रानो

## राजेंद्र सिंग बेदी यांच्या 'एक चादर मैली सी' या कादंबरीचा अनुवाद

## अनुवादक : वा. रा. कान्त

: १ :

संध्याकाळ. सूर्याची टिकली आज फारच लाल झाली होती. आकाशाच्या कोटल्यात कुणातरी निरपराध जीवाची हत्या झाली होती आणि त्याच्या रक्ताचे थेंब, बकाईनच्या झाडावर आणि तिथून तिलोकाच्या अंगणात ठिबकत होते. पक्क्या मातीच्या भिंताडापाशी जिथं सारीजणं घरातला केरकचरा आणून टाकीत असत तिथं—उकिरड्यावर ढव्वू कुत्रा आकाशाकडं तोंड करून रडत उभा होता.

आज दुपारी मोठ्या जेलखान्यातले नोकर कुत्र्यांना गोळ्या चारण्यासाठी आले होते. परंतु हा ढव्वू त्यांच्या तडाख्यातून वाचला. त्यावेळी तो तिलोक्याच्या अंगणातल्या घडवंचीखाली झोपून राहिला होता. घडवंचीवरले मुलतानी मातीचे माठ झिरपत होते. त्या झिरप्यानं खालची जमीन शीतल, सुगंधीत झाली होती. आणि त्या सुवासिक शीतळाईचा आनंद लुटीत, ढव्वूची स्वारी त्या घडवंचीखाली आरामात पसरली होती. थोड्या वेळानं तो उठला; सर्व शरीर ताणून त्यानं आधी एक आळस दिला, मग तोंड उघडून एक जांभई दिली अन् बाहेर पडला. त्याच्या प्रेयसीच्या डोळ्याच्या केव्हाच थिजून काचा झाल्या होत्या. ढव्वू तिच्या जवळ गेला, एक दोनदा हुंगून त्यानं तिचा वास घेतला. मग काही घडलंच नाही असा चेहरा करून तो एकदम दुसरीकडे वळला आणि तिथून निघून गेला.

तिलोकाची बायको रानो आणि तिची शेजारीण चन्नो एकमेकांकडं बघतच राहिल्या. चन्नोनं आपल्या बाकदार नाकावर आश्चर्यानं बोट टेकलं आणि एक लांब निःश्वास टाकून ती उद्गारली, 'सारे मेले एकसारखे ! पुरुषाची जातच अशी.'

रानोच्या पापण्या जडपणी फडफडल्या, धुऊन वाळत घातलेल्या कापडासारख्या. मग भानावर येऊन डोळे पुशीत तिनं चन्नोकडं पाहिलं अन् ती हसत म्हणाली, 'अग पण तुझा ढव्वू तर तसा नाही ना ?

या प्रश्नाला चन्नोनं सरळ उत्तर दिलं नाही. तिनं रानोला चक्क एक पुरुषी शिवी घातली आणि स्वतःशीच लाजून ती घरात पळाली. रानोदेखील घरात कामाला लागली. संध्याकाळी जेव्हा ती रात्रीच्या दुःखाचा आणि दिवसाच्या सुखाचा केरकचरा फेकण्यासाठी बाहेर आली, तेव्हा दुपारच्या सर्व घटना ती विसरून गेली होती. कचरा फेकल्यावर, हातातली केरसुणी ढव्वूवर उगारीत ती ओरडली 'हाड मेल्या, इथं कशाला रडतोस असा ? रडायचंच असलं तर समोरच्या चौधरीच्या घरी जाऊन रड. तिथं पैशाचे ढीग लागलेत अन् माणसांची रीघ लागलीय.'

राणीचं चौधरी मेहरबानदासाशी कुठलं वैर होतं कुणास माहीत ? राणीच्या घरवाल्याला, तिलोकाला मेहरबानदास चौधरींनीच वाममार्गाची दीक्षा दिली होती म्हणूनही कदाचित असं असेल. शिवाय गावातल्या बायकांची तऱ्हाच मोठी विचित्र असते. त्यांना आपल्या पुरुषांचा काही पत्ता नसतो, परंतु दुसऱ्यांच्या माणसाचं मात्र खाल्लेलं, प्यालेलं, सारं खडान्खडा माहिती असतं. टांगेवाल्या नबावाच्या नाहीतर गुरुदासाच्या बायकोकडनं राणीला जेव्हा आपल्या तिलोक्याच्या काही काही गोष्टी कळत तेव्हा संतापानं तिच्या अंगाची जळून नुसती राख होई. राख कसली कोळसा म्हणा. कारण राणी तशी आतून फार पक्की होती. तिलोका घरी आला की ती त्याच्याशी खूप भांडण करी. त्याला ती ओरबाडून काढीत असे चावत असे. अन् मग मार खाल्ल्यावर, एकीकडे बसून ती स्वतःशीच म्हणे एकारीनं बरंच म्हणायचं. आपला राग तो बाहेरच काढून येतो. माझ्या जिवाला ताप नाही.'

या मुळंच, केवळ या गोष्टी मुळंच आपला तिलोका खरा मर्द आहे असंही राणीला वाटायचं; आणि मग त्याला वश करून ठेवण्यासाठी ती झटे. प्रयत्न तरी कसले ? वठलेल्या पिंपळाच्या पारावर एक साईबाबा राहात होता. लोक म्हणत मोठा साधू आहे तो. नेहमी लोखंडी लंगोट लावून असतो. स्त्री ही काय वस्तु आहे हे त्याला माहीतदेखील नव्हतं. तरी अष्टौप्रहर सारखी स्त्रियांची गर्दी असायची त्याच्याभोवती. कोणी त्याला मुलं मागत, तर कुणी गर्भपाताची औषधं. पण आपल्या पुरुषाला वश करून ठेवण्यासाठी वशीकरणाचा ताईत मागणाऱ्या स्त्रियाच त्यात अधिक असत. काही महिन्यापूर्वी, ब्राह्मणाच्या पूरणदेवीला त्यानं वशीकरणाचा ताईत दिला होता. त्यामुळं ती पोटुशीही राहिली. एवढंच नव्हे तर तिचा नवरा, तो ज्ञानचंद तेव्हापासून सारखा वेड्यासारखा तिच्या भोवती नाचत असतो.

तिलोकाच्या मारहाणीपासून आपलं रक्षण व्हावं म्हणून राणीनं देखील त्याच्याकडून अंगारा आणला होता; आणि तिलोका अनुसूट दूध कधी प्यायला मागतो याची ती वाट पाहत होती. त्यानं दूध मागितलं की त्यात तो अंगारा घोळून द्यायचा अन् मग त्याला जवळ फटकू द्यायचं नाही. असं झालं की मग तो आपल्या विनवण्या करील, पाया पडेल, नाक घाशील अगदी—असे किती आठवडे गेले पण अजून तिलोकानं तिच्याजवळ दूध काही मागितलं नव्हतं.

रोज नसलं तरी, एक दोन दिवसाआड तिलोका गोड्या माल्टाची एक दारूची बाटली मेहरबानदासच्या घरून घेऊन येत असे. जगातल्या सर्व अपराधाला रानोजवळ क्षमा होती, पण दारू–छे, दारूसारखी सवत, दुसरी अवदसा संसारात नाही, अशी तिची खात्री होती. पुरुषानं आपलं सर्वस्व कसंही, कुठंही लुटवून टाकलं तरी त्यांच्याजवळ आपल्या स्त्रीसाठी काही ना काही तरी नक्की उरतं. पण दारू ! अगाई ग ऽ किती दुर्गंधी येते तिची ! माणसाला आपलं तोंडदेखील जवळ आणता येत नाही. असं वाटतं की, जगात आता आपलं काही राहिलं नाही. सर्वस्व हरण झालं आहे.

दिवसभर तिलोका नबाब, इस्माईल, गुरुदास यांच्याबरोबर टांगा हाकीत असे. परंतु संध्याकाळ झाली की त्या 'नशीबत'वाल्या अड्डयावर जाऊन उभा राही; आणि वाट चुकलेली एखादी सवारी मिळाली तर सुग्रास जेवण आणि मऊ उबदार अंथरूण यांची लालुच दाखवून तिला मेहरबानदासच्या धर्मशाळेत फुस लावून कसं नेता येईल याच्या फिकिरीत तो गढून जाई. खरं म्हटलं तर तो हे सारं मेहरबानदाससाठीच करीत होता. तसं त्याच्या पदरात काय पडत होतं ? एखादा मटन चॉप आणि एखादी माल्टाची बाटली. परंतु गावानं मात्र त्याचंच नाव बद्दू केलं होतं.

कोटल्यात यात्रा भरत असे. चौधरीच्या हवेलीच्या बाजूलाच देवीचं देऊळ होतं. काळ भैरवाच्या भीतीनं पळालेली देवी या गावात आली. दोन घटका तिनं तिथं विश्रांती घेतली त्या जागेवरच आज तिचं मंदिर उभं आहे आणि पुढं सियालकोट–जम्मूच्या डोंगरात जाऊन ती अदृश्य झाली. न्हाल्यासारखी स्वच्छ सुंदर सकाळ येते– त्यावेळी तुम्ही वायव्येकडच्या क्षितिजाकडं बघितलंत म्हणजे उंटाच्या आकाराचा जो डोंगर दिसतो ना तोच वैष्णवी देवीचा डोंगर.

तिलोका आज ज्या मुशाफिराला मेहरबानदासाच्या धर्मशाळेत सोडून आला होता, ती एक बारा तेरा वर्षांची कोवळी पोर होती. संरक्षणासाठी देवीजवळ त्रिशूळ होता. त्या त्रिशूळानं, देवीनं काळ भैरवाचा शिरच्छेद केला होता; पण या भोळ्या प्रवासिनीजवळ काय होतं ? गुलाबासारखे कोवळे दोन हात. ते ती त्या काळभैरवासमोर फक्त जोडू शकत होती. त्यांच्या सहाय्यानं आत्मरक्षण करणं तिला अशक्य होतं; आणि देह तरी किती नाजुक ! टरबुजाच्या फोडीनं घडल्यासारखा. मग ती मेहरबानदास चौधरीच्या सुरीपुढं कशी वाचणार ? म्हणूनच वाटतं, त्या दिवशीचा सूर्य रागानं इतका लाल लाल झाला होता; आणि आपल्या रथाच्या घोडयांना बेफाम पिटाळीत, फकिराच्या धर्मशाळेच्या विहिरीजवळील कापसाच्या शेतात कुठे नाहीसा झाला होता. वर आकाशात मागे राहिली होती ती फक्त वीजेची कोर–फिक्कट, पिळून काढल्यासारखी !

धर्मशाळेलगतच्या घराची नवी डागडुजी झाली होती. परंतु भिंतीच्या चेहऱ्यावरली ही नवलाई अंधारात वाहून गेली होती. विटांचा भगवा रंगही कुठं दिसत नव्हता; तरी त्यांच्या भेगांमधला चुना त्या दाट अंधारातही चमकत होता, हसत होता, चिडवीत होता. गढीमधली जांभळाची, लिंबांची सारी झाडं वाऱ्याच्या झुळकीनं झंकारत होती; आणि तलावाच्या बावा हरदासाच्या काठच्या वठलेल्या पिंपळाची काही तुरळक पानं त्या बेसूर झंकाराला ताल देत होती.

तिलोका जात होता तो रस्ता त्या गावच्या बाजारामधून आणि त्या बाजारातल्या वाण्याच्या एकुलत्या एक दुकानावरून पुढे जातो. या वेळी त्या दुकानावर जेहलम बागवानीण भाजी देऊन तिच्या मोबदल्यात गहू घेत होती. तिच्याजवळून जाता जाता, तिलोकानं तिला हाकारलं–

'अग ए, जेहलमे, काय विचार आहे तुझा मग ?'

जेहलमला अशा शब्दांची सवय झाली होती. गरीबाची बायको म्हणजे साऱ्या गावाची वहिनी. कुणीही तिची मस्करी करावी. जेहलमनं त्याच्याकडं वळूनदेखील बघितलं नाही. पिशवीत गहू भरून घेता घेता तिनं उत्तर दिलं, 'तुझ्या आईचा जो विचार तोच माझा. तिलोका! अरे, जन्मताच तुझं निःसंतान कसं झालं नाही म्हणते मी!'

तिलोका नुसता हसला आणि पुढं निघून गेला.

तो घरी आला. त्याची दोन मुलं लिंबाच्या झाडाखाली अंगणात कोळशाच्या रेघा ओढून घेडे खेळत होती. एकानं लंडी करून दुसऱ्याची गोटी बळकाविली. दोघांचं भांडण सुरू झालं. दोघांनीही मोठ्या माणसांच्या तोंडच्या शिव्यांचा एकमेकांवर मारा सुरू केला. कुणालाही त्यांचा अर्थ कळत नव्हता. पण त्यांचा आवेश काही कमी नव्हता. दोघांनी परस्परांचे केस धरून ओढण्यास सुरुवात केली. पण बापाची चाहूल लागताच ते पळाले आणि घरातल्या दिव्यासमोर बसून उर्दू मुळाक्षरांचं पुस्तक वाचण्याचा सपाटा त्यांनी सुरू केला. तिकडून बापाचा आवाज आला, तसा इकडे मोठा मुलगा वाचू लागला, 'ते पहा, घुबड बोलत आहे.'

त्यांचं हे सोंग तिलोकानं केव्हाच ओळखलं होतं. तो ओरडला, 'हरामखोरांनो, तुमचं हे सगळं नाटक मी ओळखतो.' याच वेळी धाकटा आपल्या धड्यातली वाक्ये घोकीत होता, 'बडबड करू नकोस. बडबड करू नकोस.'

तिलोका गप्प झाला एकदम. त्याच्या मते हे नवं शिक्षण म्हणजे एक असाध्य रोग होता.

बंतु–संतु या जुळ्या मुलांच्या आधीची त्याला एक मुलगी होती. तिलोकानं नि रानोनं, दोघांनी मिळून 'वडी' असंच तिचं नामकरण केलं होतं. केवळ हाक मारायला सोपं जावं म्हणून. ती दिवसभर आईच्या हाताखाली काम करायची. अन् काहीच काम नसलं की दहा-बारा महिन्यांच्या चुम्मूला खेळवायची.

वीर आया खेलके
मैं अन्न पकावा बेलके

'माझा बहाद्दर भाऊ खेळून आला आहे. त्याच्यासाठी मी मोठमोठ्या पोळ्या लाटीन.'

इतर वेळी ती गल्लीतल्या मुलींबरोबर चेंडू खेळत असे. पण त्यात देखील भाऊ, वहिनी ही मंडळी असायचीच.

कोठे उत्ते गन्ना, वीर मेरा लम्मा
भाबी मेरी पतली जिहदे नक्क मछली.

ऊस, वीर वहिनी, नाकातली मोरणी, बोडखा पिंपळ, दोडकी, दीरभाऊजी अशा जवळच्या, परिचयाच्या गोष्टींनीच तिचं विश्व भरलंसजलं होतं. भावजीच्या कल्पनेपर्यंतचं तिचं जग पसरलं होतं. पण हे जग धुक्यानं भरलेलं झाकलेलं होतं, अस्पष्ट होतं. अजून या घरातलं दुसरं एक माणूस मात्र झपाट्यानं शहाणं, समजूतदार होत होतं. तो

होता वडीचा काका, तिलोकाचा धाकटा भाऊ, रानोचा धाकटा दीर मंगल. निरुद्योगी आणि खोडकर. दिवसभर याची कुरापत काढ, त्याच्याशी भांड असा वेळ घालवायचा आणि घरी आल्यावर, चड्डी सावरीत, अशा ऐटीत जेवण वाढ म्हणायचा की, वाटावं, सारं घर ह्याच्याच कमाईवर चाललं आहे; आणि वहिनी-राणी आतून सुखावत पण वरकरणी रागावत त्याला म्हणायची, 'थांब, वाढते रानदांडग्या तुझ्यासाठीच तर केलंय हे सगळं.'

तिलोकानं राणीला पिवळी करून तिच्या माहेरातून आणलं त्यावेळी मंगल अवघा पाच-सहा वर्षांचा पोर होता. राणीचे आई-बाप फार गरीब होते. म्हणूनच वाटतं लक्तरात गुंडाळलेल्या आपल्या पोरीचं नाव त्यांनी राणी ठेवलं होतं. ती वाढली वयात आली; तेव्हा रोटी कपडयाच्या वायद्यावर, आईबापांनी तिचा हात तिलोकाच्या हातात दिला; आणि ते स्वर्गात चालते झाले. पुढला संसार असा तसाच होता, परंतु मागंही कुणी आधार उरला नव्हता, याचच राणीला फार दुःख होतं. कधीतरी अशी वेळ येते की, स्त्रीला मागं वळून आधार शोधावासा वाटतो. आणि असा आधार द्यायला कोणी नाही हे तिला जेव्हा कळतं, तेव्हा डोळ्यांपुढं अंधार दिसू लागतो. राणी जेव्हा या घरात आली तेव्हा तिला वाटलं सासूच्या रूपानं तिला आईच मिळाली. सासरा हुजूरसिंग तर बापासारखा वाटला. आणि तिचा धाकटा दीर मंगल तर इतका लहान होता की, वडीच्या जन्मानंतर तिच्याबरोबर दूध पिण्याचा हट्ट धरला त्यानं. एकदा कोणी जवळ नाही असं पाहून राणीनं त्याला जवळ बोलावलं, आणि सदऱ्यातून आपला स्तन बाहेर काढून, काहीसं हसत आणि काहीसं लाजत, तिनं तो त्याच्यापुढं धरला. तेव्हा तो बावरून पळून गेला.

राणीनंच मंगलला वाढवलं होतं. जगाच्या दृष्टीनं तो तिचा दीर होता. परंतु राणीच्या डोळ्यात तो तिचा सर्वांत वडील मुलगा म्हणूनच वावरत होता. मंगलदेखील राणीवहिनीला आपली आईच मानीत होता. नाहीतर आपल्या सख्ख्या आईला त्यानं आजी म्हणून कशाला हाक मारली असती? राणी कधी त्याचा कान पिळी तर कधी त्याला चापटचाही लगावी. परंतु गेल्या काही वर्षापासनं तिचं सारं जगच बदललं होतं. तिला मुलं झाली एवढाच एक फरक झाला नव्हता, तर मंगल आता तिच्यावर डोळे वटारू लागला होता. तिलोकी दारू पिऊ लागला होता; आणि तिची सासू जिंदा – तिनं तर कहाणीतल्या कजाग सासूचं रूप धारण केलं होतं. प्रत्येक गोष्टी-तून ती भांडण उकरून काढी आणि तिच्या अंगावर तुटून पडे. याचं खरं कारण असं होतं की, घरातले मिळकतीचे मार्ग बंद झाले होते.

इकडं तिलोका आठवडयातून तीन दिवस घरातच बसून राही. हुजूरसिंहाच्या डोळ्यात मोती बिंदू वाढला होता. तो खाटेवर बसून सारखा कानांनी पाहण्याचा प्रयत्न करीत असायचा; आणि त्याच्या डोळ्याच्या पापण्या, डबक्यात आंघोळ करणाऱ्या कबुतराच्या पंखा-प्रमाणं सारख्या फडफडत राहायच्या.

एका सुट्टीच्या दिवशी संध्याकाळी तिलोका रानोजवळ गेला आणि आपल्या सदऱ्याच्या खिशातून एक टमाटो हळूच बाहेर काढून तिच्या समोर धरीत तो तिला म्हणाला, 'घे हा आणि ह्याच्याबरो-बर एक कांदा पण कापून आण.'

रानो चुलीवरल्या भाजीला पळी देत होती, ती थांबली आणि पळी पातेल्यातच टाकून ती उभी राहिली, 'पुन्हा त्या सवतीला घरात आणलंत वाटलं?' तिनं विचारलं.

'अगं हे काही रोजचं थोडंच आहे रानो' तिलोका काहीसा ओशाळूनच बोलला.

'रोजचं असो की नसो, मी काही तुम्हांला पिऊ देणार नाही.' राणीनं आवाज चढवला, 'कुठं आहे तुमची ती बाटली. माझ्यात नाही असं काय तिच्यात आहे तेच मला आज पाह्यचंय.'

या आरडा ओरडीलाच तिलोका भीत होता. पण रानोनं शेवटी तेच केलं. तेव्हा तिच्या अंगावर धाऊन जाऊन दात ओठ खात तिला गप्प बसवण्याचा त्यानं पुन्हा एकदा प्रयत्न केला, 'कंजारणी, मी तुझ्याशी सांभाळून, जिभेला लगाम घालून बोलतो आहे अन् तू तर घोडीवर स्वार होऊन वाऱ्यावर उधळत आहेस.'

'हां हा,' रानोनं उत्तर केलं, 'घोडाघोडीवर बसायचं काम तुझं आहे. दुसऱ्या कुणाला जमणार नाही ते. पण आज मी या गोष्टीचा पुरा निकालच लावणार आहे. या घरात एक ती तरी राहील, नाही तर मी तरी राहीन.'

—आणि रानो धावतच बाटली शोधायला निघाली. आता तिलोकाच्या डोळ्यातली भीड, लाज सारी जळून गेली. धावणाऱ्या राणीला त्यानं केसानं धरून ओढलं. एका झटक्यात तिच्या बुचडयाचा काळाभोर पट्टा झाला. दिव्याची वात एकदम लहान झाली नी विझता विझता फिरून सरळ होऊन थरथरत उभी राहिली. बकाई-नच्या झाडावरली कबूतरे उडून गेली. ढब्बू एकदम छाती काढून उभा राहिला. पण हे काय चाललंय ते त्याला काहीच कळलं नाही. मग तो नुसताच भुंकू लागला. 'बापू ऽ' वडीनं किंकाळी फोडली. मुलं अंधार चाचपडू लागली. तो हाती न लागल्यामुळं एक घराबाहेर पळाला आणि दुसरा कोपऱ्यात दडून भीतीनं 'आँ ऽ आँ' करीत उभा राहिला. आई हा शब्दही त्याला उच्चारता येईना. हुजूरसिंह खाटेवरुन उठून शिव्या देत धावला, 'अरे बेशरमा, पाटचा, निर्लज्जा,' – त्याच्या शिव्यांत देखील याचनेचाच रडवा सूर होता. वाटेतल्या शेगडीला अडखळून तो पडला आणि भाजला.

पहिल्या झटापटीत राणीनं त्याच्याशी बरोबरीचा सामना दिला. तिनं त्याच्या हाताचा कडकडून चावा घेतला. रागानं आंधळा बन-लेल्या तिलोकानं तिला धरून भिंतीवर आपटलं; आणि शिव्या देण्याचा सपाटा सुरू केला. जनावरालादेखील जन्मात कोणी अशा शिव्या दिल्या नसतील. 'मारलं, मारून टाकलं आईला' वडीनं हंबरडा फोडला. तिचा ओरडा ऐकून जिंदा घरात येईपर्यंत वडीची शलवार भिजून ओली चिंब झाली होती. आत येताच ती म्हणाली 'ठाऊक होतं, मला. मला हे चांगलं ठाऊक होतं की एक दिवस ही बया अस्सा उजेड पाडणार आहे म्हणून. दरवेश्यांची ही औलाद कुठून आमच्या घरात घुसली कुणास माहीत!'

'तू मध्ये बोलू नकोस' मंगलनं आपल्या आईला बजावलं. नवरा-बायकोच्या भांडणात दुसऱ्यानं पडू नये असं त्यांचं म्हणणं होतं. एकीकडे उभा राहून मोठ्या कष्टानं तो स्वतःला आवरीत होता.

'का बोलू नको?' म्हातारीनं विचारलं 'तो आपल्या कमाईची पितो. हिच्या कमीन्या बापाकडे काही मागायला जात नाही तो?

स्वतः खपला आणि ही बला आमच्या गळ्यात बांधून गेला.'

आईची अशी फूस मिळताच तिलोका आणखीच भडकला. तिच्या अंगावरचे सारे कपडे फाडून त्यानं तिची अशी अवस्था करून टाकली की जणु काय आत्ताच आईच्या पोटातून ती बाहेर आली आहे. 'जा, निघून जा माझ्या घरातून' तो सारखा मोठमोठ्यानं ओरडत होता.

मारानं बेदम झालेली रानो म्हणत होती, 'नाही, मी राहात नाही. मला या घरात राहायचंच नाही मुळी.'

मातीच्या भिंतीजवळ काही अनोळखी चेहरे गोळा झाले. माळ्यावरही काही स्त्रियांच्या सावल्या चालत येऊ लागल्या.

'मारून टाकलं'

'अगाईगं ऽ मारलन् मेल्यानं'

'अरे कुणीतरी वाचवा, धावा'

'अयाई –हातर राक्षस आहे मेला'

असे शब्द माळ्यावरून येऊ लागले. सर्वजणी जीव मुठीत धरून उभ्या होत्या. खाली येऊन रानोला सोडवण्याचं धैर्य कुणालाच नव्हतं. जेहलम, तिच्या दोन मुली, ब्राह्मणाची पूरणदेवी, नबाबाची बायको आयेषा, चन्नो, विद्या, सरूपा साऱ्याजणी आपल्या घराच्या माळ्यावर येऊन थांबल्या होत्या. त्यांच्यापैकी फक्त चन्नो तेवढी मोठ्यानं किंचाळत होती, 'अरे वाचवा ऽ —कोणीतरी तिला वाचवा रे ऽ'

'खबरदार कुणी मला वाचवाल तर' वर पहात रानो किंचाळली, 'जा, तुम्ही साऱ्याजणी इथून जा. काय तुमच्यावर असा प्रसंग कधी येत नाही!' थोडं थांबून पुन्हा ती बोलू लागली, 'माझं काय व्हायचं असेल ते होऊन जाऊ दे आज. देवीच्या वाडीनं आज मोठं पुण्यकृत्य होणार आहे. ह्याच्या हातानं अहेव मरण येणार मला. स्वर्गात जाईन मी. माझी मुलं तेवढी रडतील माझ्या नावानं'

रानो त्या बायांना जायला सांगत होती अन बोलावीतही होती.

इतका वेळ एका कोपऱ्यात उभा राहून स्तब्धपणे हा सारा तमाशा पहात असलेला मंगल आता ताडकन पुढं झाला आणि त्यानं आपल्या वडील भावाचा हात वरचेवर पकडला. आईवरून एक घसघशीत शिवी घालून तो तिलोकाला म्हणाला, 'सोडव, सोडवून घे आता आपला हात. बस्स, एका स्त्रीवर हात टाकण्यातच संपली वाटतं सारी मर्दुमकी? खऱ्या औलादीचा असशील तर, ये असा पुढं–'

मंगलच्या भक्कम पकडीतून आपला हात सोडवून घेत तिलोकानं काही बडबड करण्याचा प्रयत्न केला परंतु मंगलच्या डोळ्यात चढलेलं रक्त पाहाताच तो एकदम चूप झाला. पण मंगलचं एवढ्यानं समाधान झालं नाही. पुढं होऊन त्यानं ती दारूची बाटली ठोकरून उडवली. बाटलीचे तुकडे तुकडे झाले. चोहीकडे दारूची घाण सुटली. माळवदाच्या काठावर उभ्या असलेल्या स्त्रिया 'शीऽ' करीत नाकावर पदर ओढून मागे सरकल्या आणि थोड्या वेळानं निघून गेल्या. तिलोक्यांतली हवा निघून गेली असं पहाताच मंगलनं आपण होऊन त्याचा हात सोडून दिला. तिलोका बडबडत चडफडत आपल्या खोलीत निघून गेला. परंतु त्याच्या अपशब्दात आता दगडाचा कणखरपणा नव्हता. कापसाचा विसविशीतपणा आला होता. आवाजातही पहिला आवेश उरला नव्हता. शिवीगाळीत तो आधीचा स्वयंस्फूर्तपणा नव्हता. पुस्तकातून वाचल्यासारखे त्याचे शब्द निर्जीवपणे बाहेर येत होते. रानो आत जाऊन ट्रंकेत कपडे भरू लागली. ती निघून जाणार होती. पण कुठं? ते तिलाही माहीत नव्हतं. पण तरीही ती चालली होती. देवा, दुस्मानालाही कधी मुलगी देऊ नकोस बाप्पा! थोडी मोठी झाली की तिला सासरी ढकलून द्यायचं. सासरची माणसं रागावली की त्यांनी तिला माहेरी लोटून द्यायचं. म्हणजे चिंध्यांचा चेंडूच ती जशी काही. आणि आपल्याच आसवांनी तो भिजला तर या फेकाफेकीसाठी देखील त्याचा उपयोग व्हायचा नाही.

कपडे तरी असे किती होते? एका क्षणात तिची ट्रंक भरून झाली. रानो खोलीतून बाहेर आली. आपल्याबरोबर दुसऱ्यालाही रडवीत ती बोलू लागली, 'घ्या, सांभाळा आपलं घर. मीच तेवढी परकी होते ना? चालले मी. सारं करील, मरेल अन वरून शिव्याही खाईल अशी कुणीही आणा घरात. मार खायचा, हाडं मोडून घ्यायची. इतक्यात 'राणीला आपली मुलं दिसली. रागाच्या भरात त्यांना ती विसरूनच गेली होती. 'हं. मुलं!' ती स्वतःशीच बोलत होती, 'मी म्हणेन जन्मलीच नाहीत ही कारटी! समजेन मेली सगळी–'

वडी जवळ आली. आईचा पदर धरून ती म्हणाली, 'आई–'

हिसका मारून रानोनं आपला पदर सोडवून घेतला. ती ओरडली, चल दूर हो मेले. तुझी देखील अशीच दशा होईल एक दिवस.'

आणि बाहेरच्या लांब-रुंद, अफाट जगाकडे जायला ती निघाली. अंधार असल्यामुळं, आकाशातल्या ताऱ्यांशिवाय तिला दुसरं काही दिसत नव्हतं. वरचा एकेक तारा पृथ्वीएवढा मोठा होता; आणि काही तर, पृथ्वीपेक्षाही मोठे होते; आणि ते तिच्याकडे पाहून डोळे मिचकावीत होते. काळ्या ढगाचा एक तुकडा आडवा आल्यामुळं बीजेची चंद्रकोर मधोमध भंगली होती.

मागनं मंगल धावत गेला आणि हात पकडून त्यानं रानोला थांबवलं, 'वहिनी, कुठं चाललीस? आणि मग आईकडं वळून बावरून तो तिला म्हणाला, 'आई, थांबव तिला.'

हात ओवाळीत जिंदा बोलली, 'जाणार आहे कुठं ती? काही आगा ना पीछा–'

'थांब, रानो थांब हुजुरासिंग ओरडला. अंदाजानं तिच्या दिशेनं सरकत तो जवळ आला आणि मागचा सदऱ्याचा भाग वर करून त्यानं तिला आपली पाठ दाखवली. त्याची पाठ शेगडीनं भाजली होती. चांगले फोड आले होते तिथे. ते दाखवीत तो तिला म्हणाला, 'बेटा, ह्या माझ्या भाजल्या अंगाकडं तरी पहा–'

रानोचा गळा दाटून आला. तोंडावर पदर घेऊन सद्गदित स्वरात तिनं हाक मारली, 'बापू ऽ'–या वेळपर्यंत त्रिलोकाची धुंदी पण उतरली होती. अनाथ असहाय माणसासारखा तो आतून बाहेर आला. दरवाजात उभा राहिला आणि खचलेल्या आवाजात बोलला 'जा, जा ना! पाहतो कुठं जातेस ते.'

'कुठंही जाईन. तुला काय करायचंय.' रानोनं रडत जबाब दिला, 'कुठंही जाईन. मोलमजुरी करीन अन् आपलं पोट भरीन. दोन रोट्यांना काही महाग नाही मी कोणाला?' गावात कुठंच जागा नसली तरी ती धर्मशाळा आहेच की!'

'धर्मशाळा!' तिलोका दचकला, एकदम पुढं येऊन त्यानं राणीची

ट्रंक हिसकली आणि तिला मागं ढकलीत म्हणाला, 'फिर मागं, जा मर तिथं.'

मागं-पुढं-स्वाभिमानी रानो पुष्कळ चडफडली, वडबडली. परंतु तिलोकाप्रमाणं, तिच्याही शब्दात आता जीव राहिला नव्हता. घरात राहता तर यावं पण त्याबरोबर माघार घेतली असं तर दिसू नये असा काही वहाणा ती शोधीत होती-आणि जायचं तरी कशाला? ती दळभद्री वाटली तर मेली कधीच फुटून गेली होती!

## : २ :

हुजूरासिंगच्या भाजल्या अंगावर राखेचा लेप लाऊन रानो परतली; पाय पसरून पडलेला तिलोका कसलातरी विचार करीत होता. तन्हा झोपण्यापूर्वी एकदा रडला. पण आईनं स्तन तोंडात कोंबताच तो गप्प झाला. तिलोकाच्या डोक्यात आता भांडणाऐवजी ती यात्रेकरीण शिरली होती. ती रात्रभर तिथून हलली नाही. त्या अंधारात तो स्वतः मेहरबानदास झाला होता आणि रानो झाली होती ती यात्रेकरू तरुणी. तिलोकानं तिला स्पर्श केला. तिनं त्याचा हात झटकून टाकला.

'अहाहा, कुकुलं बाळ आहेस नुसती' तिलोका किंचित चिडून म्हणाला, 'अगदी बारा-तेरा वर्षांच्या पोरीसारखीच करतेस तू. तशाच दुगाण्या झाडते आहेस.'

थोड्याच वेळात तिलोका काकुळतीला आला. विनवण्या करू लागला. अंधार होताच ज्याचा सारा ताठा गळून पडतो, अशा पुरुषांपैकीच तिलोका एक होता. मग त्यानं उठून चौकटीतून शिवाचं एक चित्र खाली काढलं. त्या चित्रात शिवाच्या मांडीवर पार्वती बसली होती आणि त्याच्या डोक्यावरील जटेतून गंगा वाहात होती. जवळ येऊन त्यानं रानोला ते चित्र दाखवलं ते अगदी तिच्या तोंडाजवळ धरून त्यानं शंभू महादेवाची शपथ घेतली; आणि पार्वतीच्या अमर प्रीतीची तिला आठवण करून दिली. पण रानो काही विरघळली नाही. तेव्हा त्यानं राधाकृष्णाचं चित्र खाली काढलं. चौकटीसह ते चित्र त्याला काढता आलं असतं. परंतु तो प्रत्येक चित्र फ्रेममधून वेगळं करीत होता. प्यालयासारखा, डोक्यात कसली तरी लहर आल्यासारखा तो वागत होता. शेवटी चित्राच्या नुसत्या चौकटीच भिंतीवर लोंबत राहिल्या. आतली सारी 'चित्रे तिथून गुप्त झाली होती.

रानो सकाळी उठली तेव्हा तिचं सारं अंग ठणकत होतं. उठवत नव्हतं तिला. परंतु घरातलं सर्व काम तसंच पडलं होतं. रात्री कुणीच जेवलं नव्हतं. त्यामुळं सैंपाकदेखील तिला लवकरच उरकायचा होता. पुन्हा घोडीसाठी दाणा भिजवायचा होता. तिचा जीनसाज काढायचा होता.

तिलोका नेहमीसारखा अर्धमेला होऊन झोपला होता. डोळे तसेच अर्धे झाकलेले, अर्धे उघडलेले आणि तोंड पूर्ण उघडं-वासलेलं. रानो त्याच्या कुशीतून उठली आणि आधी दिव्याजवळ गेली. दिवा घेऊन ती तिलोकाजवळ आली. मेलेल्या सापाकडं ज्या नजरेनं माणूस मागं वळून बघतं तसं तिनं दिव्याच्या प्रकाशात त्याच्याकडं पाहिलं.

तिलोका उठला तेव्हा रानोचं अधअधिक घरकाम संपलं होतं. तिच्याकडं बघताना असं वाटत होतं की, रात्री जसं काहीच घडलं नव्हतं. परंतु तिच्या हातातून घोडीचं साज-सामान घेताना नकळत तिलोकाच्या कपाळावर एक आठी चढली. त्याच्याकडं बघणाराला असंच वाटलं असतं की रात्री काहीच घडलं नाही. त्यानं रात्री माफी मागितली नव्हती, कान पकडले नव्हते की नाकानं जमिनीवर रेघोट्या ओढल्या नव्हत्या. सूर्याच्या किरणाबरोबर त्याची मर्दानी ऐट आणि अभिमान परत आला होता. घोडीवर जीन चढवताना, त्याचे घुंगुर किणकिणले, तिच्या डोक्यावरच्या पिसांच्या तुऱ्यातून वाऱ्याची एक लकेर झुळझुळत गेली. तेव्हा तिलोका म्हणाला, 'तू असं समजू नकोस की, मी तुला भितोय म्हणून.'

'मी कुठं काय म्हणतेय' रानोनं त्याला उत्तर द्यायचं टाळलं.

परंतु तिलोका काही गप्प बसला नाही, 'जे नामर्द असतात ते बायकांना भितात. गोडच्या मालटाची दारूची बाटली आज मी पुन्हा घेऊन येणार आहे. पाहतो कसं अडवत्येस ती!'

रानो काहीच बोलली नाही.

पण मनातल्या मनात तिनं निर्धार केला. 'आज यानं बाटली आणली तर गळ्यातले मणी चावून मी प्राण देईन; सांबराचं पूर्ण शिंग पोटात खुपसून घेईन; नाहीतर कुत्र्याचं विष खाऊन मरून जाईन. बौरीनं त्या दिवशी हीच गोळी खाल्ली आणि हा हलकट मेला त्या ढब्बूप्रमाणंच माझ्या प्रेताचा वास घेऊन पुढं निघून जाईल. नाही-नाही-एकदा तरी हुंदका देईल. माझ्यासाठी नसलं तरी आपल्या पोरांसाठी. पण छे, नाही नाही; कुणाचं काही जायचं नाही. आईबाप तेवढे आपल्या मुलीला मुकतील. पण, मला? आईबाप तरी कुठं आहेत मला? कुणी मागं ना कुणी पुढं! नाही, मी मरणार नाही. सासूला आनंद होईल. म्हणेल फार स्वस्तात सुटले.'

इतक्यात मंगल डौलात पुढून चालत गेला, तो आपल्या भावाच्या अगदी, जवळ आला दोघांनीही अनोळखी माणसासारखं, रोखून गुरगुरत एकमेकाकडं पाहिलं.

'पठ्ठ्या अगदी तयार झालाय' तिलोका आपल्याशीच म्हणाला आणि शेपूट घालून आत निघून गेला.

मंगल काही न बोलता निमूट बाहेर पडला. आई-बाप दोघंही परस्परांच्या जवळ येत आहेत असं पाहून बडी अंगणाकडं पळाली आणि लहानग्या भावाच्या शाळेची तयारी करण्यात गुंग झाली. पलीकडल्या खोलीत रात्रभर कण्हत पडलेल्या हुजूरासिंगाचा सकाळी सकाळी डोळा लागला होता. जिंदा हलक्या आवाजात जपजी साहेबाचा पाठ करीत होती.

थोड्या वेळानंतर टांगा सवाऱ्यासहित घरासमोर येऊ उभा राहिला. रानोनं नेहमीप्रमाणं चार जाड जाड रोटचा तुपानं मेणचट झालेल्या फडक्यात बांधून तिलोकाच्या हातात दिल्या. देता देता रानोनं टांग्याकडं दृष्टिक्षेप केला. बारा-तेरा वर्षांची एक पोर अर्धवट बेशुद्ध अवस्थेत आत बसली होती आणि मेहरबानदासचे हस्तक तिला सावरून धरीत होते. टांगा शहराकडं निघाला होता. रानोनं घाबरून विचारलं, 'कोण आहे ती? काय झालंय तिला?'

'आकडी' तिलोकानं उत्तर दिलं. तो थंडपणानं घोडीच्या पट्ट्याचं

बकल आवळीत होता.

नाकावर बोट ठेवीत रानोनं पुन्हा विचारलं ' आकडी ?'

' होय, आकडी ' तिलोकानं पुन्हा तेच उत्तर केलं, प्रत्येक स्त्रीला असा झटका येतो. तुला देखील रात्री असाच झटका आला होता. अन् त्यावरचा इलाज म्हणजे जोडा ! नंतर आतल्या फडताळाकडं बोट करीत तो पुढं म्हणाला, ' नाही तर दुसरं औषध म्हणजे तो तो चाबूक. आज संध्याकाळी घरी परत आल्यावर तुझ्यावर तो मोडीन. कालच नाथूनं त्याला नवी शाम लावली आहे.'

रानोचे पाय लटलट कापू लागले. तिलोका जाताच, तो दिसेनासा झाल्याबरोबर, तिनं कोणतं काम पहिल्यांदा केलं असेल तर तो चाबूक तिनं कोनाडयातून उचलला आणि सैंपाकघरातल्या रांजणात, गव्हाच्या राशीत, अगदी तळाशी खोल लपवून ठेवला.

अजून दुपार झाली नव्हती. इतक्यात समोरून चावडीकडनं, काही माणसं धावत येताना दिसली. त्यात नबाब व ईसमाईल हे टांगेवाले देखील होते. पूरनदेवीचा नवरा ज्ञानचंद आणि चक्कीचा मालक दिवाना यांच्याजवळ जाऊन नबाब त्यांना म्हणाला, ' अरे पंडित. ऐकलंस का तू ?'—आणि मग हळूच तो पंडिताच्या कानात काही कुजबुजला. त्याबरोबर ते सारे आपसात कुजबुजत तिलोकाच्या घराकडं बघू लागले.

एवढ्यात जेहलमचा जावई मुराद बख्श एका हातात तराजू आणि दुसऱ्यात दोशेरा घेऊन दुकानातून बाहेर आला आणि धर्मशाळेवरल्या विहिरीकडे जाणाऱ्या (शाही) जाटाला त्यानं अडवलं. मग जवळ जाऊन त्याच्या कानात त्यानं काही सांगितलं. तसे ते दोघेही इतरांबरोबर तिलोक्याच्या घराकडं वळून पाहू लागले. दरवाजात उभी असलेली रानो त्या सर्वांच्याकडं शोधक नजरेनं पाहात होती.

रात्रीच्या तहनाम्याचा तपशील विचारायला आलेली चन्नो तिच्या अंगाला झटून विचारीत होती, ' अगं सांगना, पुढं काय झालं ते ?'

रानोनं तिचं लक्ष समोर वेधलं; म्हणाली, ' आज या पुरुषांना काय झालंय कुणास ठाऊक ! सारे मेले इकडेच बघताहेत. निर्लज्ज कुठले !'

' हो, खरंच की ग.' मग चन्नोला थट्टा सुचली. तिनं विचारलं, ' पण का ते माहीत आहे का ?'

' का ?'

' रात्रभर मार खाऊन हाडं खिळखिळी झाली तरी तुझ्या रूपाला हा नवा बहर आलाय ना ? म्हणून !'

' अग सटवे, नवरा गिळी कुठची !' चन्नोच्या वेणीला हिसडा देत रानो बोलली. मग त्या दोघीजणी एकमेकांच्या कुल्ल्यांवर चापटचा मारीत, मोठ्यानं खिकाळत हसू लागल्या.

चौधरी मेहरबानदास आणि त्याचा भाऊ घनश्याम यांना हातापायात बेड्या ठोकून, बाजारातून मिरवीत नेताना जेव्हा रानोनं पाहिलं, तेव्हा तिच्या आनंदाला सीमा राहिली नाही. परंतु त्यांच्या बरोबर अठरा-एकोणीस वर्षांचा एक तरुणही होता. त्याचे कपडे रक्तानं भरले होते. त्याच्या तोंडावर, डोक्यावर चोहीकडं रक्त उडालं होतं. तारासिंग पोलीसपाटील आणि हवालदार जहानखाँ यांच्या आधारानं तो तरुण बेभान अवस्थेत हळू हळू पुढे चालला होता. मेहरबानदासचा रंग काळा ठिक्कर पडला होता. त्यामुळं त्याच्या कानातल्या बाळ्या अधिकच चमचमत होत्या. घनश्यामच्या डोळ्यावर माराचे काळे निळे घाव उठले होते; आणि त्याचा शेमली गळ्यात अशा प्रकारे लोंबत होता की, जसं काही तो बांधायला त्याला वेळच मिळाला नसावा. किंवा मारामारीत तो सुटून तरी गेला असावा.

' देव पावला ' रानो उद्गारली, ' साऱ्या गावाला गूळ वाटीन मी आज. साऱ्या जगाचे जावई व्हायला निघाले होते हे मेले — बरं झालं — आज सरकारचेच जावई झालेत.'

यावर चन्नो काही बोलणार होती. पण त्यापूर्वीच टाळ्या वाजवीत नाचत रानो म्हणाली, ' मी आज नाचणार आहे. गिद्दा नाचणार आहे.' दरवाजात उभ्या राहिलेल्या रानोनं मंदिराच्या कळसाकडं बघून हात जोडले. ' देवीमाते, आज तू माझं मागणं ऐकलंस. मंगल आहे आजचा दिवस. धन्य झाले मी.'

इतक्यात तिलोक्याचा टांगा येताना दिसला. पण तो टांगा गुरुदत्त हाकीत होता.

' अगं आई गऽ' रानो ओरडली. अन् मग त्या दिशेकडं भारल्यासारखी ती बघत राहिली.

टांग्यात कोणी झोपलं होतं. तिला वाटलं त्या आकडीवाल्या मुलीलाच काही झालं आहे. सर्व मिळून त्या मुलीला खाली उतरून घेऊ लागले. जवळ आणून तिच्या तोंडावरचं कापड दूर करताच रानोनं किंकाळी फोडली. ' नाहीऽ नाहीऽऽ' आणि ती घरात धूम पळाली. अन् चन्नो कपाळ व छाती बडवीत आपल्या घराकडं धावली.

तिलोक्याचा खून झाला होता. धर्मशाळेच्या विहिरीपाशी त्या तरुण यात्रेकरणीच्या मोठ्या भावानं तिलोकाला पकडलं आणि आपल्या दातांनीच त्याचं नरडं फोडलं. त्याच्या शरीरातला रक्ताचा शेवटचा थेंब झरून गेला तेव्हाच तिलोक्याच्या मानेत रोवलेले आपले दात त्यानं उपसून घेतले.

लोकांनी त्याला पकडलं. पण त्याला त्याची जाणीवच नव्हती. देवीच्या मंदिराच्या कळसाकडं पाहात, आपले दोन्ही हात उभारून उन्मादात तो नाचत होता. भक्तीच्या आवेगात बुडून गेलेल्या माणसाप्रमाणं बेभान होऊन तो गात होता, उड्या मारीत होता. मधूनच भ्रमिष्ठासारखा ओरडत होता, ' तुझ्यासाठी ! माते केवळ तुझ्यासाठी !' लोक मारीत बडवीत त्याला पुढे चालवीत होते. तरीही तो उच्च स्वरात देवीची भजनं गातच होता.

' माता रानी हे दरबार जोतां जगदियां
मय्या रानी दे दरबार जोतां जगदियां '

(देवी मातेच्या दरबारात ज्योती जळत आहेत. आई अंबेच्या दरबारात ज्योती फुलत आहेत) आणि ज्या ज्योतीची प्रभा त्याच्या वटारलेल्या डोळ्यांच्या काचात बिंबली होती. कधी त्याचा चेहरा पिवळा पडे तर कधी एकदम लाल केशरी होई. क्षणाक्षणाला वाढणाऱ्या त्याच्या भोवतीच्या गर्दीबरोबर तो देवळापाशी येऊन पोचला. देवळाशी येताच तो आनंदानं उड्या मारीत गाऊ लागला—

' हे भैय्या ! तूही सत्ते भैणा गोरियां
सिर लाल फुल्ला दिया जोडियां
भय्या रानी दे दरबार जोतां जगदियां '

(हे माते, तुम्ही सातजणी बहिणी सारख्याच गोऱ्यापान आहात. तुमच्या डोकीत लाल फुलांच्या वेण्या आहेत.)

रक्तानं भिजलेले आपले कपडे पिळून त्यातून ठिबकणारे रक्त तो आपल्या कपाळावर चोळीत होता. त्याच्याकडं पाहताना असं वाटत होतं की, प्रत्यक्ष देवी त्याच्या अंगात संचारली आहे आणि सूडाच्या दुर्विचार भावनेनं पेटलेली ती चंडरूपिणी आपल्या लाल अंगार डोळ्यांनी भैरवाकडं किंवा त्या तिलोक्याकडं पाहात आहे. क्षणात तो ओंडक्याप्रमाणे देवीच्या दारावर आडवा होई तर क्षणात पुन्हा उठून उभा राही. लोक घाबरून त्याच्यापासून दूर पळून जात. त्याच्या मनात आलं असतं तर त्या उन्माद अवस्थेत, किंचाळत, भजनं गात तिथून तो सहज निसटून जाऊ शकला असता. पण त्यानं तसं केलं नाही. आपणहून तो तारासिंह पोलीस पाटलाच्या स्वाधीन झाला. हा देखील त्याच्या वेडाचाच एक प्रकार होता.

ह्या प्रकारानं भोवतालच्या पंधरा-वीस गावांना धक्का बसला. कोटल्यात सर्वत्र खळबळ उडाली. अवकाळी ढगानं सूर्याला झाकोळून टाकलं होतं. सूर्यास्तापूर्वीच चोहोकडे काळोख पसरला होता. वैष्णवी देवीच्या मंदिराचे कळस तिलोकाच्या घरात डोकावून पाहात होते. लिंबाच्या झाडानं आपल्या पानांचा पसारा आवरल्यासारखा केला; आणि ढब्बू रडणं भुंकणं थांबवून दोन्ही पायात शेपूट घालून बसून राहिला.

हुजुरतसिंगच्या डोळ्यांना परमेश्वरानं अकस्मात पुन्हा दृष्टी दिली—आपल्या मुलाचं प्रेत पाहण्यासाठी. जिंदा घेरी येऊन पडली. दहाबारा तास तिचं रडणं ओरडणं बंद झालं.

रानो बाहेर पळत आली. पुन्हा आत गेली अन् फिरून बाहेर पळत आली. तिला काही कळत नव्हतं, उमगत नव्हतं. का कुणास माहीत, आपले सर्व दागिने, घालण्यासाठी, सारी वस्त्रं एकदम नेसण्यासाठी तिचं मन उतावीळ झालं होतं. ती तसं काही करणार इतक्यात चन्नोनं तिचे हात धरून भिंतीवर आपटले आणि तिच्या सगळ्या बांगड्या फोडून टाकल्या. पूरणदेवीनं बाहेरून मूठभर माती आणली अन् तिच्या भांगेत भरली. परंतु राणीला कशाचीच जाणीव नव्हती. ती फिरून आत गेली आणि गाभण कुत्री 'फूंऽफूं' करीत पंजांनी जमीन उकरते ना, तशी ती रांजणातली गव्हाची रास हातानं चिवडू लागली. रांजणातनं तो चाबूक तिनं काढून घेतला आणि धावतच ती बाहेर सर्वांच्या समोर येऊन उभी राहिली. वेड्या आवेशानं तिनं तो चाबूक आधी तिलोक्याच्या प्रेताला दाखवला अन् मग कडकन मोडीत ती किंचाळली, 'घे! मीच तुझा चाबूक आधी मोडून टाकला. मोठा आला होता माझ्यावर मोडायला—'

सर्वांना वाटलं राणी पागल झाली. ती वेडी झाली होती आणि नव्हतीही. वडी भिंतीशी उभी राहून मोठ्यानं आक्रोश करीत होती. तिच्या जवळ जाऊन आणि दोन्ही हातांच्या तळव्यांनी तिच्या डोक्यावर आघात करून, रानो ओरडली, 'सर्वांच्यावर दगडं पडतात, सर्वांना देवी मरीआई झडपते, साऱ्यांची मढी निघतात, पण तुला मात्र काही अडपणी होत नाही—' विद्या मध्ये पडली आणि तिनं वडीला तिच्या हातातून सोडवलं. त्या बिचारीचा काय दोष होता? पण नव्हता तरी कसा? का तिनं अशा बापाच्या पोटी जन्म घेतला? तो तिचं ऋण न चुकवताच निघून गेला होता. मग दारवंट्यात उभी राहून रानो स्वतःशीच ओरडली, रड, रड रड—नाहीतर सारं जग तुला हसेल. रड. पण तिला रडूच फुटत नव्हतं. ही मुलं आपली नाहीत, कुणा दुसऱ्याचीच आहेत असाही विचार तिच्या मनात आला, हे घरदेखील आपलं नाही. मग कोणाचं होतं ते? कांदा कुटून, त्याचा रस डोळ्यात घालून रडावं असं तिला वाटलं. 'रड सटवे रडऽऽ' पण कांद्याची आता गरज नव्हती. समोर बशीत तिला एक टोमॅटो दिसला. रात्री दारूच्या बाटली बरोबर तिलोकानं खायला आणला होता तो!

आता रानोचे बांध फुटले. गौरवून गौरवून ती रडू लागली, कपाळ, छाती पिटून घेऊ लागली; गावातल्या साऱ्या बायका तिला आवरीत होत्या आणि स्वतःही रडत होत्या. अंतःकरणाला घरं पाडणाऱ्या राणीच्या त्या हृदयभेदक शोकानं आकाशाची चाळणी झाली.

'आई' मंगलनं किंकाळी फोडली आणि भिंतीवर तो आपलं डोकं आपटून घेऊ लागला. इकडं रानो मोठ्याने विव्हळत होती 'अग रानो—सटवे, तुला आता कुणी उरलं नाही. कुणी मागं नाही की पुढं नाही. रांडे, बाजारबसवीचं तोंडही तुला उरलं नाही. तो धंदा करण्याची देखील तुझी लायकी नाही—'

## : ३ :

चौधरी मेहरबानदास, त्याचा भाऊ घनश्याम आणि हरीदास या सर्वांना सात सात वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा झाली. तसेच त्या तरुण यात्रेकरणीच्या मोठ्या भावाला, त्या कोवळ्या तरुणालादेखील तितकीच शिक्षा झाली. पोलीस पाटील तारासिंग आणि हवालदार जहानखां गुन्ह्याच्या जागी जाऊन पोचण्यापूर्वीच, लोकांनी तिलोक्याचं प्रेत तिथून हलवलं होतं; आणि खुनी तरुणानं हे कृत्य तात्कालिक प्रक्षोभाच्या आहारी जाऊन केलं, हा मुद्दा सिद्ध करण्यात प्रतिवादीचा वकील यशस्वी झाला होता. त्यामुळं त्या तरुणाची शिक्षा कमी झाली. परंतु बाबा हरिदासाला एवढ्या दीर्घ मुदतीची सजा व्हायचं काय कारण? कारण, त्याचा लोखंडाचा लंगोट शेवटी फाटक्या चिंधीचाच निघाला होता.

बावा हरीदासाला एवढी कडक शिक्षा झालेली ऐकल्यापासून, कोटल्यातील बायका एकमेकींचे चेहरे अधिक निरखून पाहू लागल्या होत्या, तिथे काहीतरी शोधू लागल्या होत्या. या शोधाशोधीत पूरनदेवी मात्र पकडली गेली. हिला सगळ्यात अधिक बडबड करायची सवय होती. शिक्षा ऐकताच, तिच्या तोंडातून नकळत एक दीर्घ निश्वास बाहेर पडला आणि डोळ्यात अश्रू उभे राहिले... पन्नास मैल अंतरावर असलेल्या वैष्णवी देवीच्या डोंगराची कृपादृष्टी जोपर्यंत कोटल्यावर आहे, गावातल्या मंदिराची छत्रछाया जोपर्यंत या गावावर पसरलेली आहे आणि इथली दयाळू धार्मिक माणसं जोपर्यंत या तळ्याच्या पाळीवर येणाऱ्या कबुतरांना दाणा-दुणा टाकताहेत, तोपर्यंत या कोटल्यात पाप घडणार नाही; आणि समजा घडलंच तर, तिलोकाला भोगावी लागली तसली शिक्षा भोगावी लागेल, असं आता त्या गावचे लोक बोलू लागले होते. चौधरीची हवेली,

त्याची जमीन जायदाद, साऱ्यांचा या खटल्यात लिलाव झाला होता. धर्म-शाळा पंचायतीच्या ताब्यात देण्यात आली होती. त्या दुर्घटनेनंतर सारे गावकरी अगदी भिऊन वागत होते. बाईकडे डोळा उचलून पाहायची कुणाची हिंमत होत नव्हती. तरीही गावच्या गजगामिनी आपल्या ज्वानीच्या मस्तीत ठुमकत ठुमकत रस्त्यातून जात असत तेव्हा सारेजण त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडं पाहात बसत आणि चालतांना खालीवर होणाऱ्या त्यांच्या नितंबाच्या लयबद्ध हालचालींना आपल्या नजरेचा ताल देऊ लागत. पण हे देखील फार थोडा वेळ चाले. कारण मूकपणे नजरेचा ताल धरण्याइतकं धैर्यही पुढे त्यांच्या अंगी उरत नसे.

हुजूरसिंगच्या हाडात पाणी जमा झालं होतं. तो मुकाटपणे म्हातारीच्या शिव्या ऐकत खाटेवर पडून राही, तर जिंदा त्याच्या मरणदिवसाची उतावीळपणे वाट पाहात होती. त्याच्यासाठी रडायला अधीर झाली होती. एकेकाळी हुजुरसिंगानं आपल्या बायकोला राणीसारखं वागवलं होतं. मोठमोठ्या शहरांतल्या राणीच्या बागा, म्युझियमं त्यांनी तिला दाखवली होती. परंतु आता तो निष्क्रिय, असहाय झाला होता, खाटेवर पडल्या पडल्या ग्रंथसाहेबाच्या नवव्या 'महाला 'तील 'शब्दा 'चा पाठ करीत तो बसे. या प्रकरणात संसाराच्या असारतेचं वर्णन केलेलं आहे. हे वर्णन गात असताना एक प्रकारचा विचित्र आनंद त्याला होई, धैर्य येई. जिंदाची किरकिर दिवसरात्र, चोवीस तास चालू राही. रानोला पाहताच तिचं अंग संतापानं थरथरू लागे. साळूप्रमाणं तिच्या सर्वांगावर काटे उभे राहत आणि रानोवर ती शिव्याशापाचा नुसता वर्षाव करी, 'रांड, डाकीण, बाजारबसवी माझ्या मुलाला गिळून बसली अन् आम्हा सर्वांना गिळायला टपलीय. तोंडही कुठं काळं करीत नाही मेली. जा, वाट फुटेल तिकडं जा. क्षणभरही इथं राहू नकोस. या घरात तुला जागा नाही आता. काही संबंध नाही तुझा इथं.'

रानो एक क्षणभरही तिथं राहिली नसती. परंतु तिचं पापी मन त्या मुलांच्या मायेच्या जाळ्यात अडकलं होतं. त्यानं तिला असहाय बनवलं होतं. सासू तिला घरातून काढण्याचा जितका प्रयत्न करी, तितकी अधिक ती त्या घराला चिकटून राहण्यासाठी धडपडे. सासूचे पाय धरी. जीवनातलं तिचं सारं मोलच आज एकाएकी हरपलं होतं. त्यामुळं ती झपाट्यानं झुरत होती, झरत होती. ज्या गोष्टी तिच्या शरीरातून गळून कमी होत होत्या त्या आता बडीच्या शरीरातून फुलू लागल्या होत्या. ती अंगापिंडानं भरत होती. तिची गात्रंन्‌गात्रं रानफुलांसारखी फुलून, सहजपणे हसत होती. कधी कधी त्या फुलाची एखादी पाकळी गळाली तरी त्या जागी दोन कळ्या उमलून येत. नकळत ती उत्साहानं फुलू लागे. चांदण्यारात्री गावच्या मुलांबरोबर खेळण्यासाठी निरागस उत्साहानं ती बाहेर पडे, उशीरानं घरी येई. घरी आल्यावर तिला चांगला मार मिळे. भाताच्या पेंडीसारखी तिच्या देहाची दशा होई. परंतु त्याचा तिच्यावर काही परिणाम होत नसे. कधी गरीबीमुळे तर पुष्कळदा मुद्दामच रानो तिला मळक्या, फाटक्या कपड्यातच ठेवी. नीट वेणी घालण्या ऐवजी तिच्या डोक्याचं इरलं करून टाकी. अशानं तरी कोणाच्या डोळ्यात ती भरणार नाही असं तिला वाटे. परंतु थोरलीचं तारुण्य त्या फाटक्या कळकट कपड्यांतूनही फुटून निघत होतं. चांगली गोरीपान होती ती. पुरो तर म्हणायची की, ही कोणा इंग्रजाचीच पोर असल्याचा संशय येतो. कुणी वाईट नजरेनं तिच्याकडं पाहात आहे असं वाटताच राणीच्या अंगाची आगआग होऊन जाई. ती मरण्यामारण्याच्या गोष्टी करू लागे; आणि शेवटी व्याकळून प्रार्थना करी—

'गोरा रंग न देई वे रब्बा
सारा पिंड वैर पे गया'

(परमेश्वरा, गोरा रंग नकोरे देऊ. सारा गाव वैरी झालाय)

बडीला लपवण्याचा रानो जितका यत्न करी, तितकं तिचं सौंदर्य त्या मळक्या लक्तरातून फुलून फुटून बाहेर येई. वाद्याचे सूर ऐकताच, त्याच्या नादानं आकृष्ट होऊन, चकित होऊन, खिडकीत येऊन उभे राहणाऱ्या अजाण बालकाप्रमाणं तिचं जीवन भोळं, निरागस होतं. ते भोळं, निष्पाप वागणं पाहून, मान हलवून रानो स्वतःशीच पुटपुटायची, 'या बापाविना पोरक्या पोरीचा शेवट काही बरा होणार नाही. एखाद्या दिवशी कोण्या दुस्मानाची नजर हिच्यावर पडली तर हिचं वाटोळं होऊन जाईल'— आणि भीतीनं राणीच्या अंगाचा थरकाप होई. तिला प्रदराची व्याधी होती. अंगावर पाणी गेल्यामुळं, चुलीवरील लोण्याच्या गोळ्याप्रमाणं तिचं शरीर झरू, विरघळू लागलं होतं.

रानोच्या हिशेबाप्रमाणं बडीच्या नियतीचा क्षण जवळ जवळ येत होता. या या माघी संक्रांतीपासून तिला बडीच्या 'न्हाण्याच्या' पाळीचा हिशेब ठेवावा लागत होता. एकदोन दिवसाचा फरक पडला तरी, आडवे–तिडवे विचित्र प्रश्न विचारून, रानो तिला जीव नकोसा करून टाकी. 'काल तिसऱ्या प्रहरी तू कुठं होतीस?' 'तिच्या घरून नंतर तू कुठं गेलीस?' 'कोण कोण भेटलं तुला देवळात? त्या पुरोहिताजवळ गुरुमंत्र का घ्यायला गेली होतीस? तो गुरुमंत्र कुठं नेऊन पोचवील तुला माहिती आहे? बावा हरिदासाचा विसर पडला वाटतं?' अगोदरच काळजी घेतलेली बरी म्हणून घरात 'काढा' देखील आणून ठेवला होता तिनं. असत्य आणि अधर्म यांना त्या काढ्यात ती उकळून–जाळून टाकणार होती. जिवाची अशी घालमेल करीत वाट पाहिल्यानंतर, बडीच्या यौवनाच्या झाडाला जेव्हा नव्यानं डाळिंबाचं फूल येई, तेव्हा कुठं रानोचा जीव भांड्यात पडे आणि बडीला शक्य तितक्या लवकर या घरातून बाहेर कसं घालवावं याचा ती विचार करू लागे. पण तिला दुसरं घर–दुसरं स्थळ पाहायचं म्हणज हुंडा हवा, पैसा हवा, अन् तिच्याजवळ तर फुटकी कवडी नव्हती. मग रानोला आठवे आपण स्वतः तर केवळ रोटी–घडा त्याच्या आश्वासनावरच तर या घरात आलो होतो ना? परंतु चांडाळ दैवानं तिच्या या मुलीला, मात्र अन्नवस्त्राचा वायदा न करता ह्या जिण्याच्या सासुरवासाला धाडलं आहे. अन् दर दुसऱ्या तिसऱ्या दिवशी डस्क्याला जाऊन सिनेमा पाहणारी ही हरामखोर तरणी पोरं!— त्यांना तर आपल्या आयाबहिणींचीही ओळख राहिलेली नाही. या कोटल्यातल्या साऱ्या मुली आपल्या बहिणी आहेत एवढी जाणीव त्यांना असायला हवी होती. असं असूनही, या पोरांपैकी कुणा एकाच्या हातात, तिनं आपल्या मुलीचा हात दिला असता आणि या साऱ्या काळजीपासून दिवसाच्या हिशेबापासून आणि भयशंकेतून ती मुक्त झाली असती. पण ही कार्टी तरी कुठं सुधी आहेत? सारे मेले लुच्चे, गुंड, हरामी. मेहरकरमदीनच्या बागेतल्या कच्च्या

कैऱ्या तोडणारे आणि अर्ध्यामुर्ध्या खाऊन, फेकून पळून जाणारे चोर, बेमान ! त्यांची निगा ठेवणारा एकही नव्हता. कुणास माहीत या बडीच्या नशिबात काय आहे ते ? बेरबारी का डस्का ! बुढ्ढा गोराया की जामकी ? की दूर लाहोर, पेशावर ? बसल्या बसल्या रानो, असल्या विचारांच्या गजानं, मोजून मोजून, बडीच्या विरहाचं अंतर कधी वाढवी तर कधी कमी करी. विचार करकरून तिचं डोकं कधी गरगरायला लागे तर कधी तिचं मन सुखाच्या ऊर्मींनी रोमांचित होई मग ती बडीच्या करवी कशिद्याचं सामान खाली काढून घेई आणि तिच्या आहेराच्या कापडावर कशिदा भरीत गुणगुणू लागे—

'सम्भना साहूरे चल्लना
सभ मुकलावनहार'

(सगळयांनाच एकेदिवशी सासरी जायचं आहे. एकेदिवशी सर्वांचाच साखरपुडा होणार आहे).

परंतु तिचा स्वतःचा साखरपुडा ? तिचं सासर ? ते तर आता तिचं माहेरच झालं होतं. तिच्या विचारांचे आणि कशिद्याचे धागे एकमेकात मिसळून त्यांचा असा गुंता होऊन जाई की, आपण गात आहोत ते गाणं जीवनाचं नसून मरणाचं आहे याचंदेखील तिला भान राहात नाही.

मग एकाएकी रानोला बरं वाटू लागे. उत्साह येई तिला. नसा-नसातून कसली तरी ओढ निर्माण होई. त्या ओढीनं तिच्या मज्जेतला धागा न् धागा ओढला जाई अन् मग सासरी जाण्यासाठी तिचं मन तळमळू लागे. या कोटल्यात येऊन रानोला किती वर्षं झाली होती ? परंतु सासरच्याविषयी विचार करण्याची तिलोकानं कधी संधीच तिला दिली नाही. सासर म्हणज काय ? सासर म्हणजे अंगभर पदर घेऊन लाजत लाजत चालणारी नववधू ! तिच्या स्वागतासाठी दाराच्या उंबरठ्यावर सरसोच्या तेलाची शिंपणी केली जाते. मागं वाजंत्र्यांचा आणि पुढं कौतुक भरल्या नजरांचा थाट; सासूचा उत्साह, सासऱ्याचा वत्सल मल्हार, 'गानी'चा खेळ, रुखवताची भांडी; सुनमुखाची घाई. आणि नंतर रात्रीचे ते मोगऱ्याचे गजरे—फुलांची शेज; पहिल्या रात्रीच्या प्रकाशातलं लाजाळूचं मिटणं आणि त्यानंतरचं फुलणं; तो रानटी कठोरपणा आणि त्यातूनच वाहणारी अथांग कोमलता !—पण छे ! हे सासर तिला कधीच सापडलं नाही. तिलोका तर तिला मारीत ओढीत इथं आणीत होता. हे तिचं सासर नव्हतं. लग्नानंतर प्रत्येक स्त्रीला जिथं जायची ओढ असते, विवाहाला अनेक वरसं होऊन गेली तरी प्रत्येकीला जिथं जावंसं वाटतं ते सासर हे नव्हतं. त्या सासरसाठी, त्या साखरपुड्यासाठी रानोचं मन आज फार व्याकुळ झालं होतं. पण आज—आज तर आपल्या मुलीला सासरी पाठवायचं आहे; तिचा साखरपुडा करायचा आहे. मग खरा साखरपुडा तरी कुणाचा ? तिचा का आपला ? आपला का आपल्या मुलीचा ? मग ते गाणं रानोच्या तोंडी एक वेदना होऊन राही. जिदाच्या किरकिरीनं त्याला अधिक करुण रूप येई. खिन्नपणानं रानो गाऊ लागे—

'चिच्चर बसे सहेलडी
जिच्चर साथी नाल'

'हा सांगाती आपल्याबरोबर आहे तोपर्यंतच ही सखी आपली सोबत करणार. प्राण आहेत तोपर्यंतच हे शरीर त्याला साथ देणार.'

यात भर म्हणजे म्हणजे तो उनाड हिरवट मंगल आणि त्याचा नशीबन्‌वाला तांगा स्टँड. तांग्याला घोडा जोडायचं मंगल शिकला होता. परंतु जबाबदारीचं जू आपल्या मानेवर घ्यायला तो अजून तयार नव्हता. मिळकत तर पूर्वीपेक्षा कमी झाली होती. आयुष्यात अचानक दचकून जागा झालेला मंगल भावनांच्या जंगलात हरवून गेला होता. मार्गातले खाचखळगे त्याला पुरतेपणी माहिती झाले नव्हते तरी त्यांची त्याला जाणीव होती. एखादी तरुण पोरगी त्याच्या समोरून गेली की आपोआप त्याच्या ओठांवर पुढील ओळी येत :

'नशे दिये बंद बोतले
तैनु पीनगे नशीबावाले'

(हे मदिरेच्या बंद बाटलीबाई, कोण भाग्यवान तुझा स्वाद घेणार आहे ?)

—आणि नशीबनवाला अड्ड्यावर तांगा हाकणारा मंगल हे विसरूनच जात असे की, घरच्या लोकांना रोज एक वेळ उपास काढावा लागतो आहे नि त्याची आपल्यावर काही जबाबदारी आहे.

याच वेळी जेहलम माळणीची धाकटी मुलगी सलामती आणि मंगल या दोघांची थोडी ओळख-देख झाली होती. भेंडी, वांगी आणि दोडकी यांच्यावर सलामतीचे हातपाय पोसले नव्हते तर, तिचा सारा देहच वेलीच्या हिरव्यागार कोवळ्या अंकुरासारखा वाढला होता, लवलवत होता. वाऱ्याची मंद झुळूक आली की, निंब-जांभूळ तर सोडूनच द्या, पण काटेरी बाभळीच्याही गळ्यात पडायला ती उतावीळ होत असे. एके दिवशी तिनं आपल्या वाटेनं जाणाऱ्या मंगलला हटकलं, 'ए मंगल, थांब ना जरा.'

तांगा हाकीत चाललेल्या मंगलनं घोड्याचा लगाम ओढला. तांगा थांबला. त्यानं सलामतीकडं नजर वळवून बघितलं. सलामती त्याच्या-जवळ आली अन् डोळे मुरडीत बोलू लागली, 'ए, मलाही जरा फिरवून आण ना एकदा.'

'हो, आणीन ना फिरवून.' मंगलनं तावडतोब होकार भरला. (बांदी किस्की और गहने किसके) कुणाची दासी आणि कुणाला दागिने मागशी.

'पण केव्हा ?'

'तू म्हणशील तेव्हा.'

इकडं तिकडं पहात सलामतीनं हळूच विचारलं, 'आज—आज रात्री ?'

'पण रात्री मी तांगा चालवीत नाही.' मंगल हसला आणि चाबूक उडवून त्यानं तांगा पिटाळला. 'सत्‌राह'च्या रस्त्यानं दोन तीन कोस पुढं गेल्यावर सलामतीच्या बोलण्याचा अर्थ मंगलच्या लक्षात आला. गावाच्या दिशेनं त्यानं तांगा वळवला. इतक्यात त्याला काही सवाऱ्या मिळाल्या. रात्र पडायला अजून आठ-दहा तासांचा अवकाश आहे, असा विचार करीत 'सतराह'च्या रस्त्यानं तो पुढं निघाला. घोडीला एक चाबूक लगावीत तो बोलला,

'चल माझ्या राजा शहरोशहरी.'

¤

संध्याकाळी मंगल घरी आला आणि त्या एवढ्याशा 'दमिष्क'चा (शहर) दुष्काळ पाहून आपला सारा इश्क तो विसरून गेला.सकाळ-

पासून घरी चूल पेटली नव्हती. बडीनं थोडा भात शिजवला होता. पण भुकेजल्या रानोनं तो साऱ्याचा सारा आपल्या ताटात ओगरून घेतला आणि तिखट मीठ न लावताच ओरपून टाकला होता. सासु-सासरे तर बाजूलाच राहिले, आपल्या लहानग्यांना देखील तिनं विचारलं नव्हतं. संतापलेली जिंदा धक्के मारून तिला घराबाहेर काढीत होती आणि रानो तो सारा मार दगडासारखा मुकाट्यानं सहन करीत होती. तिच्या मनात आलं असतं तर, म्हाताऱ्या जिंदाच्या शरीराचा आणि तिच्या आत्म्याचा संबंध सहज तिला एका हातानं तोडून टाकता आला असता. परंतु ती गप्प होती आणि कसल्या तरी अज्ञात भीतीनं तिचं सारं अंग कापत होतं.

हे दृष्य पाहून, मंगल अपराध्यासारखा बकाइनच्या झाडाखाली जाऊन उभा राहिला. आज त्यानं फक्त तेरा चौदा आण्यांचीच कमाई केली होती. मीठमिरचीसाठी देखील ते पुरेसे नव्हते. उलट दिशेला जाणारी एक सवारी त्याला मिळाली होती. आणि चांगला सव्वा रुपाया द्यायला तो तयार होता. सलामतीच्या मोहानं तो गावांकडं परतला होता.

हात धरून अडवीत मंगल म्हातारीला म्हणाला, "ताई, का तू रोज अशी या गरीबणीला छळतेस? का मारतेस तिला? का बाहेर घालवतेस? कुठं जाईल ती बिचारी?"

नवऱ्याच्या मृत्यूनं देखील जिच्या डोळ्यांत पाणी आलं नाही ती आता धाय मोकलून रडत होती. क्षण भरात. ती आपल्याच अश्रूंच्या पुरात बुडून गेली. एकीकडे ती रडत होती अन् एकीकडे म्हणत होती, "का जाऊं मी? कां? हे माझं घर आहे. काय केलं नाही मी ह्यांच्यासाठी? मुलांना जन्म दिला नाही की मुलींसाठी वेणा दिल्या नाहीत?"

"हा अपराध वहिनीचा नाही. माझा आहे" मधेच मंगल बोलला.

"तुझा अपराध कसा?" जिंदा कडाडली", जी आपल्या मुलांना विचारत नाही ती स्त्री दुसऱ्या कुणाची कशी होऊ शकेल?" मग रानोकडं वळून, हात जोडून, ती तिला म्हणाली, "वाहे गुरुसाठी, त्या परमेश्वरासाठी, निदान देवी मातेसाठी तरी तू आमच्यावर कृपा कर आणि इथून निघून जा, कुठंही काळं कर, पण तिकडंच मर, जा. कोणीही आंधळा, बहिरा मिळेल त्याच्याशी म्होतूर लाव पण आधी इथून काळं कर."

रानो उठली; आणि वळून अशा करुण दृष्टीनं तिनं जिंदाकडं पाहिलं की जणू तिचे डोळे असंच विचारीत होते. "तू जर जननी आहेस, प्रत्यक्ष जगन्माता आहेस. मग मला असं दूर का बरं लोटून देतेस? मी कशीही असले तरी तू मला जवळ घे, आधार दे मला. माझं आता या जगात कुणीच नाही ग. "—आणि याच भीतीनं दुपारी सगळ्यांच्या वाट्याचा भात ती खाऊन गेली होती. या घरात कसं राहावं कसं वागावं हेच तिला समजत नव्हतं. मुलं आता वाढली होती, मोठी झाली होती. अन् कायद्यानं ती मुलं तिची थोडीच होती? तिळेवयाची होती सारी ती.— आणि सासुसासऱ्यांनी, गाव-पंचायतीच्या लोकांनी त्यांना आपल्याबरोबर न्यायची परवानगी दिली असती तरी, त्या मुलांना ती कुठं नेणार होती? आपण भीक मागायची? आणि ह्या बाळांनाही भीक मागायला लावायची? बन्ता, सन्ता आणि ती बडी— छे. सर्वांवर तिची सारखीच माया होती. अजून त्या सर्वांना तिच्या प्रेमाची पाखर हवी होती. एकाला सोडायं म्हटलं तर दुसऱ्यासाठी तिच्या काळजात कळ उठत होती. ते सारे—बरोबर नेता येतील एवढे लहानही नव्हते आणि सोडून जावं म्हटलं तर सारे तितके मोठेही झाले नव्हते. रोज सासूची उठता लाथ आणि बसता बुक्की खाता खाता तिला आता असं वाटू लागलं होतं की, नवरा मेल्यावर बायकोला घरात राहाण्याचा मुळी काही अधिकारच नाही. घरात काय, या जगातदेखील राहण्याचा तिला अधिकार नाही.

तिची ही दुर्दशा चन्नोला पाहावेना. एके दिवशी सकाळीच ती रानोकडं आली आणि गळयात हात घालून ओढीतच तिला आपल्या घरी घेऊन गेली. भाजी आणि मक्याची रोटी तिनं तिच्या पुढं ठेवली. पण रानोनं नुसता तुकडा मोडला. पोटभर खाल्लं तर चन्नो पुन्हा आपल्याला बोलावणार नाही अशी भीती मनातून तिला वाटत होती. आपला 'मोढा' सरकवून, चन्नो रानोजवळ येऊन बसली आणि तिला म्हणाली, "बघ बाई, ऐकत असशील तर मी तुला आज काही सागणार आहे —"

रानोनं चन्नोकडं निरखून पाहिलं.

चन्नोनं आपलं बोलणं पुढं सुरू केलं, "हे बघ, ही तुझी सासू तुला काही जिवंत राहू देणार नाही. घरात तर मुळीच टिकू देणार नाही ती. तुला इथं राहण्याचा एकच रस्ता आहे—"

"कोणता? रानोनं विचारण्याचा धीर केला. चन्नो काय सांगणार आहे याची तिला काहीच कल्पना नव्हती.

"म्हणजे हाच— की— तूं मंगलशी लग्न कर, पाट लाव त्याच्याशी, त्याचा शेला पांघर."

"नाही" रानो ताडकन् उठून उभी राहिली." काय सांगतेस मला हे चन्नो?"

"मी बरोबरच सांगते आहे. मोठा भाऊ गेला तर—"

"नाही शक्य नाही ते" एका विलक्षण आवेगानं रानोच्या तोंडून शब्द बाहेर पडले. तिचं सर्व अंग थरथरू लागलं, "मंगल लहान आहे. बच्चा आहे. या मुलांच्यासारखंच मी त्याला पाळलं आहे. वयानं तर माझ्याहून दहा-अकरा वरसानं तो लहान आहे. नाही— हा विचारही मला सहन होत नाही."

आणि रानो तिथून धावतच घरी निघाली.

रानो घरी परतली तेव्हा मंगल घोडीसाठी दाणा घेऊन जात होता. आत जाता जाता तिनं मंगलकडे किंचित् निरखून पाहलं आणि "नाही नाही" असं मनातल्या मनात घोकतच ती घरात शिरली. आपल्या खोलीतल्या खाटेवर पडून नि पांघरूणात तोंड खुपसून ती मुसमुसुन रडू लागली.

थोड्याच वेळानं तांग्याचं सामान घेण्यासाठी मंगल आत आला. त्यानं आज सकाळीच कामाला लागायचं ठरवलं होतं. घरात फक्त तांदूळच नाही, तर गहूदेखील आणायला पाहिजे होते. पूर्वीसारख्या मोठ्या जाड जाड रोट्या घरात व्हायला पाहिजे आहेत. त्या रोट्यांनी सर्वांची पोटं कशी पटकन् गच्च भरून जात असत. हा भात म्हणजे, छे! एकदा लघवी केली की सारं साफ. पोट पुन्हा रिकामंच्या रिकामंच. जमलं तर एकादी चांगली भाजी देखील आणायला हवी. भाजीच्या नुसत्या नावानं त्याच्या तोंडाला पाणी

सुटलं होतं. काहीच नाहीं जमलं तर रोटीबरोबर थोडासा कांदा तरी– आणि वर एक दोन लसणीच्या कांड्या. मग विद्येच्या घरून थोडंसं ताक येईल. थोडंसं मीठ आणि तिखट टाकून, त्या ताकाबरोबर किती मजेनं रोटी खाता येईल. ह्या सार्‍यांच्या नुसत्या कल्पनेनंच तो मिटक्या मारू लागला होता. एका हातानं घोडीचा साज सावरीत त्यानं रानोला विचारलं, "घोडीचा तुरा कुठं आहे ?"

दचकून, रानो झटक्यात उठून उभी राहिली. मंगलकडं तिनं एकदा रोखून पाहिलं अन् मग दुसरीकडं नजर वळवून घाबर्‍या स्वरात ती मंगलला म्हणाली, 'मुलं-मुली तर शाळेत गेली आहेत.'

त्यानं थोडं बावरूनच रानोकडं पाहिलं आणि मग तो म्हणाला, 'आता मात्र हद्द झाली. मी घोडीच्या तुर्‍यासंबंधी विचारतोय तर तू आपली मुलाबद्दल बोलते आहेस.' मग आज रानोला झालंय तरी काय हे पाहवं म्हणून. पुढं होऊन त्यानं तिला हळूच स्पर्श केला.

राणी विजेसारखी कडाडत उभी ठाकली अन् किंचाळून म्हणाली, 'हं, हात लावू नकोस माझ्या अंगाला.'

मंगलनं घाबरून झटकन् हात मागे घेतला आणि तो आपल्या बोटांच्या पेरांकडे पहातच राहिला. तेवढ्यात त्याला घोडीची कलगी सापडली. ती घेऊन जाता जाता तो उद्गारला, 'इतकी शहाणी, समजूतदार तू पण अजूनपर्यंत त्या रात्रीची गोष्ट तू मनाला लावून घेतली आहेस, होय ना ?–आणि तांगा लावून तो बाहेर पडला,

रानो उठून दरवाजापर्यंत गेली. पाठमोर्‍या मंगलला पाहात उभी राहिली. 'हीर' गात चाललेल्या मंगलचा आवाज मंद होत होत त्याच्यावरोबर दूर दूर चालला होता–

'हीर आखियी, जोगिया झूठ बोले
कौन रूठडे यार मनांवदा ए
ऐसा कोई न डिट्ठा मैं ढूंढ थक्की
जेहडा गयां नूं मोड लियांवदा ए.'

(हीर म्हणाली, 'अरे जोगी, तू खोटं बोलतो आहेस. कोण करते रुसलेल्या प्रियकराची मनधरणी ? धुंडून धुंडून किती थकले आहे मी. जाणार्‍याला परत आणणारा कुणी कुणी भेटला नाही मला अजून.)

## : ४ :

रानोनं पूरनदेवीला सांगितलं. तिनं आपल्या नवर्‍याला, ज्ञानचंदला ती गोष्ट सांगितली. ज्ञानचंद गावचा सरपंच होता. सध्या तो गावातल्या भांडणातल्या जमीनींची विल्हेवाट लावण्यात गुंतला होता. उंच टेकाडं खणून आणि सखल जमिनीत भर घालून सगळी जमीन एकसारखी करण्याचं कामही त्यानं चालवलं होतं. मंगलच्या घरची सर्व हकीगत पुरोकडून ऐकल्यावर तो म्हणाला, 'बरोबर आहे तुझं म्हणणं. बिचारी रानो कुठे जाईल ? काय करील ?' थोडा विचार केल्यासारखं करून त्यानं पुढं विचारलं, 'पण मंगल रानोपेक्षा बराच लहान आहे नाही का वयानं ?'

'म्हणून काय झालं ?' पुरोनं उलट विचारलं, 'आता त्याला कोणती हीर मिळणार आहे ?' घरात खायला दाणा नाही की अंगावर चिरगुट धड नाही. उलट जमलं तर दोघांचंही काम होईल. दोघंही सुखी होतील.' मग पतीच्या जवळ येऊन, गावच्या त्या सरपंचाला घाबरविण्याच्या हेतूनं मुद्दामच ती हळू बोलली, 'अहो, ऐकलं का, तुम्ही ? त्याचं आणि सलामतीचं म्हणे – काही–' आलंय का तुमच्या कानावर ?'

'नाही, काही नाही..'

'मी तर म्हणते' पुरोनं आपल्या बोलण्याचा धागा पुढं खेचला, 'या बागवान मुसलमानांना गावातूनच घालवून दिलं पाहिजे. ती जेहलम आणि तिच्या त्या तीन मुली ! लग्नाच्या काय अन बिन लग्नाच्या, कुमारी काय – सार्‍या अशा फिरतात ! उंडारलेल्या कुत्र्याच मेल्या.'

'काय घडलं ते सरळ सरळ सांगशील की उगीच वायफळ बडबड करशील.' ज्ञानचंदनं उतावीळपणे विचारलं, 'काय झालं तेवढंच सांग.'

'म्हणजे अजून तसं काही झालं नाही. पण काहीतरी भयंकर घडणार–'

काहीतरी 'भयंकर' ऐकायला मिळणार म्हणून उत्सुकतेनं ज्ञानचंद तिचं बोलणं ऐकत होता. पण पुरोनं त्याची निराशा केली. मग मख्खपणे तो म्हणाला, 'अजून तसं काही घडलं नाही ना ? झालं तर मग. अन् समज तसं काही घडलं तर, मेहरबानदासचं जे झालं, त्या लोखंडी लंगोटवाल्या बाबा हरिदासचं जे झालं, तसंच यांचही होईल.'

पूरनदेवीनं मान खाली घातली. तिच्याकडं भेदक नजरेनं पाहात ज्ञानचंद पुढं बोलू लागला, 'आता फक्त पुरुषांनाच आपल्या कर्माची फळं भोगावी लागतील असं समजू नकोस. बायका जोपर्यंत समान हक्काची मागणी करीत नव्हत्या तोपर्यंत सारं ठीक होतं. आता... आता घ्या तुमचे समान हक्क !'

'एक विचारू ?' पूरनदेवीनं वेगळाच विषय काढला, 'तुम्ही त्या जेहलमला धर्मशाळेत का बोलावलं होतंत ?' बाबा हरिदासाच्या नावाच्या उल्लेखाचं शल्य तिच्या मनात सलत होतं.

'धर्मशाळेत नाही काही, मेहर करमदीनच्या बागेत बोलावलं होतं तिला.' बोलताना सुरुवातीला ज्ञानचंद थोडासा चाचरला, अडखळला, मग काहीसा विचार करून पुढं म्हणाला, 'मुसलमान नाही का ती ? मग धर्मशाळेत कसं बोलावता येईल तिला ?'

'अस्सं. म्हणजे धर्मशाळेची करमदीनची बाग झाली का आता !'

'उगीच मूर्खासारखं काहीतरी बडबडू नकोस. बागेतल्या केळ्यांची चोरी नव्हती का केली तिनं ?'

'हो ! पण ती केळीं तुमच्या बागेतून थोडीच तोडली होती तिनं ?'

'आपलं कुंपण मजबूत होतं म्हणून ठीक.' ज्ञानचंद हसत हसत बोलला, 'नाहीतर तिनं काही कमी केलं नसतं.'

'कुंपण मजबूत होतं की येणार्‍या जाणार्‍यांनी ती पूर्वीच तोडून नेली होती कुणास माहीत ?'

ज्ञानचंदचा चेहरा काळवंडला. पूरनदेवीची नजर टाळीत तो म्हणाला, 'बरं बरं, मंगलविषयी तुला काही सांगायचं होतं ना ?'

'मंगलविषयी नाही काही रानोविषयी' पुरननं त्याला अडवलं

'बरं, रानोविषयी का होईना?' ज्ञानचंद मुद्यावर आला, 'मला वाटतं, मंगल बरोबर तिने पाट लावावा. असंच करावं तिनं. गावात आलेल्या स्त्रीनं बाहेर का म्हणून जावं? तिनं दुसरीकडे संबंध जोडले तर त्यात या गावच्या पुरुषांची बदनामी अ हे.'

मग कामावरल्या मजुरांकडे वळून तो ओरडून म्हणाला, 'अरे गबरूंनो, सगळी जमीन सारखी करा. कुठंही उंचनीच राहू देऊ नका.'

ते धट्टेकट्टे तरुण मजूर कुदळी फावडे घेऊन वेगानं आपल्या कामाला लागले. तेल पिऊन पीळदार झालेले त्यांचे दणकट स्नायू दूरपर्यंत हवेत हालताना दिसत होते; उन्हात चमकत होते. त्यांच्याकडे पाहताना ज्ञानचंदच्या मनात विचार आला, 'आपल्या पंजाबात जिथं स्त्रियांची संख्या आधीच कमी आहे, तिथं पुरुषांपासनं त्यांचे न्याय्य हक्क का म्हणून हिरावून घ्यायचे? एखाद्या स्त्रीला का उगाच झुरत, सडत पडू द्यायचं? गावच्या पंचायतीशी आणि हुजुरासिंगच्या भाटिया भावकीशी, या संबंधात वेगवेगळी बोलणी करण्याचा विचार त्यानं मुक्रर केला आणि त्याप्रमाणे त्यांच्या भेटी घेण्यासाठी तो लगबगीनं निघाला.

□

मंगल घरी नसताना, काही माणसं बडीला पाहायला घरी आली. भोळ्या निष्पाप बडीला यातलं काही समजत नव्हतं. आजीनं सांगितल्याबरोबर बडी चन्नोच्या घरी धावत गेली आणि पाहुण्यांसाठी बर्फी घेऊन आली. या बर्फीत खवा कमी आणि साखर जास्त होती हा भाग निराळा. एक शेर खव्याची पाच शेर बर्फी हे नफेबाज तयार करीत असत; आणि शहरातल्या या रोगाची लागण आता खेड्यापाड्यातून देखील होऊ लागली होती...

ते तिघेजण होते, एक होता मध्यम वयाचा, जवळ जवळ म्हाताराच म्हणा ना; आणि दुसरे दोघे तरुण होते. त्यांच्यापैकी एकजण तर त्या म्हाताऱ्याच्या मुलासारखा दिसत होता आणि दुसरा बहुतेक त्याचा मित्र असावा. कदाचित तो त्याचा भाऊ देखील असेल; आणि त्याचं रूप कदाचित बापाच्या वळणावर गेलं नसेल. आजीच्या खाणाखुणाप्रमाणे ते बडीची सारी हालचाल निरखून पहात होते. आतबाहेर करताना, चालताना, उठताना, बसताना होणाऱ्या थोरलीच्या अंगविक्षेपावरून त्यांच्या नजरा सारख्या भिरभिरत होत्या. नजरेच्या तराजूनं ते तिला तोलीत होते. तरुणांच्या नजरा संकोचानं परत तरी येत होत्या, परंतु त्या म्हाताऱ्याची नजर जिथं पडत होती तिथंच चिटकून बसत होती. माठातलं पाणी काढण्यासाठी थोरली खाली बसली तेव्हा पैस झालेला तिचा पार्श्व भाग बघताच म्हातारा एकदम आश्चर्यानं हुंकारला 'हा!' आणि मग तो म्हणाला 'ठीक आहे. सगळं काही अगदी मनासारखं आहे.'

एकाएकी बडीच्या डोळ्यांत कसल्यातरी विचाराची सावली तरळून गेली आणि आजीनं तिला काही खूण करण्यापूर्वीच ती तिथून बावरून बाहेर पळून गेली. ती गेली तरी एक सुगंध कितीतरी वेळ मागे रेंगाळत होता. असा सुवास फक्त तरुणींच्या अंगातूनच दरवळत असतो.

हजारावरून घसरत घसरत शेवटी पाचशेवर सौदा ठरला; आणि जिंदाला त्यावर विचार करायला वेळ देऊन ती मंडळी समाधानानं निघून गेली.

कुंटीण आजीनं वेळ देखील मोठी झकास शोधून काढली होती. त्यावेळी गावातल्या इतर बायांबरोबर रानो शेतात कापूस वेचायला गेली होती. ही पोरगी त्यांच्या हवाली कशी करायची आणि त्यांच्याकडून रक्कम वसूल कशी करायची याचा विचार जिंदाच्या मनात चालला होता. रानोला तर शेवटी विचारावंच लागणार होतं. त्याशिवाय त्यांच्या पदरात पोरगी कशी टाकता येणार? परंतु तिच्या हिशेबी रानो कुणीच नव्हती. आपल्या घरातून, आपल्या मनातून तिला तिनं केव्हाच हाकून दिलं होतं.

रानो घरी येताच जिंदानं तिच्याशी तोंडचे बडेपणानं बोलायला सुरुवात केली. तिला जवळ बोलावून आणि आपला सुरकुतलेला हात तिच्या गळ्यात टाकून ती म्हणाली, 'रानो, तू तर माझी सातजन्मीची लाडकी सूनबाई आहेस.' ते शब्द ऐकताच रानोचं माथं ठणकलं. बाहेरून येणाऱ्या आईला बडीनं आधीच आत येण्याची खूण केली होती. अधू दृष्टीच्या जिंदाला मात्र ते दिसलं नव्हतं. रानो चटकन उठून गेली. आत येताच बडीनं, सगळी हकीगत सरळ सरळ आपल्या भाबड्या भाषेत तिला सांगितली. साडेपाचशेच्या वायद्याची गोष्टही सांगायला ती विसरली नाही. दाराच्या मागं उभं राहून तिनं सारं काही ऐकलं होतं.

बडी नको नको म्हणत असताना देखील रानो उसळून बाहेर आली आणि या घरातला आपला दर्जा, मर्यादा, बळ साऱ्यांचा तिला विसर पडला. आपल्या पिलांना वाचवण्यासाठी खुडुक कोंबडी ज्या आवेशानं बहिरी ससाण्यावर तुटून पडते त्या आवेगानं तिनं जिंदावर हल्ला चढवला. 'कोण आलं होतं आज इथं? या घराचा उंबरा ओलांडायचा धीर कुणा मेल्याला झाला? कुणाला माझ्या पोरीचा सौदा करण्याची हिंमत झाली?'

यावेळी जिंदानं बायकी पद्धतीनं आपला बचाव केला नाही. अत्यंत मानभावीपणानं ती म्हणाली, 'तसं काही नाही ग राणी-सहज आपलं बोलणं निघालं होतं. प्रत्येकाचं तोंड थोडंच आपल्याला धरता येणार आहे?'

'का नाही धरता येणार?' रानो मुळी काही ऐकायलाच तयार नव्हती. 'घराचंच काय चांगली आग लावता आली असती त्या तोंडाला. जीभ छाटून टाकायला पाहिजे होती त्या हरामजाद्यांची. जळतं लाकूड त्यांच्या घशात कोंबायचं असतं. माझ्या पोरीची एक भुजा, एक एक बोट, तिचं एक एक नख, लाख लाख मोलाचं आहे. तिच्या एका नजरेनं मोक्षाची शंभर दारं उघडतील; डोळ्याच्या एका उघडझापीनं अनेकांना ती जन्माचं कैदी करून टाकील–'

'हो हो; ती जशी तुझी मुलगी आहे तशी माझी देखील ती कुणीतरी लागते.' जिंदानं उत्तर केलं, 'म्हटलं माझी देखील नात आहे ती! समजलं?'

'हो हो. समजलं.'

'म्हणे नात आहे. नात सुनेमुळं असते. पण तुला सूनच नाही, मग नात कुठली? खबरदार पुन्हा असं काही बोलशील तर' असं म्हणत, संतापानं फणफणत नि हात ओवाळीत रानो घरात गेली; आणि त्यानंतर बायकांचा तो आक्रस्ताळीपणा, ते रडणं–भेकणं सुरू झालं, 'अग आईगं! डोळ्यादेखत आता माझ्या पोरीची विक्री होणार आहे.

एक कपर्दिक न घेता मी या घरात आले होते तर ही माझी दुर्दशा झाली. हिचा तर काय आता लिलाव होणार आहे, गोष्टीगोष्टीला हिची हाडं मोडतील ते, लचके तोडून खातील हिचे. म्हणतील फुकट नाही, विकत आणलंय तुला. खणखण दाम मोजून दिलेत.' तिलोका जिवंत होता तेव्हा रानो याच निर्वाणीच्या अस्त्राचा उपयोग करीत असे, 'काही दिलं नाही तसं काही घेतलंही नाही. लग्न करून आणलंय तुम्ही मला इथं. विकत नाही घेतली काही, आणि ही माझी पोर आज विकायला काढली आहे –'

खायला नाही घरात, मग लग्न कसं होणार? दुसऱ्या क्षणी तिच्या मनात विचार आला, आज मेहरबानदास चौधरी असता तर एका रात्रीत तिनं आपल्या मुलीच्या हुंड्याची तजवीज केली असती. मग वाजंत्र्याच्या मंजुळ सुरात वाजत गाजत वरात तिच्या दारावर आली असती; बाशिंगबांधलेल्या नवरदेवाच्या हातात आपल्या मुलीचा हात तिनं निरवला असता; आणि नववधूची डोली जेव्हा सासरी जायला निघाली असती तेव्हा डबडबल्या डोळ्यांनी ती तिच्याकडं स्तब्धपणे पाहात उभी राहिली असती. परंतु तिनं हे कधीच सांगितलं नसतं की, बेटा, तुझ्या या सौभाग्याकरिता, एका आईनं एकारात्री आपलं सौभाग्य लुटवून टाकलं होतं!

–आणि हे पाचशे-साडेपाचशे मिळाले तरी ही कैदाशीण माझ्या हाती थोडेच त्यांतले काही पडू देणार आहे? पुन्हा शेवटी विकायचंच ठरलं तर या साडेपाशेत एकदाच का म्हणून विकायचं? कुठल्यातरी शहरी नेऊन थोडं थोडं करून तिला का विकू नये? लाहोरात शेकडो, हजारो बाबू लोक असे आहेत की, जे एका क्षणाच्या सुखासाठी पंधरा पंधरा, वीस वीस रुपये द्यायला खुशीनं तयार असतात. तिथं खूप चांगलंचुंगलं खायला मिळेल आणि ल्यायला रेशीम, किनखाप–! थोड्याच दिवसात रुपयांनी आणि कपड्यांनी सगळी संदुक भरून जाईल.

इतक्यात त्या शांत निःस्तब्ध वातावरणात खाडकन् थप्पड मारल्याचा आवाज. राणीनं आपल्याच गालात मारून घेतली होती; आणि तिचं सर्व शरीर नेहमीप्रमाणं आता एका अनामिक भयानं कापू लागलं होतं.

जिंदा रानोचं शेवटचं वाक्य आपल्या मनात घोळवीत होती, 'नात व्हायला आधी सून असावी लागते. सूनच नाही, मग नात कुठून आली?' नेमके याचवेळी ज्ञानचंद, केशरसिंह, जग्गू, दुल्ला, करमदीन आणि गावातल्या दुसऱ्या गावकरी मंडळींनी घरात प्रवेश केला. ही सर्व मंडळी हुजुरासिंगजवळ येऊन बसली. जिंदालाही त्यांनी जवळ बोलावून घेतलं आणि राणीच्या पुनर्विवाहाच्या, रानोला 'शेला पांघरविण्याच्या' वाटाघाटीला त्यांनी अशा प्रकारे सुरुवात केली की, हाही गावातला नेहमीसारखा सामान्य झगडा आहे आणि त्याचा निकाल लावण्याचा अधिकारही पंचायतीलाच आहे. जिंदा जवळ येऊन बसताच विवाहविधीची चर्चा सुरू झाली. हुजुरासिंगाला ही सूचना अपमानकारक वाटली. आपलं इतकं वय झालं, मरणाच्या दारी येऊन टेपलो आणि अशावेळी हे पंचायतीचे आणि भावकीचे लोक आपली बेइज्जती करण्यासाठी, आपल्याला शेवटची लाथ मारण्यासाठी इथं जमले आहेत असा त्याचा समज झाला, परंतु जिंदानं स्त्रीजातीच्या उपजत चाणाक्षपणानं या गोष्टीचा तेव्हाच ठाव घेतला. इतकंच नव्हे तर ह्या सूचनेच्याही पलीकडे तिचं मन धावत गेलं. इतक्या जवळची, इतकी साधी गोष्ट आधी आपल्या कशी लक्षात आली नाही याचंच तिला आश्चर्य वाटलं. मग तिला आठवलं – हो एकदा असा विचार तिच्या मनात आला होता. खरंच बडी अजून किती लहान आहे! अजूनही रानो आपली सून होऊ शकते – आणि ही बडी आपली नात आणि – हुजुरासिंगाने पंचाकडे बघून जेव्हा नुसतेच डोळे मिचकावले तेव्हा ही म्हातारी दातओठ खातच त्याच्याकडे सरसावली. ढब्बूच्या बौरीसारखी ती मरून पडली नव्हती; जिवंत होती. – जिंदा होती ती जिंदा. खेकसून म्हाताऱ्याला ती म्हणाली, 'थेरड्या तू आता उगाच मधे बोलू नकोस. मरतही नाही नि मेला पिच्छाही सोडीत नाही. जगात किती किती गोष्टींचा न्यायनिवाडा होतो आहे याचा काही पत्ता तरी आहे का तुला? या जन्मी आंधळा अन् पुढच्या जन्मीही आंधळाच!'

पंचांनी म्हातारा-म्हातारीच्या वादाचा आधी निकाल लावला आणि नंतर हुजुरासिंग आणि जिंदा या दोघांची संमती घेऊन ते तिथून बाहेर पडले. जाण्यापूर्वी वडीलकीच्या नात्यानं जिंदानं त्यांना आशीर्वाद दिला. पंचांची पाठ वळायचा उशीर, खवळलेली राणी सासूसासऱ्यांच्या समोर येऊन उभी राहिली, 'का ग थेरडे, इतका वेळ तू तर बडीच्या लग्नाच्या गोष्टी करीत होतीस? मग मध्येच माझा मुडदा का उकरून काढलास?' ती संतापानं तोंडाला येईल ते बोलत होती. 'काही लाज लज्जा असेल तर विष खाऊन जीव दे. देवी माते, हिला तलावाच्या गढूळ पाण्यात बुडवून मारून टाक. नाहीतर हिची हाडं त्या आटयाच्या चक्कीत भरडून काढ. अग थेरडे, तू माझ्या चुम्मूशी का नाही पाट लावीत? या बन्नोबरोबर का नाही त्याचा पदर धरून जात? नाही तर या संतोशीच लगीन लाव. अग अवदसे, ज्याला मी पदराखाली घेऊन पाजलं त्याच्याशी लगीन करू होय?'–

इतक्यात मागून कुणी तरी राणीची वेणी धरून हासडली. त्या हिसक्यानं ती भिंतीमागल्या उकिरड्याच्या ढिगाऱ्यावर येऊन आदळली. उठून डोळे उघडून पाहते तो समोर चन्नो उभी दातओठ खात ती बोलत होती, 'नवरागिळी रांड मेली. इकडं ये अशी' ओढीतच तिनं राणीला घरामागच्या बोळीत नेलं. या ठिकाणी गावातल्या पोरी-पोरं अंधारात एकमेकांना गुपचुप भेटत असत. तिथं येताच चन्नो राणीला म्हणाली, 'आम्ही तुझ्या चांगल्यासाठी झटतो आहोत तर तू उलटून आम्हालाच चावतेस काय? कुत्री मेली.'

'नाही, नाही, तसं नाही ग. चन्नो' राणीनं रडत रडत तिचे पाय धरले आणि म्हणाली, 'अग तो अगदी लहान बच्चा आहे. त्याच्याकडे कधी मी त्या नजरेनं पाहिलं नाही ग.'

'हे पहा, तुला या जगात जिवंत राहायचंय की नाही?' चन्नोनं तिला विचारलं,' ही पोटची नरकाची खाई भरायचीयना तुला? ही आपली लाज तुला झाकायची की नाही? मोठी आली आहे दृष्टीची देखणी, मार! बुल्हेशाहानी काय सांगितलंय, आठवतं––

बुल्हिया खुदाकी पावना.
ए घरों पुट्टना ते ओघर लावना'

फक्त इकडनं काढायचं अन् तिकडं लावायचं. आजापर्यंत नसलं पाहिलं तर, मेले आता पहा त्या नजरेनं.'

रानो कल्पनेनं मंगलचं चित्र रेखाटू लागली.

चन्नो सारखी बोलतच होती, 'थोडा विचार तर करून पहा मेले! दोन लग्नं करायची संधी मिळते किती जणींना? एकदा एखाद्यावरोबर लग्न झालं की झालं. बस्स. मध्यंतरी तसे दोन-चार होऊन जातात. पण ती चांगली गोष्ट थोडीच आहे? शिवाय दर वेळेला भीतीनं जीव जायची पाळी येते! हो – तशी पुरुषांची गोष्ट वेगळी पडते. त्यांचीच दुनिया आहे. त्यांना कोण विचारणार आहे? कोणीतरी दुसरी बया बाहेरून येईल. अन् तुझ्या मंगलला घेऊन जाईल. मग तुलाच तसं करायला काय हरकत आहे? त्या सलामतीचं – ऐकलयसनं तू? बरं, हे सारं राहूदे, तुला आपल्या पोरीचं लगीन तरी करायचंय की नाही?'

रानो दचकली. आपलं लगीन की मुलीचं? मुलीचं की आपलं? लहान मुलासारखा 'नाही नाही' असा हट्ट करीतच ती घरी गेली. दिवसभर विचार करीत बसली. तिच्या भणभणत्या डोळ्यात एक वेगळीच आग भडकली. तिचा संबंध बडीशी नव्हता, त्या दोन लहान मुलांशी नव्हता, की लहानग्या चुम्मूशीही नव्हता. वेगळीच अजात बाळे आता तिच्या पोटात उसळचा मारू लागली होती!

संध्याकाळी पुरो आली तेव्हा राणीला बरं नसल्यामुळं आंथरुणावर पडून होती. कपाळाला एक पट्टी करकचून बांधलेली होती. चन्नो मावशीकडं जाऊन बडीनं पिठाच्या (चिमट्या) टिकल्या करून आणल्या होत्या; आणि रानोनं त्या आपल्या कानशिलांवर चिटकवल्या होत्या. त्या कागदी चिण्या कणाकणानं राणींचा सारा ताप टिपून घेत होत्या. पूरनदेवीनं प्रथम इकडल्या तिकडल्या थोड्या गोष्टी केल्या आणि मग हसत विचारलं, 'का गं, ताप कसा काय आहे!'

आणि रानो तोंड वळववून नुसती हसली.

तिच्या त्या स्मितानं साऱ्या सृष्टीत एक गूढ हास्य फुललं. पुरो हसली. बडी देखील या विरळ हसऱ्या प्रसंगाच्या निमित्तानं अजाणतेपणानं खळखळून हसली. कुणाला माहीत केव्हा आणि कशा, पण संतांच्या, राधा-कृष्णांच्या आणि शिवपार्वतीच्या त्या सर्व तसबिरी आता पुन्हा वर चौकटीत जाऊन बसल्या होत्या; आणि त्या देवदेवतांच्या चेहऱ्यावर जगातला सारा प्रेमभाव स्निग्धपणानं प्रतिबिंबित झाला होता. बडीच्या त्या खळखळत्या हास्यानं आंगणातल्या लिंबावरले राहू चिवचिवत उडून गेले. मंदिराच्या सुवर्ण कळसावर सूर्यानं आपला शेवटचा गुलाब फुलविला आणि देवळातल्या घंटा घणघणू लागल्या.

अचानक, कुठूनतरी येऊन मंगल खोलीच्या दारात उभा राहिला. तो आज फार खुशीत होता. दिवसभरात आज सात रुपयांची कमाई त्यानं केली होती. आल्याबरोबर, नेहमीप्रमाणं ती कमाई त्यानं रानोच्या हातात दिली. तेव्हा पूरनदेवी म्हणाली, 'घे, ही पहिली कमाई. अन् यापुढं अशीच त्याची कमाई खात रहा तू.'

रानो घाबरली. पैसे तिच्या हातातून गळून पडले. नोटा सैपाकघराकडे उडत गेल्या आणि नाणी घरातले काना-कोपऱ्यांचा शोध घेत घरंगळत इकडं तिकडं धावली.

मंगलनं अस्वस्थ होऊन विचारलं, 'हसायला काय झालं काकू?'

'ते तू आपल्या हिला विचार.' काकूनं उत्तर केलं. आणि बावरलेल्या मनःस्थितीत, त्याला तिथंच रानोजवळ एकटं सोडून व बडीला हातानं ओढीत घाईघाईनं ती खोलीबाहेर पडली आणि तशीच आपल्या घराकडं निघून गेली.

मंगल तिथंच वेड्यासारखा हसत उभा राहिला आणि म्हणाला, 'कोटल्यातल्या साऱ्या बायका या योग्यतेच्या आहेत की–'

रानोनं मधेच त्याला अडवलं, 'आणि पुरुष काय कमी आहेत?'

मंगलला काहीच समजलं नाही.

दोघंही आपापल्या जाळ्यात अडकून पडली होती आणि त्यातून निसटण्यासाठी धडपडत होती. मंगलनं आपल्या ट्रंकेतून एक सदरा काढला. तो त्यानं, कधीतरी आपल्या सुस्थितीच्या काळात मुद्दाम पेशावरहून मागवला होता. त्याच्या मुंड्यावर लोकरीचा कशीदा होता. त्यात नाजूक फुलं भरलेली होती. हातातला सदरा फडकावीत बाहेर येताना तो म्हणाला, 'पण पुरुषांच्या गोष्टी काहीतरी कळतात–'

'पुरुषांना फक्त पुरुषांच्याच गोष्टी कळतात.' रानो म्हणाली, 'आणि बायकांना बायकांच्या' तिनं हळूच डोळे मोडले. ही कला तर तिला लक्षावधी, कोट्यवधी वर्षांपासून अवगत होती.

मनातल्या मनात मंगलला हे पटलं. रानो खरं तेच बोलत होती. चौधरीच्या पडक्या घराच्या दगडविटांचा ढिगारा जिथं पडला आहे तिथं आज रात्रीच्या अंधारात, नाटेच्या मागे मी आणि सलामती मिळून एका नव्याच इमारतीची कोनशिला बसवणार आहो याची या राणीला कल्पना आहे का? असा एक विचार त्याच्या मनात आला. वळून, दारातूनच तिच्याकडं पाहात त्यानं विचारलं, 'स्त्री-पुरुषाचा कसला झगडा घेऊन बसली आहेस तू आज?'

'तोच तर सारा झगडा आहे.'

'अगदी कुरुक्षेत्रातला का?'

'नाही. त्यापेक्षाही जुना' राणी उत्तरली; आणि जवळ यऊन हळूच पुढं म्हणाली, 'फार भयंकर युद्ध आहे ते. यात जिंकलेला देखील हरतो आणि हरलेला तर हरलेलाच असतो.'

मंगल थांबून राणीच्या या बोलण्यातला गूढ अर्थ शोधण्याचा प्रयत्न करीत होता. तशी दोघंही परस्परांना अनोळखी होती. अज्ञात होती. पण एखादा क्षण असा विलक्षण असतो की, ज्यावेळी काहीही बोललं तरी त्याचा नेमका अर्थ तेव्हाच ध्यानात येतो. एरव्ही कितीही सांगितलं तरी त्याचा अर्थ मुळीच लक्षात येत नाही. निसटूनच जातो. त्या क्षणाला काही अर्थ असतो का? आणि तो अर्थ ध्यानात येण्यासाठी बुद्धीची गरज असते की काळाची? परंतु या दोघांजवळ या दोन्हीपैकी एकही नव्हतं. रानो तेहतीस-चौतीस वर्षांची अंगापिंडानं भरलेली एक स्त्री होती. तिच्या गात्रागात्रात आज नारीपण भराला आलं होतं; आळस देत जांभई देऊन जागं झालं होतं. अल्लड किशोरीचा स्वाभाविक अभिमान तिच्यात उरला नव्हता, परंतु आपल्या स्त्रीत्त्वाचा गर्व मात्र भरपूर होता. अनेक वर्षे नव्हे अनेक शतके हा गर्व परिस्थितीच्या ओझ्याखाली दबलेला–दडपलेला राहतो, पण वेळ येताच तो डोंगर फोडून, उकळत, उसळत बाहेर येतो; आणि दुबळा झालेला पृष्ठभाग त्या अनावर स्फोटाला मार्ग मोकळा करून देतो. याच्या उलट मंगल हा तेवीस-चोवीस वर्षांचा बलिष्ठ तरुण होता. तो एक खळखळता अखंड दरया होता.

त्याच्या वेगवान प्रवाहाला तटांची क्षिती नव्हती, खडकांची पर्वा नव्हती.

बाहेर येऊन रानो उगाच भांड्याची आदळआपट करीत बसली. शेवटी तिला हवं होतं तसंच झालं. मंगल सलामतीकडे जायचा थांबला. त्याच्या आईनं–जिदानं त्याला हाक मारली. मंगल तिच्या जवळ गेला. त्याला आपल्याजवळ बसवून जिदानं त्याच्याशी बोलायला सुरुवात केली. मुद्दामच राणी तिथून हळूच निसटली. बडीला आणि दोन लहान मुलांना तिनं बाहेर खेळायला धाडलं आणि नंतर स्वत: दाराआड येऊन उभी राहिली. जगातल्या साऱ्या बायकांची ही मोठी सोयीस्कर आणि सुरक्षित जागा !

जिदानं बोलायला सुरुवात करण्यापूर्वीच मंगला सर्व काही कळले. डोकीवरले केस उभे राहिले असून पगडीतून ते बाहेर पडू पाहात आहेत असा त्याला भास झाला आणि एका हातानं पगडी वर करून दुसऱ्या हाताच्या बोटानं बाहेर आलेले केस तो उगाच आत सारण्याचा प्रयत्न करू लागला. संतापानं अचानक उसळल्या रक्तामुळं दिव्याच्या मातकट प्रकाशात त्याचा चेहरा लाल दिसू लागला होता.

दाराआड उभ्या राहिलेल्या रानोने मागं रेलून भिंतीचा आसरा घेतला अन् एक हात तिनं आपल्या छातीवर ठेवला. काळजाची धडपड किती मोठ्यानं ऐकू येत होती तिला. खून करून पळून जाण्याच्या प्रयत्नात घाईनं पायऱ्या उतरणाऱ्या खुनी माणसाचे पायच जणू कुठे जिन्यावर दणदण वाजत होते ! अकाली फुलणाऱ्या दोडक्याच्या फुलाप्रमाणं ती पिवळी पडली होती, कोमेजली होती. दिवाणशहाच्या दुकानावर विकायला ठेवलेल्या सुकलेल्या द्राक्षाप्रमाणे तिचे ओठ वाळले होते. प्रेमानं किंवा भीतीनं सर्वांगाला कापरं भरतं तसं अंग थरथरत होते व आवेगाने तिचे गुडघे खुडखुडून परस्परांशी टकरत होते. रानो घरात गेली आहे असंच मंगलला वाटलं आणि उठून त्या दिशेकडं त्यानं बघितलं.

'नाही. नाही, हे कधीही होणार नाही.' मंगल स्वत:शीच म्हणाला, आणि त्यानं हाताला एक निर्णयात्मक झटका दिला. टांगा वेगानं हाकायचा झाला म्हणजे चाबूक उडविताना तो असाच हात हाल्वीत असे. पुढं तो बोलू लागला, 'या पंचांच्या आयला– नाही पंचांना शिवी घालणार नाही.–परंतु हे पंचच काय प्रत्यक्ष तो मोठा लाट इरविन–नाही–अगदी पंचम जॉर्ज आला तरी मी त्याचं ऐकणार नाही. वयानं माझ्या आईसारखी आहे ती. मी तिच्या पायावर डोकं ठेवीन–पण हे डोक्यावर पाय–नाही–नाही.'

संतापानं तो असंच आणखी काही वाही वडबडत, वाऱ्याला शिव्या देत देत बाहेर निघून गेला. वर भिंतीवर कुणाची तरी सावली हल्ली. आणि पुन्हा मागे सरली. जिदा ओरडली 'अग रानो, सटवे, पहा, पहा, तो आपल्या जिवाचं काही तरी बरं वाईट करून घेईल. जाताना म्हणत होता आणखी एक तिलोकाचं प्रेत घरात येईल म्हणून.'

राणी धावत धडपडतच बाहेर आली. दाराबाहेर चन्नो, पूरनदेवी, विद्या वगैरे उभ्या होत्या. त्यांनी तिला पकडलं. त्यांच्या हातातून स्वत:ला सोडवीत ती ओरडली, 'हाय ! अग आईग–तो–तो–' तिनं फक्त अंधाराकडं बोट दाखवलं–

'काही करणार नाही तो' चन्नोनं तिला दटावलं.

'आणि त्यानं काही बरंवाईट करून घेतलं जिवाचं तर माझाही जीव जाईल. सर्वांचं मरण ओढवेल आणि त्याचं खापर माझ्या डोक्यावर फुटेल.

'उगी रहा तू' विद्या पुढं येऊन बोलली. दुसरं कोण खापर फोडणार आहे आमच्याशिवाय ?'

'आई अंबाबाई, माझं तर सारं अंग थंड पडत चाललंय. आपले दोन्ही हात छातीवर ठेवीत रानोनं पूरनदेवीचा आधार घेतला.

रानोचे हातपाय दाबून तिला शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करीत चन्नो बोलली, 'तुझ्या अंगात ऊब चेतवावी म्हणून तर ही सारी धडपड चालली आहे, एवढा धोका पत्करलाय ! नाही तरी बर्फासारखीच थंडगार पडत चालली होतीस की.'

'काकू, मला वाचवा हो' राणीनं पूरनदेवीचे पाय धरले.

'उगीच का जीव सोडतेस ? काही होत नाही तुला' आपले पाय सोडवीत पूरनदेवी म्हणाली. 'या मेल्या पुरुषांची जात म्हणजे अगदी घोड्याची जात. यांना ओझ्याला जुंपलं की मेले आधी अशाच लाथा झाडतात. पण आम्ही बायका असं वागलो नाही तर साऱ्यांना कुंवारी म्हणून घरीच बसावं लागेल–अन् तुला हे जसं काही काहीमाहीतच नाही !'

राणीला आता थोडा धीर आला. दोन्ही हातांनी आपलं तोंड झाकून कापत कापत तिनं चन्नोकडं आधी पाहिलं अन् मग हळूच विचारलं, 'आता काय करील ग तो ?'

'तू जे केलंस तेच.' चन्नो उतरली.

'काय ठरवील तो ?'

'तू ठरवलंस तेच'

बडी जवळच उभी होती. सर्व काही एकत होती; आणि जे काय चालले होते. त्याचा अर्थही थोडाबहुत तिला समजला होता. ती एकदम उद्‌गारली 'आईनं असं काही केलं तर मी काही तरी खाऊन घेईन आणि जीव देईन.'

'अगो बया !' सर्व बाया एकदम आश्चर्यानं ओरडल्या आणि त्यांनी आपल्या कपाळावर हात मारून घेतला. चन्नोनं बडीच्या वेणीला एक हिसडा मारला आणि इतर बायांनी धक्के देऊन तिला घरात ढकलले. बडी आत गेली पण लाजेनं, द्वेषानं आणि संतापानं तिचा चेहरा फुलून लाल झाला होता.

## : ५ :

संकेतस्थळी मंगल येऊन पोचला. तिथं सलामती त्याची वाट पहात उभी होती. घराच्या माळवदावरून चालत चालत येताना ती मंगलच्या घराकडूनच आली होती. तिथलं भांडणही तिच्या कानावर पडलं होतं. परंतु त्यातलं तिला काही उमगलं नव्हतं. इथं उभं राहून मार्गप्रतीक्षा करताना, कुठल्यातरी गाण्याच्या दोन ओळी तिच्या मनात घोळत होत्या. त्या ती मंगलला म्हणून दाखविणार होती–

'हस दी न चन्न मंगलये
यार छड गया गली रा आना'

(सहज हसत हसत कानातले डूल काय मागितले मी त्याला, पण त्या जिवलगानं गल्लीत यायचंच सोडून दिलंय.)

इतक्यात समोरून येणारा मंगल तिच्या दृष्टीस पडला. रागानं कापत होता तो. चालता चालता थोडासा थांबला, जवळ आला अन् सलामतीला पाहून पुन्हा थोडया अंतरावर जाऊन उभा राहिला. सलामती त्याच्या जवळ सरकली. मंगलच्या मौनातून हजार अर्थ ती शोधून काढीत होती. पण त्या सर्वांचा शेवटी एकच अर्थ होत होता. आज ती किती नटून थटून आली होती. लगीन झालेल्या वडील बहिणीची ओढणी पांघरून ती आली होती. त्या ओढणीवरील जरतारी फुलं कुठून तरी येणाऱ्या प्रकाशाच्या किरणात मधूनच चमचमत होती. तिच्या गोऱ्या देहाभोवती लपेटलेली ती ओढणी पेढयाच्या मिठाईभोवती गुंडाळलेल्या चांदीचा वर्ख उडावा तशी त्या संध्याकाळच्या मंद वाऱ्यात फडफडत होती. मंगलचे डोळे त्या अंधारात पेटलेल्या मशालीप्रमाणे तेवत होते. सलामतीच्या जवळ येऊन, मंगल एका लाकडाच्या ओंडक्यावर पाय ठेवून उभा राहिला. त्या ओंडक्याचा बराचसा भाग जळणासाठी लोकांनी आधीच तोडून नेला होता.

'हुं' दबल्या आवाजात सलामतीनं हुंकार भरला.

'इकडं ये' त्यानं आज्ञा केली आणि ती काही न बोलता मंगलच्या निकट आली. थांबली.

'ती ओढणी दूर कर' मंगलचा दुसरा हुकूम.

सलामतीनं अंगावरचा दुपट्टा ओढून फेकून दिला.

'कमीज (कुडता) काढ'

सलामतीनं कुडतादेखील काढून ठेवला. कोणत्याही तरुणीला अत्यंत अवघड वाटणारी ती गोष्ट त्या क्षणी चटकन तिनं करून टाकली. त्या एका क्षणाच्या सुळावर लटकणारी सलामती आपली सारी इच्छाशक्तीच हरवून बसली होती. दोन्ही हातांनी आपले वक्ष झाकीत तिनं लाजून खाली मान घातली. लांबून येणाऱ्या दिव्याच्या फिकट प्रकाशात मंगलनं तिच्या उघडया देहाकडं एकदा पाहिलं आणि ती काही बोलण्यापूर्वीच, तो त्याच कठोर स्वरात तिला म्हणाला, 'बस, झाली तुझी सहल. जा, नीघ घरी जा आता.'

गांगरलेल्या सलामतीनं आपले कपडे उचलले, घाईनं कमीज गळयात अडकवला आणि भीतीनं थरथरत नि मागं वळून पहात पहात, ती तिथून पळून गेली.

इतक्यात कुणी वाटसरू तिकडून गेला. त्या स्तब्धतेचा भंग करीत त्यानं विचारलं, 'कोण आहे?'

'तू कोण रे मामा?' मंगलनं दरडावून उलट विचारलं. त्याच्या नाकपुडया संतापानं थरथरत होत्या. तो वाटसरू क्षणभर दचकून थांबला आणि पुन्हा मुकाट आपल्या वाटेला लागला. इतक्यात, त्याला आपला खून करून घ्यायचा नव्हता.

मंगल काही वेळ तिथंच उभा राहिला. वातावरणातले सारे गंध त्याने हुंगून घेतले. मग सलामतीच्या घरच्या दिशेने उभारलेला चाबकासारखा त्यानं हात वर उडवला आणि समोरच्या झोपडयात तो अदृश्य झाला. ह्या झोपडया गावाच्या एका कडेला होत्या.त्यातून कसाब, धोबी, चांभार वगैरे गावातले लोक रहात असत आणि ह्या झोपडयांच्या बाजूनेच गावातले घाणीचे गटार वहात होते.

पंचांनी निश्चित केलेला दिवस येऊन ठेपला. पुरो, चन्नो आणि विद्या या तिघांनी मिळून राणीच्या हाताला मेंदी लावली आणि वेणीच्या बटांतून मंगळसूत्र गुंफून डोक्यावर सुंदर डाक* बंगला बांधला. एवढा दिलासा दिला असतानाही रानो सारखी थरथर कापत होती, रडत होती.

अंगणात 'पैसी'ची त्याच धाग्यांची मळकी चादर ताणून मंडपासारखी बांधण्यात आली होती. त्या मंडपाखाली पाण्यानं भरून ठेवलेले कलश मांडण्यात आले होते. एका बाजूला खापराची शेवाळलेली एक जुनी वेळणी ठेवली होती आणि ह्या सर्वांवर कुंकवाची बोटं ओढली होती. त्या चादरीच्या मांडवाखाली आणून बसवताच रानोनं एक हृदयविदारक किंकाळी फोडली.

रडत रडत ती बोलत होती, 'हे मरत्या जिवा, पहा, पहा, तुझ्या राणीचं हे काय करताहेत ते.'

पुरोहितानं विचारलं, 'नवरा मुलगा कुठं आहे?' पं. ज्ञानचंद, केशरसिंह आणि इतर काही मंडळी इकडं तिकडं पाहू लागली. काही तासांपूर्वीच त्यांनी त्याला पकडून आणून खाटेला बांधून ठेवलं होतं. मेहर करमदीन विवाहविधीच्या जागेपासून थोडया अंतरावर उभा होता. तो धावत घरात गेला आणि तसाच उलटपावली परत आला. म्हणाला, 'मंगलू आत दिसत नाही.'

एकीकडून निंबाच्या झाडाला आणि दुसरीकडून खिडकीच्या गजांना बांधलेली चादर उत्तरेच्या वाऱ्यात फडफडत होती. फुकटचा डफ वाजवीत होती! चादरीच्या मंडपाच्या मधोमध दोरीनं टांगलेली लाकडाची चिमणी झुलत चिवचिव करीत होती. थोडया अंतरावर चुलीजवळ राखेत झोपलेला ढब्बू, पायात घातलेली मान वर करून या सर्व दृश्याकडे काहीशा संशयानं पाहू लागला. तो आता बराच म्हातारा आणि दुबळा झाला होता. प्रखर प्रकाश किंवा आरडाओरडा त्याला आता सहन होत नव्हता. गावातल्या स्त्रीपुरुषांच्या या विचित्र हालचाली पाहून तो उठून उभा राहिला आणि आपल्या कल्पित शत्रूच्या अंगावर भुंकू लागला.

'मला माहीत आहे, तेंव्हाच तसं आहे—' हुजुरासिंग बोलू लागला.

'हं, राहू द्या, राहू द्या' जिदानं हुजुरासिंगला थांबवलं, 'वायफळ बडबड करण्याखेरीज दुसरं येतंय काय तुम्हाला?' आणि एकदम स्तब्ध होऊन ती आपल्या निर्जीव, निस्तेज डोळयांनी त्या जमलेल्या मंडळींकडे पहात तणतणत बसून राहिली. आभाळातून आणखी कोणती आपत्ती येऊन कोसळणार आहे याची तिला काही काही कल्पना करता येत नव्हती. मंद झालेल्या तिच्या म्हाताऱ्या दृष्टीपुढं, मेलेल्या मुलाची आकृती येऊन घडीघडी उभी रहात होती.

'पुरोहितजी, थोडं थांबा.' जमीनदार तारासिंह, लग्न लावायला आलेल्या ब्राह्मणाला म्हणाला, 'त्या मात्रा गमन्याला आत्ता पकडून आणतो मी.'

'हो हो' केसरसिंहानं त्याला साथ दिली, 'नाहीतरी मी कशाला

* सोन्याचं फूल (अर्ध्या नारळाच्या आकाराचा एक अलंकार) लेखकानं इथं एका पंजाबी लोकगीताकडे संकेत केला आहे. ह्या गीतात एक तरुणी म्हणते,

'सिर गुंदनी कुपत्तीए नैंने
ते उत्ते पादे डाक बंगला'

त्याच्या बहिणीच्या लग्नात उगाच जोडे खात फिरू ?'

'चला, आपण सारेच त्याला शोधायला जाऊ या.' जग्गूही तयार झाला.

'इतके जोडे खाल्ले तरी पुन्हा पळाला साला.'

त्याला सरळ आणण्यासाठी गावचे लोक आता वाकडी वाट चालायचा विचार करीत होते. त्यांना वाटत होतं की, आता याची तंगडीच तोडली पाहिजे. म्हणजे मांडवात आणून बसवल्यावर, पुन्हा असं त्याला पळून जाता येणार नाही. हातात लाठ्या-काठ्या घेऊन सात-आठ माणसं बाहेर पडली; आणि कायदा आणि व्यवस्था यांचा संरक्षक सरपंच ज्ञानचंद, त्यांना अडवण्याचं नाटक करीत व आरडा ओरडा करीत त्यांच्या मागं निघाला. मांडवात आता फक्त स्त्रियाच मागं राहिल्या होत्या. त्यात सुरमा सुईणदेखील होती. तिनंच मंगलला या जगात ओढून आणलं होतं.

पुरुष मंडळीला असं बाहेर पडताना पाहून रानो किंचाळू लागली, 'मला जाऊ द्या, मेल्यांनो, सोडून द्या मला. नको मला हे जिणं.'

चाललंय ते सर्व योग्य आहे अशीच भावना तिथं पसरली होती. रानो मागच्या मागं कोसळली आणि बेशुद्ध झाली, तिच्याच विवाहासाठी भरलेल्या मंगल कलशातलं पाणी तोंडावर शिंपडून बायका तिला शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करीत होत्या. तिनं देखता डोळा मरण पाहिलं आहे. आता विवाहाचा सुखसोहळाही तिनं पाहिलाच पाहिजे, असाच जणू त्यांचा अट्टाहास होता.

सरकारी फार्मच्या सात नंबरच्या कपाशीच्या शेतात त्यांनी त्याला पकडला, आधीच त्यानं खूप मार खाल्ला होता. त्यामुळं त्याच्या अंगात आता काही त्राण उरलं नव्हतं. आता तर भीतीनं तो अर्धमेला झाला होता. मनात आणलं असतं तर, 'सतराह' किंवा 'सत्तो'च्या दिशेनं तांगा घेऊन त्याला पळून जाता आलं असतं. पण दैवच त्याच्यावर आज कोपलं होतं. गावकऱ्यांना मंगल असं काही करील याची पूर्ण कल्पना होती. म्हणून घोडीच्या पायात त्यांनी भक्कम साखळदंड बांधून त्यावर अलीगढचं कुलूप ठोकून दिलं होते. आता ते याबाबतीत पूर्ण निष्काळजी होते. आघाडी बांधलेली त्याच्या तांग्याची घोडी जवळच हिरव्यागार शेतात मजेत चरत होती. मधून मधून शेजारच्या पिकातही तोंड घालीत होती. मंगलला वाटलं होतं त्याचे जिगर दोस्त नबाब इस्माईल किंवा गुरुदास हे त्याच्या ह्या संकटात धावून येतील. पण ते बेटेदेखील गावकऱ्यांच्या कटात निर्लज्जपणे सामील झाले असतील याची त्याला मुळीच कल्पना नव्हती. घडी घडी ते हेच म्हणत होते, 'अरे, काही झालं तरी शेवटी एका बायकोचीच तर बाब आहे, मरणाला तर काही तोंड द्यायचं नाही ना त्याला ?'

मंगल लपला होता त्या जागेपासून दोन हातांवर धर्मशाळेची ती विहीर होती. इथंच काही वर्षांपूर्वी मंगलच्या मोठ्या भावाचा खून झाला होता. त्या खुनाच्या दिवशी सूर्यास्तापूर्वीच अंधार दाटून आला होता आणि त्याच्या आधी एक दिवस संध्याकाळी त्याच्या अंगणातल्या झाडावर सूर्यानं रक्ताचे थेंब शिंपडले होते. त्या मातीला अद्यापही रक्ताचा दर्प येत होता.

मंगल कापसाच्या दाट अंधाऱ्या झुडपात दडून बसला होता. गावकरी जवळ आले तेव्हा भितीनं डोळे फाडून तो त्यांच्याकडं पाहू लागला. हिवाळ्याच्या दिवसात लांडगा किंवा एखादं रानडुक्कर कोटल्यात शिरलं म्हणज गावकरी लाठ्याकाठ्या घेऊन त्याचा पाठलाग करायला निघत आणि त्या जनावराला घेरून त्याची चटणी केल्याखेरीज त्यांना चैन पडत नसे.

त्याच आवेशानं हे लोक त्याच्यासमोर येऊन उभे राहिले. दोन्ही हात जमिनीत रोवून वाकून झुडूपात लपलेला नि घाबरून सर्वांकडं बघणारा मंगल आता एखाद्या रानडुकरासारखाच दिसत होता. तो निःशस्त्र होता अन् हे सारे होते हत्यारबंद. कधी आरडून ओरडून हे लोक आभाळ डोक्यावर घेत तर कधी अगदी निःशब्दपणे एकमेकांच्या डोळ्यांत टक लावून पाहात, स्तब्ध उभे राहात; आणि कोण पहिला वार करणार आहे, कुणीकडून ही शिकार निसटू पाहणार आहे, याचा अंदाज घेत.

मंगल गर्भगळीत झाला. त्या लोकांचीही छाती धडधडू लागली होती.

निपचित पडलेला मंगल किंचित हलला. लगेच लोकांनी जमिनीवर काठ्या आपटायला सुरुवात केली. भीतीनं केलेले ते आघात इतके जोरदार होते की, त्यांनी जमिनीला भेगा पडल्या. फिरून एकमेकांकडं पाहात शिकार आणि शिकारी दोघेही स्तब्ध उभे राहिले.

इतक्यात मंगलचा तांगेवाला दोस्त गुरुदास धैर्यानं पुढं झाला, म्हणाला, 'दोस्तहो, थांबा. तो कुठं आहे ते मी शोधून काढतो.'

गुरुदास पुढं झाला. अन् एका क्षणात, केशरसिंह जग्गू, नबाब इस्माईल या साऱ्यांनी एका झुडुपावर हल्ला चढवला. मंगल उडी मारून त्यांच्या वेढ्यातून निसटला. पण सर्वांनी फिरून त्याला घेरले. प्रत्येकजण जे हाती मिळेल ते घेऊन त्याच्यावर तुटून पडला. काठी, लाठी, जोडे, सर्वांची वृष्टी त्याच्या अंगावर होऊ लागली. त्यानं अधिक प्रतिकार केला असता तर मागे भाले बर्च्याही त्याच्या समाचारासाठी उभ्या होत्या.

रस्त्यानं जाणारी माणसंही हा आरडाओरडा ऐकून तिथं जमा झाली.

केस धरून मंगलला ते शेतातून, खळ्यातून ओढीत नेत होते. जमीनदार तारासिंह आणि केशरसिंह हवालदार, हे तर जातीनं शीख होते. शिखांच्या केसांचं पावित्र्य रक्षण करणं त्यांचं कर्तव्य होतं. परंतु या प्रकारात तेच सर्वांच्या पुढं होते. केस धरून त्याला ओढण्यात त्यांना कसलातरी सुप्त, सूडाचा आनंद लाभत होता. केस धरून ओढले म्हणजे ज्या वेदना होत त्यांच्यापासून स्वतःला वाचवण्यासाठी मुकाट्यानं मंगल थोडे अंतर चालून जाई. पण पुन्हा आपला देह मागे मागे ओढू लागे. पाणी दाखवायला नेत असताना अडणाऱ्या खेचराप्रमाणं त्याचे शरीर, त्याचे फाटलेले कपडे आणि त्याच्या दाढीचे व डोक्याचे केस सारे काही कुसळांनी, झाडझडोऱ्यांनी मक्याच्या पाचोळ्यांनी, कापसाच्या लुंगसांनी आणि वाऱ्यात उडणाऱ्या म्हाताऱ्यांनी भरून गेले होते.

धर्मशाळेच्या तळ्याजवळ येईपर्यंत त्या जमावाला आता चांगलं मिरवणुकीचं स्वरूप आलं होतं. वाटेच्या कडेला उभं असलेले वाटसरू या दृश्याकडं आश्चर्यानं पाहात होते. बाभळीच्या कुंपणाआड उभ्या असलेल्या एका बाईनं एका गावकरी स्त्रीला विचारलं, 'अग बया सुख्खो, हे काय चाललंय ?'

सुखोनं त्या बाईकडं अशा नजरेनं पाहिलं जणूं तिला म्हणायचं होतं, 'अहाहा ग ! कुक्कुळ बाळच की नाही ! एवढी वाढलीस अन् तुला इतकंही कळत नाही ?' उघड ती इतकंच बोलली, 'लग्न !' आणि मग वळून ती दुसरीकडं पाहात उभी राहिली. समोरचं दृष्य तिच्या खिसगणतीतही नव्हतं.

दूर अंतरावर संध्याकाळच्या धूसर प्रकाशात वैष्णवी देवीच्या पर्वताची ओळ अंधुक दिसत होती. असंख्य यात्रेकरू यावेळी त्या पर्वताची प्रदक्षिणा करीत असतील. कारण आज पौर्णिमा. पौर्णिमेला डोंगरावर देवीच्या भक्तांची खूप गर्दी होते. यावेळी, टाळ मृदंगाच्या गजरात ते गात असतील —

'बचना है तो बचालो अंबाजी
पापियोंके बचानेकी यही वेला है'

गात, नाचत इकडे दक्षिणेकडे त्यांनी आपल्या नजरा वळवल्या असतील आणि या कोटल्याभोवती पसरलेल्या अंधाराला अडखळून त्या नजरा परतल्या असतील.

गावाबाहेरचा हा एवढाच खड्डा ज्ञानचंदच्या मजुरांच्या हातानं बुजवायचा राहिला होता. मारानं बेशुद्ध झालेला मंगळ त्या खड्यात पडला. बांध घालून आणि नाल्या खणून तलावातलं पाणी इथं वळवून आणलं होतं आणि ते खड्ड्यात साठवून ठेवलं होतं. हेच पाणी जेहलम बागवाननीच्या मळ्यासाठी वापरण्यात येत होतं, त्यामुळं तिचा मळा सदा हिरवागार राहात असे आणि भाजीपालाही खूप निघत असे. या मळ्यावर झाडांची सावली सदा पसरलेली असे. त्या सावलीत येणारे जाणारे प्रवासी क्षणभर विश्रांती घेत. सळसळत्या पानांतून वाहाणाऱ्या वाऱ्याच्या मंद झुळकींनी या सावलीत विसावणाऱ्या प्रवाशांवर तेव्हाच झोपेचा अंमल चढत असे. पाणी वाहून जाऊ नये म्हणून बागवान कुटुंबानं खड्ड्याला बांध घालून ठेवला होता. पण मंगलच्या कोसळण्यानं तो बांध तुटला आणि पाणी चोहीकडं धावू लागलं. मंगलला धरून पुन्हा उभं करीत असतानाच त्याचे सर्व कपडे पाण्यानं भिजले. चिखलानं भरून गेले. मंगलनं, पुन्हा एकदा, स्वतःला सोडवून घेण्याचा शेवटचा प्रयत्न केला. परंतु आठदहा माणसांच्या, वीस हातांच्या पकडीतून निसटणं अशक्य आहे, हे कळून येताच, कण्हत, हुंकारत, झिंगलेल्या माणसाप्रमाणं, तो त्यांच्या बरोबर चालू लागला.

फार विचित्र दिसत होता हा नवरदेव. डोक्यावर पगडी नाही अन् केस सर्व विस्कटलेले; हातात एक बोथलेलं कृपाण कोंबलेलं; बाशिंगाच्या जागी काटे आणि पालापाचोळा; केशरांच्या शिंपणीऐवजी अंगावर चिखलाचे डाग; डोळ्यांत प्रेमाच्या बेहोषीऐवजी घृणा, तिरस्कार, ग्लानी, पराभवाचे अश्रू आणि गलिच्छपणा; आणि ती वरात तरी किती विलक्षण ! जणू शिवशंकरच पार्वतीच्या परिणयासाठी निघाले होते : गळ्यात रुद्राक्षांच्या माळा आणि सर्पांची मंडले, तोंडात भांग धत्तूऱ्याची पेटलेली चिलीम, कमरेला एक लंगोटी, खांद्यावर मृगचर्म आणि हातात त्रिशूल; भोवती भुतांचं, वाघचित्त्यांचं वऱ्हाड; आणि मंजुळ सनई ऐवजी या सर्वांवरून उडत जाणाऱ्या माशांचं घोंघावणं आणि जवळच चालू असलेल्या चक्कीचा 'कूंऽकूं' असा कर्णकर्कश आवाज घुमत वाहात येत होता. या आवाजाच्या नादानं काही विचित्र इच्छा, आकांक्षा भीती, कामवासना मनात चाळवत होत्या.

ज्यावेळी मंगलला रानोजवळ आणून बसवलं, त्यावेळी तो रक्तानं माखलेला होता आणि रानो तर शुद्धीवरच नव्हती. परंतु शेवटी सर्व काही चांगलं, शुभच होणार आहे असा दृढ विश्वास त्या सर्व स्त्रियांच्या हृदयात वसत होता. एरव्ही पाटाचे संस्कार फार लहान, क्षुद्र असतो; त्याच्याविषयी फारसं कुणाला कौतुक किंवा उत्साह वाटत नाही. परंतु चन्नो, पूरनदेवी, विद्या, कुक्की आणि चंडी यांनी विवाहाच्या सर्व सोपस्कारांची पूर्ण तयारी केली होती. नवऱ्यामुलानं नवरीच्या घरी जाऊन तिला वरून आणायचं असा सामान्य रिवाज असतो. पण या विवाहात मुलीचं सासरही तेच आणि माहेरही तेच होतं. म्हणून त्या बायांनी आपसांतच सासर-माहेरची वाटणी करून घेतली होती. काहीजणी माहेरच्या झाल्या होत्या तर काहीजणींनी सासरचं वऱ्हाडीपण पत्करलं होतं. पूरनदेवी ही ब्राह्मणी, विद्या आणि इतर स्त्रिया रानोच्या माहेराकडून आल्या, तर जिंदा, चन्नो, सरूपी, चंडी आणि सुरमा ह्या तिच्या सासरच्या वऱ्हाडणी बनल्या. एकमेकांच्या विहीणी होऊन तोऱ्यात समोरासमोर उभ्या राहिल्या होत्या. जणु काही युद्धासाठीच सज्ज झाल्या होत्या. वरमाईच्या नात्यानं जिंदानं 'घोडी' गायला आरंभ केला. आपल्या बोळक्या तोंडानं ती गाऊ लाली —

अरे बन्ने
छोटी छोटी बंदनिया मेह बरस रहा है
सुहृतसेन मां तेरे शगुन मना रही है.

आणि नंतर वर हात करून तिनं चन्नो सरूपा आणि सूरमा यांना खूण केली. त्या सर्व मिळून गाऊ लागल्या —

बहेन सुहागनतेरी घोडीकी बाग पकडे हुये है बन्ने,
भाभी सुहागन सूरमा डाल रही है
और बाप तेरा धनकी थैली का मूंह खोलने खडा है

याच वेळी बडी आपल्या भावाला घेऊन गच्चीवर आली, लहानगा चुम्मू तिच्याबरोबर येण्याचा हट्ट करू लागला. त्याला वाजंत्री ऐकायची होती, त्यांच्या तालावर नाचायचं होतं. परंतु बडी त्याला नकोनको करीत होती, मारीत होती. पण खरं म्हणजे मनातून तिलाही हा सर्व सोहळा पाह्यचा होता. चन्नो मावशीच्या घरून ती बाहेर पडताच दुसरीही मुलं तिच्या मागोमाग घराच्या गच्चीवर येऊन उभी राहिली आणि आपल्या आईचा तो लग्नसमारंभ पाहू लागली. पहिल्यानं, अबोध दुःखानं बडीला रडूंच कोसळलं. परंतु तिथला सारा रंग पाहून, इतर लहान मुलाप्रमाणं ती सर्व काही विसरली आणि हळू हळू खाली उतरू लागली.

'अग बायानो गात का नाही तुम्ही ?' विद्या ओरडली, तेव्हा सर्वांनी आपला आवाज चढवला.

तारासिंह, ज्ञानचंद, दीवाना, केसरसिंह, जग्गू, रुल्दू, दुल्ला, जमाला आणि आवातले इतर मुसलमान थोड्या अंतरावर उभे राहून हा समारंभ बघत होते. त्या सर्वांनी ओरडून दुजोरा दिला, 'गा, गा ना ?'

आता रानो शुद्धीवर आली आणि ती डोळे फाडून जमलेल्या स्त्री-पुरुषांकडे पाहात राहिली. नवऱ्या मुली कधीच अशा पाहात नसतात. विद्यानं गाणं सुरू केलं. इतर सर्वजणी तिच्या बरोबर गाऊ लागल्या.

पीली पीली दाल तेरी घोडी चरे
और मेरा बन्ना लपककर, घोडीपर सवार हो
और छोटीशी बन्नो कोलेकर महलो मे आए

मग नवरी मुलीच्या बाजूनं पूरनदेवीनं 'सुहाग' सुरू केला. राणीच्या बापाला उद्देशून ती गाऊ लागली.

बावुल तुझे नींद प्यारी है
अरे घरमें कन्या कुंवारी है
सुंदर बेटी तेरी
वर मांगती है
अच्छासा घर मांगती है

इतक्यात गच्चीवरून कोणी तोंडावर मूठ धरून तुतारीचा आवाज केला. त्या आवाजानं सर्वांना समजलं की, वरात दारावर येऊन उभी राहिली आहे. मग काय चोहीकडे एकच धमाल गर्दी उडाली. गावातली सर्व लहान-मोठी माणसं, मुलं, स्त्रिया पुरुष सर्व समोरच्या अंगणात, विहिरीच्या मुंडेरीवर, घराच्या गच्चीवर, झाडांच्या फांद्यावर, मिळेल त्या जागेवर, हा समारंभ पाहण्यासाठी येऊन बसली. पूरनदेवी आणि तिची तिखट सखी विद्या यांनी वरातीला उद्देशून गाणी म्हटली. त्यात त्यांनी पाहुण्यांना, माकड, डुकरं, भडवे--काय वाटेल ती नावं ठेवली आणि गाणी म्हणताना मुद्दाम त्यांनी आपआपल्या 'माणसा'कडं बोटं केली. त्यामुळं खूप हशा पिकला. विहिणी विहिणी नाचल्या 'डोमनिया' गाइल्या.

नाचताना पुरोनं आपले बाहू उंचावले, तेव्हा तिच्या गच्च स्तनावरून घट्ट बसलेली तिची विलायची काचोळी डोळे मिचकावत होती त्या वेळचं हे दृश्य गावकरी अजून विसरले नाहीत. पुरो आणि विद्यानं मिळून काही तिखट आंबट विनोदी गाणी गाइली.

पुदीनेकी करो कडाही रे
मंगल की मा रंडीकी बेटी आईरे
हमारा अच्छा करारा पुदीना

या गाण्यानंतर नबाबची बायको कमशर्यां जेहलम बागवानीण आणि तिच्या तीन मुली आयशा, इनायती आणि सलामती या गाण्यात सामील झाल्या, त्या अशा थाटात. जणू त्यांना सांगायचं होतं की, 'पुदीनी' ही फक्त त्यांनी एकट्याचीच मालमत्ता आहे. त्या साऱ्या मिळून नाचू लागल्या--

हमारा अच्छा करारा पुदीनी
मलाले वाला पुदीनी
मंगलकी बहेन थानेदारोंसे छुडाई रे
पुदीने की करो कडाही रे

झालं ! मग हसणं ओरडणं, नुसता धिंगाणा सुरू झाला. पुरुषदेखील आता त्यात येऊन मिळाले. म्हातारे, मुलं सर्व या हास्यकल्लोळात सामील झाली. कुणी कुणाची वेणी ओढीत होता तर कुणी कुणाला आपल्या बाहूत कवटाळून धरीत होता. कुणालाही कसलीच शुद्ध उरली नव्हती. पूरनदेवी जमालाच्या बाहूत गुरफटली होती. अन् आनंदानं नाचत होती, तर विद्या सरूपाला कवटाळून धरीत होती. बडी खाली येऊन उभी राहिली. इतक्यात तिला कुणाचा धक्का लागला. तिनं डोळे उघडून पाहिलं तेव्हा तिला कळलं की, ती ज्ञानचंदच्या मांडीवर कोसळली आहे आणि तो तिला मोठ्या प्रेमानं कुरवाळीत आहे.

एवढ्यात कुणी तरी चादर ओढली आणि विवाह समारंभ पूर्ण झाला.

सर्व एकदम शांत, स्तब्ध झाले, वधूच्या पाठवणीची वेळ आता येऊन ठेपली होती. माहेरची मंडळी गाऊ लागली.

बाबुल, अब तेरा क्या दावा है
दूल्हा का बाप डोलीकी मुन्नियां पकडे खडा है
अब दावा उसका है
भैया, तेरा अब क्या दावा है
दूल्हा का भाई डोली के बाजू थामे खडा है
अब दावा उसका है

आणि शेवटी नवऱ्या मुलीचा एकच करुण बोल--

बाबुल चारो ओर मेरी गुडिया बिखरी है
लेकिन मुझे खेलनेका चाव नही.
बाबुल, साठ सहेलिया मेरेदरवाजे खडी हैं
लेकिन मुझे उनसे भी मिलनेका चाव नही
हाय मा रोजीकी अंगिया सिज गई
और बाप तो दरया होरहा है

मग वधूचं मुखदर्शन, जगाचं हसणं आणि शेवटी सिरजोडी एकांतात पति-पत्नीची मस्तक मिळवणी !

रानोला आणि मंगलला धरून त्यांनी खोलीत ढकललं आणि बाहेरून कुलूप लावलं. चुम्मू, त्यांचे दोन जुळे भाऊ आणि बडी तिथं समोरच उभी होती. त्यांचे डोळे विस्मयाने नुसते विस्तारले होते.

## पूर्वार्ध समाप्त : उत्तरार्ध पुढील अंकी

# पाक्षिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**दि. १६ ते २८ फेब्रुवारी ७४**

## अर्थमंत्री यशवंतराव चव्हाण यांना अनुकूल काळ

भारताची रास मकर तर लग्न कर्क आहे. कर्क राशीला काळ अत्यंत खडतर आहे. प्रामुख्याने बौद्धिक अध:पात, भ्रष्टाचार, कर्तबगारीचे अवमूल्यन व त्यातून निर्माण झालेलें भयंकर आर्थिक संकट हे आपल्या देशाचे सध्याचे चित्र आहे. पंतप्रधान इंदिरा गांधी या नजिकच्या काळात काही फेरबदल मंत्रीमंडळात करतील. पण काही व्यक्तींच्या बाबतीत त्यांना माघार घ्यावी लागेल. केंद्राच्या किंवहुना भारताच्या एकंदर आर्थिक व राजकीय व्यवहारात यशवंतराव चव्हाण हीरो ठरावेत असे त्यांचे ग्रह आहेत. आर्थिक परिस्थितीच्या भीषणतेला पंतप्रधानांचे खास हेतू व त्याचा वापर जबाबदार असल्याचे यावेळी उघड होईल. चव्हाण यांच्याबद्दल देशात आशावादी वातावरण निर्माण होऊ लागेल. पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा प्रभाव गेल्या काही दिवसापेक्षा वाढण्याची शक्यता आहे. पण उत्तर प्रदेशात कॉंग्रेसला अपेक्षे-इतके यश मिळणार नसून त्यामुळे 'स्थिर सरकारची' तेथे एक प्रकारे मोठी समस्याच त्यांच्यापुढे निर्माण होईल. त्याचबरोबर राजकारणाबद्दलचा काहीसा उद्वेग त्यांच्या ठायी निर्माण होऊ लागेल. पर्याय म्हणून देखील यशवंतराव लोकांच्या-विचार-वंतांच्या चर्चेचा विषय होतील. उत्तर प्रदेशात जनसंघाचे बळ निश्चितपणे वाढणार असून प्रामुख्याने अटल बिहारी वाजपेयी यांना देशाच्या राजकारणात महत्त्वाचे स्थान प्राप्त होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्राच्या दृष्टीने श्री. वसंतराव नाईक लोकांच्या घेरावातून पार होतीलच. मात्र त्यांना केंद्रात नेण्याचा विचार उच्चक्षेत्री चालू होईल असे वाटते. गुजराथ लोकशाही सरकारच्या हातून निसट-ण्याची शक्यता आहे. मधू लिमये, बॅ. अंतुले, पी. के. सावंत, पी. एन. हक्सर, सौ. शशीकला काकोडकर या व्यक्ती क्षितिजावर चमक-ण्याची शक्यता आहे.

### मेष : मोठे आर्थिक व्यवहार

माणस खरे म्हणणे नियतीच्या हातचे एक बाहुले असतो. तो स्वत:ला शहाणा समजत असला व कर्तृत्वाचे श्रेय स्वत:कडे घेत असला तरी ते श्रेय खरे अंतरिक्षातील ग्रहाचे असते. माणसाची शेंडी त्याच्याच हाती असते. तुमच्या राशीचा मालक आहे मंगळ आणि तो तुमच्या राशीतून आता बदलला आहे. तुमचे वर्चस्व, तुमचे सामर्थ्य गेले आठ महिने या मंगळाने तळपत ठेवले होते. पण आता त्यात थोडीफार उणीव भासणार आहे. उत्तुंग महत्त्वाकांक्षा व न पेलणारी स्वप्ने याच्या आहारी जाऊ नका. असाच इशारा हा वृषभ राशीतील मंगळ तुम्हाला देत आहे. पाय जमिनीवर ठेवा आणि थोडे-फार व्यवहारी बना. त्यामुळेच शेवटी फायदा होईल. पाठीवरील मंगळाचा हात दूर गेला असला तरी गुरूची प्रसन्न सावली गेल्याच पंधरवड्यात तुम्हाला लाभू लागली आहे. पैशासाठी आता वणवण करावी लागणार नाही. हा गुरू पैसा मिळवण्याचे अनेक मार्ग तुमच्यापुढे मोकळे करील. रेंगाळत पडलेली पैशाची अनेक कामे गती घेतील. धंद्याउद्यो-गाचे तोटयात चाललेले गाडे नफ्याच्या रुळावर येईल. नोकरवर्गाने उद्योगधंद्यात संपाच्या व स्लोवर्कच्या रूपाने केलेले नुक-सान भरून येईल. श्रेष्ठ उद्योगपतीचे सक्रीय सहाय्य मिळेल. नोकरीत बढती बदलीचे जमावे. पगारवाढीचा विचार होईल. राव-साहेब यावेळी लॉटरीत देखील तुमचे नशीब उघडेल असे योग आहेत. परीक्षार्थी विद्या-र्थ्यांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे. महिलांस : तुमच्या स्वभावात समंजसपणा येऊ लागणार आहे. नोकरीत वरिष्ठांची कृपा लाभणार आहे. नोकरीचे प्रयत्न यशस्वी होतील. ◻

### वृषभ : स्वैर होऊ नका.

गेले आठ महिने बाराव्या मंगळाने तुमचा अतोनात पिच्छा पुरवला. मुळातच तुम्ही हळव्या मनाचे, कोमल वृत्तीचे व अनिर्बंध वर्तनाचे. शुक्र हा तुमच्या राशीचा मालक असून तो जशी रसिकता बहाल करतो तशीच सहृदयता, स्त्री आसक्ती आणि स्वैराचार यांना वागण्यात भरपूर साथ देतो. या वृत्ती-वर आता मंगळासारख्या 'हीट' ग्रहाची पकड बसलेली आहे. त्यामुळे तुम्हाला प्रथम आवश्यकता आहे ती मन ताब्यात ठेवण्याची. दि. १९ नंतर व्यसनाच्या आहारी जाण्याचा धोका आहे तो कटाक्षाने टाळा. मुळातच तुम्ही व्यसनी असाल तर चांगल्या माणसांच्या सहवासात जास्तीत जास्त वेळ घालवा. परस्त्रीपासून सावध राहा. ताडीच्या झाडा-खाली दूध प्यालात तरी लोक भलताच संशय घेतील. प्रत्येक पाऊल आजूबाजूस लक्ष ठेवून टाका. हा पंधरवडा एरवी तसा प्रतिकूल वा नुकसानीचा नाही. गुरूचे दशम-स्थानी झालेले प्रस्थान अजून काही काळ उपयोगी पडणारे नाही. पण नोकरीत वा धंद्यात थोडीफार सुधारणा होईल. नोकरी-तील दगदग कमी होईल. एखाद्या खास कामगिरीवर नेमणूक होऊन प्रवासही घडेल. कलावंताच्या मनात घर करून राहिलेले फार दिवसाचे स्वप्न साकारू लागेल. एखाद्या तरुणाचे चित्रसृष्टीत पाऊल पडेल. प्रथम प्रसिद्धीचा योगदेखील एखाद्याच्या वाटयाला येईल. राजकारणात मात्र तडजोडीने यश मिळेल. उच्च पदावर असलेल्या व्यक्तीला मनाविरुद्ध तडजोड करावी लागेल. सौंदर्य प्रसाधने व उच्च दर्जाचे कापड तयार करणारे उद्योग भरभराटीला येतील. या उद्योगातील या राशीच्या नोकरांना पगार-

वाढ मिळेल. महिलांस : वरिष्ठांच्या गोड-बोलण्यास भुलून मोहाला बळी पडू नका. तरुणींनो, प्रेम आंधळे असते. त्यामुळे पाय घसरेल याची जाणीव ठेवा. ¤

**मिथून : संमिश्र फलप्राप्ती**

साडेसातीचा फेरा संपला नसला तरी तो पूर्वीच्या इतका तीव्र निश्चितच भासणार नाही. मात्र बाराव्या मंगळाचे उग्ररूप तुम्ही लक्षात घेणे आवश्यक आहे. मिथून ही बौद्धिक रास आहे. मंगळ प्रथम परिणाम करतो तो बुद्धीवर. याचा अर्थ आपण आता तापटपणा, भांडखोरपणा, चिडखोरपणा याच्या आहारी न जाता जास्तीत जास्त गोडी गुलाबीने घेऊनच आपला कार्यभाग साधणे आवश्यक आहे. नोकरीत काम जास्त पडले तरी कुरकुरत न बसता, वरिष्ठांच्या आज्ञेत राहून काम करावे. कर्जाचा, जमीन-जुमल्याचा लेखी व्यवहार चांगल्या सल्ला-गाराशिवाय करू नये. बेकारांनी जादा स्वाभिमान व अहंकार बाजूला ठेवूनच नोकरीच्या शोधात जावे. व्यापारी व इतर कोणतेही धंदे करणारे यांनी लोकांना विश्वासात घेऊनच धंदा करावा. नवा धंदा सध्या काही दिवस तरी करू नये. आर्थिक व तांत्रिक पेचप्रसंग निर्माण होईल. पिठाची गिरणी, पाण्याचे इंजिन, छपाईचे मशीन इत्यादी स्वरुपाचा धंदा सूरू केल्यास तो यश देण्याची शक्यता कमी आहे. कुणाचेही काम वेळच्या वेळी देता येणार नाही, यंत्रात बिघाड होऊन नुकसान होईल. कोणत्याही स्वतंत्र उद्योगात मालक-मजूर तंटा सुरू होऊन नुकसान पोचण्याची शक्यता दृष्टीआड करू नका. कामगारांना वरिष्ठांनी कडक वागणूक देऊ नये. त्यातून चिडाचीड निर्माण होऊन त्रास होण्याचा धोका आहे. चालू नोकरीत संयमाने वागल्यास फायदा होईल. प्रकाशन व्यवसाय व वृत्तपत्र यात काम करणाऱ्या नोकर वर्गाला बेकारीची भीती वाटत राहील. पण ती भीती अनाठायी ठरेल. प्लॅस्टीक धंदा व शेतीचा व्यवसाय यात सुधारणा होईल. आर्थिक परिस्थिती सुधारेल. कर्ज वसूल होईल. गुरूची नवम दृष्टी पूर्ण असल्याने अविवाहितांचे विवाह चटकन घडून येतील. जोडीदारदेखील मना-सारखे मिळतील. महिलांस : नोकरीत हिताच्या घटना घडतील. तरुणींना प्रेमाचा साक्षात्कार होईल. ¤

**कर्क : संघर्षाचा काळ.**

"आपणास बाराव्या शनीची म्हणजे साडे-सातीची बाधा आहे. त्यातच आतां गुरू बदलला असून त्याचे छत्र नाहीसे झाले आहे. मंगळ अकरावा असला तरी रवीदेखील प्रति-कूल आहे. ग्रहांची प्रतिकूलता असली कीं केवळ खचून जाऊन त्याचा उपयोग नसतो. कुलदेवतेला विनम्रपणे शरण जाऊन तिची आराधना करणे श्रेयस्कर ठरते. आपण तेंच करा म्हणजे यांतून निभावून जाल. रोज देवीचे दर्शन घ्या व देवीस्तुती म्हणा. मंगळ दहाव्या स्थानावरून अकराव्या स्थानी आला आहे. नोकरीत चुका होऊं न देतां काळजी-पूर्वक काम करा. आशा आकांक्षा व स्वप्ने याच्या फारश्या आहारी न जाता वास्तवाशी प्रामाणिक राहावे. बरोबरच्या माणसावर-देखील विश्वास ठेऊं नये. बेकारांना आशा फार लावली जाईल पण त्यामुळे हुरळून जाऊं नये. इंजिनियर, कृषी पदवीधर व डॉक्टर यांना थोडेफार व्यावसायीक यश मिळूं शकेल. नाटकाचे कॉन्ट्रक्टर, चित्रपटाचे डिस्ट्रीब्यूटर्स व या राशीचे जाहिरात वितरक यांनी आपल्या धंद्याच्या बाबतींत दक्ष राहावे. नाहीतर पैसा बुडण्याची शक्यता नाकारू नये. लेखक व प्रकाशक यांनी नवनिर्माण साहित्या-बद्दल खूप मोठ्या आशा वा अंदाज धरूं नये. कापड व्यापारी संभ्रमात पडतील तर तयार कपडयाचे निर्माते नियत्रणानी त्रासून जातील. अकरावा मंगळ जरी पैसा खूप देणार असला तरी तो शिलकेत पडणे जरा जडच जाईल. रक्तदाब, उष्णता, पित्त, अपचन यासारख्या आजाराचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. प्रेमात फसवणुकीचा प्रकार होईल तर ठर-लेल्या विवाहांत कांही तरी अडचण आयत्या-वेळी निर्माण होईल. वाहन खरेदींत अडचणी येतील व पैसा फार खर्च होईल. वकिलांच्या केसीस् फेल जातील व कधींहि न चिकटलेले अपयश त्यांना चिकटेल. मन तर सतत अस्वस्थ राहील. महिलांस : गुरूचे पाठबळ आता संपलेले आहे. विवाहाचा बेत तूर्ततरी आखू नये. ¤

**सिंह : यशाकडे वाटचाल.**

राजकारण हा सिंह राशीचा एकमेव बल-वान धर्म असून रवी हे त्याचे अधिदैवत आहे. या रवीची कृपादृष्टि यावेळी तुमच्या-वर तर आहेच. पण वृषभ मंगळाचे दशम-स्थानातील प्रस्थान अनेक बाबतींत तुमचे यश उठाव करणार आहेत. राजकारणांत जवळ-जवळ गेले वर्ष तुम्ही पडद्याआडच होता. सत्तेतील व तुम्ही ज्या पक्षाचे असाल त्या पक्षातील वरिष्ठांनी तुम्हाला नामोहरम कर-ण्याचा तुमच्याविरुद्ध कटकारस्थाने रचून तुम्हाला नाउमेद करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. तुम्ही नामशेष झाला नाही पण निराश तर नक्कीच झालांत, पण हे सारे आतां संपले आहे. आतां तुमच्या यशाचा काळ सुरू झाला असून त्या रथाची दोरी गुरू, मंगळ, रवी व हर्शल यांच्या हाती आहे. आतां तुमच्या उत्तुंग राजकीय महत्त्वा-कांक्षेला वसंत बहार येणार असून तुम्हाला आकर्षक व्यक्तिमत्त्व प्राप्त होणार आहे. तुमच्यावर अनेकांच्या दृष्टि एकवटणार असून तुम्हाला नेतृत्त्व प्राप्त होणार आहे. निरनिराळ्या पदावर असलेले पुढारी व नेते लोक स्तुतीला योग्य ठरणार आहेत. त्यांच्या-वरचा लोकक्षोभ दूर होईल. नोकरीत त्याच्या-वर झालेला अन्याय दूर होईल. त्यांचे पूर्वीचे स्थान त्यांना मिळेल. दि. १७ ते २१ व दि. २५ ते २८ हा काळ जास्त महत्त्वाचा आहे. जीवनांत अशी एकादी महत्त्वाची घटना घडेल की त्यामुळे तुमच्या मनातील निराशा पार लोपून जाईल. पैशाचे मान आतां बरेच सुधारणार आहे. कर्जातून मुक्त होण्यासारखा पैसा मिळेल. कोणताही उद्योग वा व्यवसाय अडचणीतून आतां पार पडेल व नफा मिळवून देईल. तुम्ही जर शेअर्सचा धंदा करीत असाल तर तो खूप नफा मिळवून देईल. औषधी कारखाना तेजींत चालेल. फिरता व्यवसाय फायद्याचा ठरावा. लेखी व्यवहारांत व कौटुंबिक सुखात जमेची बाजू राहील. महिलांस : नोकरीत बरे दिवस येतील. हातीं चार पैसे खेळतील. लघुउद्योगांत प्रगती होईल. ¤

**कन्या : मंगळापासून सुटका**

अंतरिक्षातील ग्रह अवकृपा करू लागले की माणसाचे त्यांच्यापुढे काही चालत नाही. त्यांनी निर्माण केलेले भोग भोगायला हवेत. दैववादी बनणे हे दुर्बल मनाचे लक्षण आहे

असे अनेक 'पुरोगामी' मानतात. पण चोरून मारून भविष्य वाचतात. आपणास ग्रह कसे आहेत ते ज्योतिषाकडे 'हळूच' जाऊन समजून घेतात. तात्पर्य ग्रह एकदा आपले राज्य चालवू लागले की त्यांच्या आज्ञा मुकाटचाने ऐकून त्या पालन करणे व ईश्वरी उपासना करणे हेच शेवटी माणसाच्या हिताचे ठरते. कन्या रास व लग्न असलेल्या माझ्या सर्व स्त्री-पुरुष बांधवाना मला लिहायला आनंद वाटतो की आठव्या मंगळाच्या भयंकर जाचातून त्यांची आता सुटका आली आहे. गेल्या आठ महिन्यात या मंगळाने शारिरीक दृष्टचा अक्षरशः दुबळे करून सोडले होते. हाच मंगळ आता तुमचे भाग्य उभारण्यासाठी आला आहे. वृषभ राशीतील हा भाग्यस्थ मंगळ चिखलात रुतलेला तुमच्या आशाआकांक्षाचा, प्रगतीचा रथ सूर्यरथाच्या वेगाने घोडदौड सुरू करून देणार आहे. मन आणि शरीर ही दोन्ही आता कार्यान्वित होणार आहेत. रक्तदाब, निराशा, मनाची भीतिग्रस्त अवस्था, काळजी, रक्ताशी संबंधित असे अनेक आजार, हृदयविकार, थकवा, अशक्तपणा आणि या सर्वातून निर्माण झालेले नैराश्य व उदासपणा आता नष्ट होणार असून जीवनात प्रगतीचे नवेपान लिहिले जाणार आहे. नोकरीत हळूहळू का होईना प्रगतीचे चिन्ह दिसू लागणार आहे. वरिष्ठांची दूर लोटली गेलेली सहानुभूती पुन्हा तुमच्याकडे झुकू लागेल. पूर्वी तुमची कोणतीही मागणी धुडकावून लावली जाई ती परिस्थिती आता उरणार नाही. मालक वा वरिष्ठ काहीसे आपुलकीने वागतील पत्रव्यवहारात यश मिळेल. **महिलांस :** चौथ्या राहूचा अजून त्रास जरी असला तरी मंगळाचा त्रास कमी झाला आहे. नोकरीच्या प्रयत्नात यश आहे. ◘

## तूळ : फक्त तब्येतीला जपा

हळव्या मनाचे व नाजूक स्वभावाचे तुम्ही लोक आहात. तुमच्या जीवनात बुद्धीला जेवढे कमी महत्त्व तेवढेच भावनेला जास्त महत्त्व आहे. कोणीतीही घटना घडली—अर्थात वैयक्तिक जीवनात-तर त्याचा विचार तुम्ही बुद्धीपेक्षा भावनेतून करता. त्याचा परिणाम मन सतत अस्वस्थ व त्रस्त राहाण्यात होतो. तूळ राशीवर शुक्राचा प्रभाव आहे. त्या शुक्राचे कलागुण वा कलावृत्ती ही ज्याप्रमाणे तुम्हाला देणगी आहे त्याचप्रमाणे आचारात स्वैरता व लहरीपणा हा देखील तुम्हाला शापच ठरला आहे. भाऊसाहेब, आठव्या-स्थानी मंगळ म्हणजे तुमच्या शरिराला व मनाला त्याने घातलेला एक 'घेराव' आहे. मंगळ हा 'लष्कर वा पोलिसी' सामर्थ्याचा ग्रह आहे. त्याचाच तुम्हाला घेराव म्हणजे काय ते समजा ! यातून कौशल्याने तुम्हाला सोडवण्याचे सामर्थ्य गुरूत असले व तो आपल्या परीने प्रयत्न करणार असला तरी शेवटी कोल्हापूरच्या अंबाबाईची उपासनाच तुमच्या उपयोगी पडणार आहे. मला मुद्दाम सांगावेसे वाटते. की पत्नी असो वा परस्त्री असो स्त्रीबरोबरचे 'शारीरिक संबंध' निदान आणखी दोन-तीन महिने कटाक्षाने टाळावेत. स्वतःशी संबंधीत असे कोणतेही आजार या प्रकारातून निर्माण होणारी शक्यता आहे. तुमचे मत कधी आशा तर कधी निराशा या सीमेवर रेंगाळत राहील. रोज रात्री साधारण साडेसात ते १२ वाजता मन भीतिग्रस्त राहील. चार चौघात बसलात तरी एकाकी एकटे असल्यासारखे वाटेल. झोपेवर परिणाम होईल. ठरलेली कामे हातून पार पडणार नाहीत. हर्शल चंद्रावर आहे. रात्री जो जागेचा भाग निर्षाद्ध म्हणून समजला जातो तेथे जाणे कटाक्षाने टाळावे. नोकरीत अनुकूलता लाभेल. पैसेही बरे मिळतील. **महिलांस :** सौंदर्य प्रसाधनांनी नटून, थटून संध्याकाळी ६ ते ८॥ या दरम्याने बाहेर फिरण्याचे टाळावे. नोकरीत अनुकूलता. ◘

## वृश्चिक : फक्त सुखाची उणीव

अहंकार, उग्र व अतिरेकी स्वभाव पण वेधक कर्तृत्व हे तुमच्या व्यक्तिमत्त्वाचे खास गुण होत. तुमचे मंगळाच्या धर्माने आकारलेले असे व्यक्तिमत्त्व आहे की, तुम्ही ज्यांच्याकडे पहाल ते घायाळ होतील व तुमच्याकडे जे पाहतील ते तुमच्याकडे आकृष्ट होतील. तुमच्या मनात निर्माण होणाऱ्या महत्त्वाकांक्षेला तोड नाही. हा राशीस्वामी मंगळ आता तुम्हाला जशी फारशी साथ देणार नाही, त्याचप्रमाणे कर्तबगारीला मदत करणारा गुरूदेखील तुमच्यावर रुसला आहे. गुरू हा सात्त्विक धर्माचा ग्रह असला तरी तो तुमच्या सुखाला हेलकावे देत राहणार आहे. तुम्ही निराश व्हावे किंवा जीवनातून उठून जावे असे काही वाईट हे ग्रह करणार नाहीत. पण धाडस, अतिरेकी स्वभाव कटाक्षाने टाळा. आपला हट्ट चालवू नका. नोकरीत बढती, प्रमोशनचा विचार होईल. पण वरिष्ठांची बोलणी मात्र खावी लागतील. मालक अगर विश्वस्त तुमच्याशी थोडे संशयानेच वागतील. प्रत्यक्ष तुमचे नुकसान असे काही करणार नाहीत. व्यापार उदीम, कारखानदारी, निरनिराळ्या उत्पादनाचे व्यवसाय व्यवस्थित चालतील. नोकरांकडून त्रास होणार नाही. पण कोणत्या ना कोणत्या काळजीने मन व्यग्र राहील. मोठेमोठे आर्थिक व्यवहार वा पैशाची देवघेव शक्यतो टाळा. नोकरीत हे काम ज्याच्याकडे असेल त्याने एखादा विश्वासू सहकारी बरोबर नेहमी ठेवावा. मूळच्या गुरूच्या स्थितीप्रमाणे तुम्ही बंगल्यात राहायला जाल किंवा तुमच्या राहत्या जागेची मोठी समस्या निर्माण होईल. वृद्ध वडील व आई अगर घरातील वृद्ध माणसे यांच्या तब्येतीला जपणे आवश्यक आहे. यावेळी आपणास वाहनखरेदीचा वा वाहनसुखाचा योग मोठा जबरदस्त आहे. अनपेक्षित आजारासाठी कोणत्याही क्षणी पैशाची पिशवी मोकळी होईल. **महिलांस :** त्रैलोकीचे सुख मिळाले तरी मनाचे सुख मात्र तुम्हाला उपासनेनेच मिळवावे लागेल ◘

## धनू : नव्या क्षेत्रात प्रवेश

एक नामवंत विचारवंत व नैतिकदृष्टचा एक वजनदार व्यक्ती म्हणून धनूराशीच्या व्यक्ती ओळखल्या जातात. कारण धनू राशीचा स्वामी आहे गुरू. वृत्ती सात्त्विक, स्वभाव क्षमाशील व सज्जन व आचरण शुद्ध असते. या व्यक्तीचा नैतिक दर्जा फार मोठा असतो. म्हणून गुरू वा शनी या एका एका राशीत दीर्घ काल राहणाऱ्या ग्रहांचा या राशीवर जेवढा परिणाम होतो तेवढा गोचरीच्या व तात्कालिक ग्रहांचा परिणाम होत नाही. याचा अर्थ हे ग्रह आपला प्रभाव पाडीत नाहीत किंवा मुळीच परिणाम घडवीत नाहीत असे नव्हे. पाचवा मंगळ आता वृषभ राशीत येत आहे. सहावे स्थान हे शत्रू स्थान आहे. तसेच पोटातील लिव्हर हेही सहावेच स्थान आहे. धनू व कन्या राशीबरोबर जे लोक निगडीत होते त्यांना गेले वर्षभर लक्षात रहावा इतका काळ वाईट गेला आहे. तब्येतीची सतत कुरकुर चालू होती. नोकरीत आत्यंतिक अप्रियता वाटचाला आली. राजकारणात लोकक्षोभाचा व कामाचा फार त्रास तुमच्या वाटचाला आला. पण प्रिय मित्रांनो, मला आता लिहायला आनंद वाटतो तो हा की या चक्रव्यूहातून तुम्ही आज बाहेर

पडला आहात. तुमच्या जीवनात आता नव्या युगाची व नव्या पर्वाची सुरुवात होणार आहे. नोकरी व्यवसायाची परिस्थिती गुरुकृपेने काहीशी अनुकूल राहील. मकरस्थ गुरूत तुमच्या हातून जी वाईट कृत्ये घडली किंवा तुमची बुद्धी संशयाच्या आहारी गेली तशी ती यावेळी जाणार नाही. कारण राशीस्वामी गुरू तिसरा झाला आहे. मित्रांचे सहकार्य मिळेल. नव्या कल्पना आणि योजना प्रत्यक्षात आणू शकाल. नातेवाईकांचे व मित्रांचे चांगले सहकार्य मिळेल. लेखनात कीर्ती व पैसा मिळेल. नव्या नोकरीचे प्रयत्न यशस्वी होतील. कोणताही नवा धंदा सुरू करायला हरकत नाही. मन:स्थिती व शरीरस्थिती सुधारेल. प्रवास घडेल. **महिलांस :** सार्वजनिक कार्यात मान व यश मिळेल. राजकीय नेतृत्त्व मिळेल. लेखिकांना कीर्ती मिळेल. नोकरीत यशप्राप्ती होईल. ¤

**मकर : मनस्थिती बिघडेल**

मकर रास ही व्यथा व वेदना सोसणारी रास आहे तशीच ती आत्यंतिक मानी रास आहे. महत्त्वाकांक्षा किंवा राक्षसी महत्त्वाकांक्षा या व्यक्तीला जेवढी असते तेवढी इतर कोणत्याही राशीला असत नाही. ही शनीची रास आहे. शनीचे उपरोक्त गुण या राशीत उतरलेले असतात. मकर राशीतून गुरूचे प्रस्थान आता उठले आहे. रवी व गुरू दुसरा झाला आहे. मंगळ हा मकर राशीला आपली रासच मानतो. तो वृषभ राशीत गेला असून पंचमस्थ बनला आहे. शनी सहावा आहे. ही सारी ग्रहस्थिती जरी उत्कृष्ट व अनुकूल नसली तरी दगडापेक्षा वीट मऊ या न्यायाने गेल्या पंधरवड्यापेक्षा निश्चित अनुकूल आहे याची खात्री बाळगा. गेल्या अनेक दिवसात तुमची कोंडी झाली होती, विचारशक्ती दुबळी झाली होती व काय करावे कोठे जावे ? अशी जी तुमची स्थिती झाली होती तिचा आता मागमूसही राहणार नाही. विशेष करून राजकारणात तुमच्याकडे उच्च स्थान असून तुमचा प्रभाव पडत नव्हता. आता तुमच्यातील रुद्रावतार जागा होईल. तुमची दूर गेलेली लोकप्रियता जरी शंभर टक्के परत मिळाली नाही तरी तुमची बाजू घेणारा अनुयायीवर्ग पुन्हा तुमची स्तुती स्तोत्रे गाऊ लागेल. नोकरीत त्रास कमी होईल. कामाचा ताण थोडा सुसह्य होईल. कौटुंबिक जबाबदारीचा भार हलका होईल. मन:स्थिती व तब्येत सुधारेल. आर्थिक स्थिती अजून हवी तेवढी अनुकूल नसली तरी थोडीफार सुधारेल. नव्या संसारात बालक येईल. पुत्रजन्माचे सुख लाभेल. विवाहाचा प्रश्न मात्र थोडा रेंगाळण्याची शक्यता आहे. **महिलांस :** सार्वजनिक कामात यश. वारसा हक्काने संपत्ती मिळेल. नोकरीत वरिष्ठांची मर्जी लाभेल. लॉटरीत पैसा मिळेल. ¤

**कुंभ : विजयाकडे वाटचाल**

रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उष:काल याचाच प्रत्यय आता तुम्हाला येऊ लागला असेल. बारावा गुरू आणि तोही मकर या त्याच्या नीच राशीत. मग काय विचारता ? या मकर गुरूने तुमच्या बुद्धीला अक्षरश: अंधार आणला होता. शनीचे अनेकविध क्षेत्रातील कर्तृत्त्व खरे म्हणजे तुमच्याच ठायी आविष्कृत होते. पण एकटा गुरू प्रतिकूल असल्यामुळे तुमच्याकडून जे घडू नये ते घडून गेले. पण तुमचा तोल आता सावरणार आहे. तुमच्यातील मूळचा एक धूर्त, मुत्सद्दी असा कर्तबगार पुरुष जागा होणार आहे. तुमचे हरवलेले स्थान तुम्हाला गवसणार आहे. मंगळ सुखस्थानी आला असला तरी तुम्हाला तो एवढा प्रतिकूल नाही. रवी तर राशीतच आहे. गुरूची कृपा तुम्हाला लाभली आहे. आता तुमच्या मनातील स्वप्ने साकार होऊ लागतील. या पंधरवड्यात दि. १७ ते १९, २१ ते २४ व दि. २७, २८ हा काळ मुद्दाम नोंदून ठेवा. अनेक दृष्टीने महत्त्वाचा ठरावा. तुम्ही पत्रकार असाल तर तुमच्या टीकेने खळबळ उडणार आहे. सत्ता व राजकारण या दोन्ही क्षेत्रात तुमच्या कर्तृत्त्वाला मोठे स्थान व वाव मिळणार आहे. एखादे महत्त्वाचे पद तुमच्या पदरी पडेल. नोकरीत तुम्हाला खास बढती देऊन तुम्हाला हवी असलेली बदली मिळेल. तुमच्या मानाने शिरपेच इतरांना आश्चर्य वाटावे इतके मोठे असतील. समित्या, मंडळे इत्यादी एखाद्या मंडळावर तुमची खास नेमणूक होईल. महसूल व बांधकाम खाते, पुरवठा खाते यातील नोकरवर्ग वरिष्ठांकडून प्रशस्ती मिळवील. लोखंडी कारखानदार व व्यापारी खुशीत असतील. कारण त्यांच्या मालाला चांगली बाजारपेठ लाभेल. या धंद्याच्या उद्योगातील अडचणी दूर होऊन प्रगतीची चिन्हे दृष्टिपथात येतील. इतके दिवस रेंगाळलेला एखादा नवा उद्योग आता सुरू करायला अनुकूल परिस्थिती आहे. कलावंतांना आर्थिक स्थैर्य लाभेल. **महिलांस :** विवाहेच्छू कुमारिकांचे विवाह यावेळी विनासायास पार पडतील. ठरत नसल्यास ते ठरतील. पैसा मिळेल. ¤

**मीन : वेग मंदावेल.**

अंतरिक्षातील नवग्रहांत रवी हा सम्राट असला तरी बुद्धीचे नृतृत्व गरुकडेच आहे. माणसाकडे कितीही कर्तृत्व असले तरी त्याला बौद्धिक स्थान नसेल तर ते जीवन व्यर्थ होय. मीन रास ही गुरुचीच रास आहे. गेले तेरा महिने गुरु अकरावा होता. तो तेवढासा बलवान नव्हता पण त्याने तुम्हाला बरेच दिले आहे. आता मात्र नियतीने आपली दिशा बदलली आहे. चौथे हे सुखस्थान शनीने आधींच दूषीत करून ठेवले आहे. त्याच्याबरोबर केतू आहेच. गुरू बारावा आला आहे. मंगळ तेवढा मात्र अनुकूल आहे. रवीदेखील अनुकूल नाही. यावेळची एकंदर ग्रहपरिस्थिती अशी आहे की कोणतेही पाऊल उचलताना दहा वेळ विचार करावा लागेल. जे करावे ते उलट होईल की काय अशी परिस्थिती निर्माण होईल. आर्थिक तंगी एकदम नसली तरी जाणवणार आहे. ज्यांच्याकडून पैसे येणे आहेत ते फक्त आश्वासने देतील. पैसे मिळवण्याचा कोणताही धंदा केला तरी यश मर्यादितच राहील. कुणाला भेटायला गेलांत तर तो सरळ बोलेल याची खात्री देणे कठीण. नोकरीत वरिष्ठ वा सहकारी समोर एका प्रकारे वागतील तर प्रत्यक्ष कृती विरुद्ध करतील.तुमची एखादी न्याय्य मागणी सरळपणाने काही मान्य होणार नाही. तुम्ही एखाद्या वरिष्ठ जागी काम करीत असाल तर तुमच्याविरुद्ध कॉन्फिडेन्शल रिपोर्ट होईल. मन:स्थिती सतत व्यग्र राहील. हाताखालच्या लोकांवर तुम्ही चिडत राहाल. घरातील वातावरण तुम्ही स्वत:च बिघडवून टाकाल. तुम्ही व्यापारी असाल तर सरकारी कचाट्यात सापडणार नाही याची काळजी घ्या. सर्व प्रकारच्या त्रासाने जीव मेटाकुटीस येईल. कारखानदार व उद्योगपती असाल तर तुमच्या उद्योगात संप, कामगारांचे 'खाडे काम' असे प्रकार घडून प्रगतीला खीळ बसण्याची शक्यता आहे. कोणताही लेखी व्यवहार सध्या करू नयेत. **महिलांस :** भांडण टाळा. खर्चाच्या बाबतीत पिशवीचे तोंड बंद ठेवा.

# पावसाळ्यापेक्षाही नेमाने येणारी सरकारी नाट्यस्पर्धा

पुष्पा भावे

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक संचनालय गेली अनेक वर्षे राज्य नाट्यस्पर्धा आयोजित करीत आहे. त्या स्पर्धाही असतात आणि महोत्सवही ! प्रादेशिक फेरी, अंतिम फेरी, अनागरी नाट्यस्पर्धा, संगीत नाट्यस्पर्धा, बालनाट्यमहोत्सव असा हा नाट्यप्रयोगांचा सोहळा नोव्हेंबर ते फेब्रुवारी चालू असतो. प्रत्यक्ष सोहळा जरी नोव्हेंबरमध्ये सुरू होत असला तरी ऑगस्ट सप्टेंबरपासून नाट्यवर्तुळात लगीनघाई चालू असते. बघे तेव्हापासूनच कोणाचा घोडा लागणार याची चर्चा करीत असतात. आपआपल्या मगदूराप्रमाणे विशिष्ट नाटकाची ' हवा 'ही निर्माण करीत असतात. नाटककार या ऋतूत खूशच खूश–कारण एकदम शंभर सवाशे नाटके रंगमंचावर येतात तेव्हा त्यात कुठेतरी आपल्याही बाडाची वर्णी लागते. काही वेळा संहिता नाट्यसंघाच्या हातात दिल्यानंतर नाटककाराच्या छातीचे ठोके चुकतात तरी बिचारे मधूनमधून तालमीला, जातात. अनेक आवाजांच्या कोलाहलाने मला काही सांगायचंय–असेही ओरडण्याचा यत्न करतात. नायिकेचा शोध जोरात चालू असतो...आणि त्याचबरोबर तितकाच महत्त्वाचा–तालमीच्या जागेचा. हळूहळू एकमेकांचा कानोसा घेणे सुरू होते... ' काय अमक्याकडे स्क्रीप्ट आहे...पण Cast नाही रे चांगला ' ... ' हे नाटक नेपथ्यावर मारणार रे... ' ' वैयक्तिक तर नक्की ' अशी भाषा एकीकडे, तर दुसरीकडे नाटकासाठी नेपथ्यकार–ध्वनिसंकेतकार यांची शोधाशोध आणि नटांसाठी कचेऱ्यातून रजेची जमवाजमव सुरू होते.

याच वेळी नाट्यवर्तुळात कोणी ज्याला ओळखत नाही असा नावगाव नसलेला प्रेक्षक हळूहळू पैसे आणि काही संध्याकाळी शिलकेत टाकीत असतो. यापूर्वी अनेकदा त्याने रंगभवनला झोंबरे वारे अंगावर घेत, संघाच्या खुल्या नाट्यगृहात खुर्चीचा तोल सावरीत, ' वेड्याचं घर उन्हात 'मध्ये डॉ. लागूंना पाहिलेले असते; मधुकर तोरडमल, पुरुषोत्तम दारव्हेकर ही नावे तिथेच प्रथम ऐकलेली असतात. ' शांतता, कोर्ट चालू आहे 'चा विलक्षण प्रयोग–बेणारेच्या भूमिकेत सुलभा देशपांडेला पाहिलेले असते; विजया मेहता, भालबा केळकर, दारव्हेकर, नंदकुमार रावते यांच्या दिग्दर्शनकौशल्याचा नकळत प्रत्यय घेतलेला असतो. आणि आता गेली काही वर्षे तर आपल्या खिशाला फारशी कात्री न लावता तो ' रवींद्र 'मध्ये येऊन नाटके पहात असतो. यंदा स्पर्धेला येताना त्याच्या लक्षात आले, आपल्यापाशी गतवर्षीच्या ' घाशीराम 'च्या प्रयोगाचा रोमांचकारी अनुभव अजूनही आहेच–मग तो नव्या वर्षीच्या पहिल्या दिवशी रवींद्रच्या प्रवेशद्वारापाशी येतो. पण स्पर्धेला तो जसा येतो तसे स्पर्धेतील आजीमाजी नट–दिग्दर्शक येतात, लेखक–प्राध्यापक येतात, नाटककार येतात, स्तंभलेखक–समीक्षकही येतात. मग तो बिचारा अंग चोरून वावरतो. कोपऱ्यात उभे राहून शेंगदाणे खाताना त्याला त्या वातावरणातला ताण आणि उत्साह दोन्ही जाणवतात. मध्यंतरात बाहेर फुलणारी गर्दी, एकमेकांसमोर टाकलेले स्पर्धक, उगीचच इकडून तिकडे मिरविणारी एखादी नाकी डोळी नीटस नायिका, गंभीर चेहऱ्यांनी स्पर्धेच्या भवितव्याची चर्चा करणारी वर्तुळे, एरवी प्रकाशाच्या झगमगाटात दिसणारा एखादा ओळखीचा चेहरा...हे पाहता पाहता त्याला जाणवते, कचेरीच्या दिवसभराच्या ताणानंतर त्याला थकवा आलेला आहे. मग त्याला नव्याने दिवसभर कारकुनी वा तत्सम काही करून रात्री तालमी करणाऱ्या या नाटकी पोरांचं कौतुक वाटायला लागते.

यंदा नाट्यस्पर्धेपूर्वीच अशा एका प्रेक्षकाची माझी ओळख झाली. नाटकाच्या मध्यंतरात तो भेटला तेव्हा एकाच वेळी तो थकलेला आणि तरी ताजा वाटत होता. माझ्यासमोर येत तो म्हणाला, ' काय–कसं चाललंय. ' ' ठीक ' मी संदिग्धपणे म्हटले, त्यावर अचानक बांध फुटावा तसं तो बोलू लागला, ' अहो, पूर्वी खूप पाहिली नाटकं . आता झेपत नाही खिशाला. पण खरं सांगू का... ती मजेची नाटके होती. ही खूप गंभीर आहेत...अहो, पण होतं काय, दिवसभर दमून यायचं–पुन्हा स्टेशनपर्यंत चालायचं... लोकल...नंतर सायकल...या सगळ्यात अवघड नाटक असलं की झोप येते...नाही. चूक आहे. तुमचं ' वेटिंग फॉर गोदो ' आणि ' मिकी ' आवडलं बरं का...पण उठून गेलो, सहन नाही झालं. ' भोपळा ' आवडला... खूप हसलो. ' मी जरा गांगरलेच होते कारण असे इतके स्पष्ट ऐकायची वा बोलायची सवयच नव्हती. आणि नाटकाविषयी बोलायचं तर एक स्वतंत्र परिभाषा इत्यादी इत्यादी...इतके दिवस नावगाव नसणाऱ्या त्या प्रेक्षक चेहऱ्याला वाचा फुटल्यावर मी गांगरले पण तशीच भरून आले. कारण तो चेहरा आता कागदी नव्हता. तो चेहरा जसा कागदी नव्हता तशी आता महाराष्ट्राच्या नकाशातील अनेक गावे आता केवळ नावे नव्हती. ग्वाल्हेर ते लातूर-हैदराबाद आता नाटकी कुटुंब पसरले आहे. यातच एक बोचही जाणवली–अनागरी रंगमंच आपल्यापासून दूर राहतो याची !

यंदाच्या नाट्यस्पर्धेचा निकाल पाहिला तर हैदराबाद, मुंबई, नाशिक अशी ठिकाणे दिसतात. अंतिम फेरीतील एकोणीस नाटकांचा पट डोळ्यासमोर उलगडला तर अनेक अभिजात पाश्चात्य नाट्यकृतींचे अनुवाद : ' वेटिंग फॉर गोदो ' ' लुक बॅक इन अँगर ' (वेदनेचा वेद झाला) ' ब्रान्द ', आजच्या बंगाली नाटकांचे अनुवाद : ' रजनी कृष्ण सजनी ', ' राजरक्त ', ' पुनश्च हरि ॐ ', कादंबरीचा नाट्याविष्कार : ' निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी. ' तरुण नाटककारांची स्वतंत्र नाटके : ' चल रे भोपळ्या टुणुक टुणुक ', ' मिकी आणि

# रंगमंचावरील प्रश्नचिन्हे ?



वेटिंग फॉर गोदो
युनायटेड फ्रेन्डस् कल्चरल ऑर्गनायझेशन : हैदराबाद
'किती दिवस लगाम धरशील ?'



गुरू – इंडियन नॅशनल थिएटर, मुंबई
'मना पण नाय सांगणार गुरू ?'

मेमसाहेव', 'गुरु' अशी विविध नाटके, त्यांची भिन्न रंगरूपे डोळ्यासमोर येतात. त्यातली काही वाचकांसाठी सादर कली आहेत. स्मरणात राहातात काही नाटकातील अनुभवांचे गहन स्वभाव, काहीमधील दृश्यप्रतिमा, काहीतील अभिनय, तर काहीतील बोलके संगीत. हे स्मरणातून जाण्यापूर्वीच निकाल लागतो – वादविवादाचा धुगाळा उडतो – दिशा दिसेनाशा होतात. खरं तर यापूर्वीही परीक्षकांची निवड, प्राथमिक फेरीचा निकाल, अमुक आणि तमुक याविषयी वर्तमानपत्रे रकाने भरून वाहात असतात. पण त्या प्रेक्षकाचा चेहरा आठवला, माझ्या गाठीचा अनेक वर्षांचा प्रेक्षणानुभव आठवला म्हणजे हे सारे वाद अप्रस्तुत वाटतात. प्रस्तुत वाटते नाटककारांचे नाटक – ते रंगवणारा बेभान नटवर्ग – त्याचे संकल्पन करणारा दिग्दर्शक आणि या साऱ्यांपर्यंत थोड्या पैशात मला पोचवणारी ही स्पर्धा... पावसाळ्यापेक्षाही नेमाने येणारी !

स्पर्धा छायाचित्रे
राजदत्त : मुंबई

सारे प्रवासी तिमिराचे, नाट्यनम्रता, नाशिक
‘ देऊ का एक...?’





चल रे भोपळ्या टुणुक टुणुक
उन्मेष युवक प्रायोगिक
नाट्यमंच , मुंबई
‘ सारखा काय झोपतोस ?’



पुनश्च हरि ॐ
‘ येणार का राव ?



पुनश्च हरि ॐ, थिएटर युनिट, मुंबई
'आता रे कसं व्हायचं– ?'



मिकी आणि मेमसाहेब, शिशुरंजन, पुणे
'अरे आता तू असून तरी काय उपयोग ?'



ब्रान्द, लोकमान्य सेवा संघ, विलेपार्ले.
'कुठवर जाशील हे ओझे घेऊन ?'



पारवे स्टेट बँक ऑफ इंडिया
स्टाफ कल्चरल कमिटी मुंबई
'सांग् का तिला....?'



निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी, रसबहार, लातूर
'जाणार कुठे ? करणार काय ?'



तो राजहंस एक, मित्रसहयोग, ठाणे
'नटाचा विदूषक होतो तरी कसा.... ? केव्हा ?'

वेदनेचा वेद झाला, रंजन कलामंदिर, नागपूर
'माझं ते अस्वल कुठे हरवलं ?'





परीक्षक आणि प्रेक्षक
'काय ? कसं वाटतंय नाटक ?

# ती हेलन आहे....

शरद गोखले

एक दोन नव्हे तर वीस वर्षांचे चित्रपट व्यवसायातील वास्तव्य, आणि तेही अपरिहार्य ठरणारे. आणि जवळ जवळ सहाशे चित्रपटांतील उपस्थिती, एवढी उदंड पुण्याई असलेली हेलन आज उतरणीला लागली आहे. आज इतक्या तत्परतेने तिची दखल घेण्याचे कारण एकच, वीस वर्षे ज्या पी. एन. अरोरा यांच्या बरोबर ती एकनिष्ठतेने राहिली त्या आरोरांना राम राम ठोकून आज ती बाहेर पडली आहे. अन्यथा पद्मा खन्ना, जयश्री टी, फरियाल यांच्या चालू जमान्यामध्ये हेलनचे कालचे मोल आज राहिलेले नाही.

घरातील दारिद्र्य, अस्थिरतेचे वातावरण यांना कंटाळून कोवळ्या वयातील अनेक मुली स्टुडिओची दारे ठोठावण्यासाठी मुंबईच्या या मायानगरीमध्ये डोकावतात. अशा अनेक मुलींपैकी ही एक मुलगी. वय असेल १४–१५ पर्यंत, उंची लक्षात येण्यासारखी असली, तरी सिनेमातल्या बाईला ज्या गोष्टींची आवश्यकता असते त्यांचा ठावठिकाणा नसलेली ही कोवळी मुलगी भाबड्या चेहऱ्याने स्टुडिओच्या फेऱ्या मारीत होती. हिन्दीच्या नावाने बोंब आणि उग्र चेहरा असलेली हेलन नायिका बनण्याची शक्यता नव्हतीच. तिच्याही लक्षात आले की, मिळेल ते पदरामध्ये पाडून चार पैसे जोडले, तरच आपली व घरच्या मंडळींची बाराची वेळ निभावणार आहे. छोट्या मोठ्या नृत्यांतून नाचणाऱ्या अनेक मुलींच्या ताफ्यामध्ये हेलन दाखल झाली. धाकटी बहीण, आई आणि भाऊ यांच्या पोटात चार घास जाऊ लागले.

एच. एस. रावेल यांच्या तिरंदाज नावाच्या चित्राचे चित्रीकरण चालू होते. पी. एन. अरोरा नामक निर्माता चित्रीत होणाऱ्या नृत्याचे चित्रीकरण पहात होता. त्याची सराईत नजर मागे नाचणाऱ्या पोरींवर खिळली होती. आणि पंधरा पोरींच्या ताफ्यातून लक्षवेध केला सडसडीत डौलदार बांध्याच्या एका पोरीने. येणाऱ्या चित्रपटांची दिशा अचूक ओळखणाऱ्या या दर्दी निर्मात्याने या हेलनला आघाडीची नृत्यांगना करण्याचे स्वप्न उरी बांधले. औपचारिक ओळखीचे पहिले पर्व पूर्ण झाले. दाणापाण्याचा प्रश्न सुटल्यामुळे हा प्रश्न सोडवणाऱ्या हेलनवर घरच्या मंडळींची माया जडली. कोड कौतुक सुरू झाले. त्यातून आज तर वाढदिवसाचा सोहळा. घरातील मंडळी यथाशक्ती प्रेमाचा वर्षाव करत होती. आणि दारात एक डौलदार मोटार येऊन उभी राहिली. अरोराजी घरामध्ये येऊन दाखल झाले. वाढदिवसाची बातमी या गृहस्थाला लागली कशी, याचे आश्चर्य विरून जाण्यापूर्वी पी. एन. यांनी हेलनचे अभिनंदन केले. ड्रायव्हरला खूण केल्यावर तोफ्याचे जाडजूड पाकिट तो घेऊन आला. त्या काळात ज्याची किमत चारशे रुपयांच्या घरात होती असा आकर्षक पोशाख आरोराजींनी नजर केला होता. हेलनच्या नजरेतील कृतज्ञता, गुतवणुक कारणी लागल्याची जाणीव देणारी होती. आरोरा यांच्या फेऱ्या नियमितपणे सुरू झाल्या. घरामध्ये त्यांचे चांगले स्वागत होऊ लागले. आणि त्यांच्याकडूनही स्मरणपूर्वक भेटी येऊ लागल्या.

हेलनच्या व्यवहारासबंधी त्यांनी बारीक चौकशी सुरू केली. विश्वास निर्माण झाला होताच. क्षणाचाही विलंब न करता हेलनने व्यवहाराची सर्व सूत्रे आरोरांच्या स्वाधीन केली. सोळा वर्षांची हेलन वीस वर्षांची होईपर्यंत तिच्या नावाचा चांगला दबदबा निर्माण झाला होता.

असल्या गचाळ घरामध्ये हेलनने राहणे आरोरांना पसंत नव्हते. एक सुंदरसा फ्लॅट घेण्यात आला. कागदोपत्री हेलनबरोबर आरोरा आपले नाव नोंदवण्यास विसरले नाहीत. हेलनच्या यशस्वी कारकिर्दीचा दुसरा टप्पा सुरू झाला, ज्यांच्या नावावर चित्रपट-वितरक चित्रपट बिनधास्तपणे विकत घेत असत, असे बडे बडे कलाकार, दिग्दर्शक असले तरी वितरक एक प्रश्न हमखास विचारत... पिक्चरमे हेलन है ? आणि निर्मात्याने अपेक्षेप्रमाणे होकारार्थी उत्तर दिले तर नही, यूंही पूछाँ, असे म्हणून हसून घालवत आणि एखाद्या निर्मात्याने नकार दिला तर वितरक केवळ नकार देऊन थांबत नसत, हेलन पाहिजेचचा आदेश दिला जाई. आणि त्याची अंमलबजावणी झाल्यासच पुढील व्यवहार पूर्ण होई. हेलन-पूर्वी नृत्यांगना नव्हत्या, किंवा हेलन ज्या काळात नाचली त्या काळात अन्य कोणी मुली नव्हत्या अशातला भाग नाही. पण हेलनने प्रेक्षकांना जिंकून घेऊन जो एक जबरदस्त पगडा संपादन केला होता त्याचे मोल कोणाला, अगदी वितरकांनासुद्धा नाकारता येणे शक्य नव्हते.

असे गांगरवून टाकणारे यश मिळवल्यावर जी प्रचंड रक्कम जमा होत गेली, त्याचे काय झाले. व्यवहार चतुर अरोरा यांनी हेलनवर सर्वार्थाने स्वामित्व मिळवले होते. त्यांच्या पत्नीनेही वस्तुस्थिती स्वीकारली होती. हेलनच्या अन्य कुटुंबियांना तर सोडाच, पण खुद्द हेलनलाही चतुर अरोराजींनी सर्व आर्थिक व्यवहारापासून कटाक्षाने दूर ठेवले.

अत्यंत सामान्य चित्रपट देणाऱ्या ऑल इंडिया पिक्चर्स नामे संस्थेचे अरोरा हे सूत्रधार. हेलन ज्यावेळी व्यवसायामध्ये आली त्यावेळी त्यांच्या आर्थिक ताकदीमुळे त्यांच्या नावाचा थोडा फार दरारा जरूर





होता. तथापी त्यांच्या कर्तृत्वाची झलक दिसावी असे एकही चित्र ते गेल्या दहा वर्षांमध्ये देऊ शकले नाहीत. 'दिल दौलत और दुनिया' असे हेलन-अरोरा संबंधांवर प्रकाश टाकणारे चित्र अरोरांनी सादर केले. साधना, राजेश खन्ना, अशोककुमार, ओमप्रकाश आदि मंडळी असूनही चित्र नासून गेले. नासलेल्या अपयशाचा पहिला फटका हेलनला बसला. वीस वर्षांच्या वफादारीवर गद्दारीचा ठपका ठेऊन आरोरा चिडचिड करू लागले. आरोरांच्या दोन्ही घरचा खर्च चालवणाऱ्या हेलनच्या खर्चामध्ये कपात झाली. काटकसरीच्या अंमलबजावणीबरोबरच कडवट वागणुकीचा प्रत्यय येऊ लागला.

एकवीस नोव्हेंबर १९७३ हेलनचा वाढदिवस. चार मित्रमंडळी आणि आप्तेष्ट साजरा करत होती. दाराबाहेर गाडी थांबली. आरोरा एकटेच आत आले. सुकून गेलेल्या फुलांचा गुच्छ त्यांनी प्रियेच्या हातात दिला. उपस्थितांवरून आपली नजर फिरवली. आणि पोलिसी खाक्याने चौकशीस प्रारंभ केला. हा कोण ? ही कोण ? यांचे येथे काय काम ? प्रत्येक प्रश्न, त्यामागे दडलेला कुन्मित भाव चीड आणणारा. आता आपले दिवस संपले नसले, तरी संपत आले आहेत, नवीन मुलींच्या नावाची चलती आहे, याची जाणीव असूनही हेलनने ताठर भूमिका घेतली. कडाक्याचे भांडण झाले. आणि हेलन-अरोरा महोब्बतीच्या वीस वर्षांच्या प्रकरणाचे सूप वाजले. ज्या नुरजहाँन वरून अरोरांबरोबर अखेरचा खटका उडाला त्याच नुरजहाँनबरोबर हेलन आज राहते आहे. तिच्या फ्लॅटला घातलेले कुलूप आरोरांनी तोडले आहे. अखेरचे सूप अर्थातच न्यायदरबारी वाजणार आहे. तमाम रसीक चहात्यांना आपल्या सौंदर्य दर्शनाचा अस्वाद देणाऱ्या हेलनजवळ वीस वर्षे एका पुरुषाच्या सहवासात घालवूनही सांगण्यासारख्या चार-दोन गुलाबी प्रणय स्मृती नसाव्यात याचे वैषम्य वाटते.

हेलनपूर्वी जिचे नाव घ्यावे अशी नृत्यांगना कक्कू. कक्कूच्या नृत्याला सभ्यतेच्या मर्यादा होत्या. हेलनने त्या सर्व झुगारून दिल्या. एकापेक्षा एक भडक नृत्ये सादर करणारी हेलन बघता बघता पिटातील प्रेक्षकांना प्रिय बनली. १९५७ मधील 'बारीश' या चित्रपटातील उसळत्या नृत्याने तिचा प्रेक्षक वेडावून गेला. केवळ तिच्यासाठी उन्हातान्हात रांगा लागू लागल्या. चित्रपट नृत्याचा ढंगच हेलनने बदलून टाकला. आज मात्र हेलन म्हणते, माझ्या ऐन जमान्यामध्ये मी एकटीच वस्त्रे उतरवीत होते. चित्रपटांच्या नायिका मर्यादा पाळून होत्या. आज नायिकांपासून वस्त्रहरण सुरू झाले आहे. नवीन पोरींची धडगत नाही.

हेलनचे मोल आहे–होते ते नृत्यांगना म्हणून. परंतु केवळ एवढ्यावरच ती संतुष्ट राहिली नाही. तिची झेप मोठी होती. रंगूनमध्ये बालपण गेलेल्या हेलनला हिंदीचा गंध नव्हता. आरोरांच्या लेखी हेलन–'एक नृत्यांगना' एवढेच तिचे मोल असल्याने तिने हिंदी शिकावे असा प्रामाणिक प्रयत्नही त्यांनी कधी केला नाही. हिंदी आल्याखेरीज आपली प्रगती नाही हे ओळखून प्रयत्नपूर्वक तिने हिंदीचा पाठपुरावा सुरू केला. आणि थोडे फार यश मिळताच तिसऱ्या दर्जाच्या चित्रपटातून का होईना, परंतु हेलन या नावाला बढती मिळाली. जवळ जवळ पंधरा चित्रपटांतून तिने प्रमुख भूमिका केल्या.



अजितबरोबर काबुलीखान, दारासिंगबरोबर आया तुफान, आझादबरोबर धरती की लाज. या चित्रपटांच्या श्रेयनामावळीमध्ये नेहमी...ॲन्ड हेलन हे अखेर झळकणारे नाव चक्क मानाचे पान घेऊन गेले.

आणखीही अशाच काही चित्रपटांमध्ये तिला हा सन्मान प्राप्त झाला. पण हेलनचे मोल या भूमिकांमध्ये नाही. आपल्या सुडौल देहयष्टीचे मनसोक्त प्रदर्शन करीत लयबद्ध नृत्यातून, हेलनचे जे रूप पडद्यावर साकार झाले त्या रूपातील हेलन प्रेक्षकांना प्रीय रहाणार आहे. बारीश, ज्वेल थिफ, तिसरी मंझील, नौ दो ग्यारह, या चित्रपटांतील तिच्या नृत्यांना—ऐन दुपारी बाराच्या खेळाला मिळणारी पिटातील दाद हीच हेलनला मिळालेली पावती.

नायिका म्हणून तिला मान्यता मिळणे शक्यच नव्हते. उपकथानकामध्येही तिला फारसे स्थान नव्हते. तथापी कथा प्रवाहातील एखादी छोटी तेजस्वी व्यक्तिरेखा सजीव करण्याचे सामर्थ्य हेलन जवळ जरूर होते. वह कौन थी, पगला कही का, आदी चित्रपटातून तिने साकारलेल्या व्यक्तिरेखा जरूर संस्मरणीय वाटतात. मुजरा नृत्याची अदाकारी पेलण्याची कुवत तिच्या बरोबर जिची वाटचाल झालेली आहे अशा मिनु मुमताझने दाखविली तशी कुवत हेलनमध्ये नव्हती. म्हणूनच दिलीपच्या गाजलेल्या गंगा जमना मधील तिचे अस्तित्व लक्षात येत नाही, क्लब मधील कॅबेरा स्टाईल नृत्य हे तिचे खरे क्षेत्र.

हेलन संपल्याची ओरड सुरू होऊन वर्ष दीड वर्ष झाले असले तरी आजही पंधरा चित्रपट तिच्याकडे आहेत. दिलीपच्या वैरागमध्ये तिला चक्क भूमिका आहे. त्या खेरीज नगिना, प्रतिशोध, कॉल गर्ल, रईस, मेरे सजना—आदि चित्रपटातून तिचे दर्शन घडणार आहे.

प्रक्षकांच्या चुकल्या क्षणांना विरंगुळा देणाऱ्या या नृत्यांगनेच्या खाजगी आयुष्यामध्ये मोठी वावटळ उठल्याने आज ती पुन्हा एकदा प्रकाशझोतामध्ये उभी आहे. तेज ओसरले आहे, जवानी वितळली आहे, जमाना सरला आहे, तथापी ती 'हेलन' आहे हे विसरता येणार नाही.